
म. ग्रं. सं. ठाणें.
विषय भू-प्रवास
सं. क्र. ३५५

REFBK-0014269
REFBK-0014269

REFBK-0014269
REFBK-0014269

सं. शा.
१७.२.६५
भू. प्रवास—
३५५


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ....३५८२२..... दि: .....
क्रमांक ....३५५........ नों दि: ....



# बारा ज्योतिर्लिंगे

शंभूराव रामचंद्र देवळे

श्री लेखन वाचन भांडार, पुणे २




| | | |
|---|---|---|
| श्रीसोमनाथ | ... | १ |
| श्रीशैलमल्लिकार्जुन | ... | १२ |
| श्रीमहाकाळेश्वर | ... | २३ |
| श्रीओंकार–अमलेश्वर | ... | ३३ |
| श्रीवैजनाथ | ... | ४१ |
| श्रीभीमाशंकर | ... | ५० |
| श्रीरामेश्वर | ... | ६० |
| श्रीऔंढ्य-नागनाथ | ... | ६९ |
| श्रीकाशीविश्वेश्वर | ... | ८० |
| श्रीत्र्यंबकेश्वर | ... | १०३ |
| श्रीकेदारेश्वर | ... | ११४ |
| श्रीघृष्णेश्वर | ... | १२५ |




किंमत तीन रुपये

आवृत्ती पहिली : विजया दशमी, शके १८८६ : दिनांक १५ ऑक्टोबर १९६४
मुद्रक : य. गो. जोशी, बी. ए. (ऑ.) आनंद मुद्रणालय, १५२३ सदाशिव, पुणे २
प्रकाशक : श्री. ग. ल. ठोकळ, ठोकळ भवन, लक्ष्मी रस्ता, पुणे २.


© श्री. शंभूराव रामचंद्र देवळे, ७८ शुक्रवार पेठ, आफळे वाडा, पुणे २.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३८८२२ वि: ग्रं.म.न.ा.म.
क्रमांक ३५५९ नों दि १७।२।६५



तळेगाव दाभाडे येथील

**श्री क ल्या णे श्व र**

इत्येषा वाङ्मयी पूजा श्रीमच्छंकरपादयोः ।
अर्पिता तेन मे देवः प्रीयतां मे सदाशिवः ॥


॥ श्री ॥

सौराष्ट्रे सोमनाथं च श्रीशैले मल्लिकार्जुनम् ।
उज्जयिन्यां महाकालमोंकारममलेश्वरम् ॥ १ ॥

परल्यां वैजनाथं च डाकिन्यां भीमशंकरम् ।
सेतुबंधे तु रामेशं नागेशं दारुकावने ॥ २ ॥

वाराणस्यां तु विश्वेशं त्र्यंबकं गौतमीतटे ।
हिमालये तु केदारं घृसृणेशं शिवालये ॥ ३ ॥

आपल्या भारत देशात भगवान शंकराची बारा प्रसिद्ध स्थाने आहेत. त्यांना 'बारा ज्योतिर्लिंगे' असे म्हणतात. ती वरील स्तोत्रात निर्दिष्ट केली ... ही सर्व स्थाने शंकराची आहेत, एवढेच त्यात साम्य आहे. बाकी त्यां साम्यापेक्षा विविधताच अधिक आहे. यांतील सोमनाथ आणि रामेश्वर ह दोन ज्योतिर्लिंगे समुद्रकाठी आहेत, उज्जयिनीचा महाकाल, काशीचा विश्व आणि इंदूरनजीकचा ओंकारमांधाता ही तीन स्थाने नदीकाठी आहेत. वैज नाथ, नागनाथ आणि घृष्णेश्वर ही सखल प्रदेशात गावाजवळ ... उंचवट्यावर आहेत. तर केदारनाथ, मल्लिकार्जुन, त्र्यंबकेश्वर आणि भीमशंक ही चार ज्योतिर्लिंगे मात्र उंच अशा पर्वतावर आहेत. ही सर्व ज्योति वेगवेगळ्या निमित्ताने उत्पन्न झाली आहे. कोठे अशी कल्पना आढळते ज्योतिर्लिंगे म्हणजे ज्वालामुखीचा उद्रेक आहेत. तर काहींनी ज्योतिर्लिंगे य अर्थ प्रकाश देणारी स्थाने इतकाच केला आहे. कसेही असो, ही बारा ज्योतिर्लिंगे हिमालयासून कन्याकुमारीपर्यंत, समुद्रसपाटीपासून पर्वतशिखरापर्यंत गावाच्या ऐन मध्यावर, नदीकाठी, समुद्रकाठी, टेकडीवर, पर्वतावर, नदीच्या उगमावर अशा विविध स्थळी आहेत. त्यांची माहिती आता आपण पुन: ...



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ३५५ भू-प्रवास

## १ : श्रीसोमनाथ

सोमनाथ हे बारा ज्योतिर्लिंगांतील आद्य ज्योतिर्लिंग आहे. हे शिवस्थान 'सोमनाथपाटण', 'प्रभास-पाटण' व 'देवपाटण' अशा तीन नावांनी ळखले जाते. महाराष्ट्रात या स्थानाचा उल्लेख 'सोरटी सोमनाथ' नावाने केला जातो. कारण हे स्थान सौराष्ट्र (सोरट) देशात आहे. पल्याकडे शिखर शिंगणापूरचा शंभू महादेव हा सोरटी सोमनाथच ाहे, अशी श्रद्धा समर्थांच्या काळापासून चालत आलेली आहे. "सोरटीचा देव माणदेशा आला," असे समर्थांनी म्हटले आहे.


सोमनाथपाटण सौराष्ट्राच्या दक्षिण किनाऱ्यावर वेरावळ बंदरापासून नैऋत्येस अवघे तीन मैल दूर आहे. वेरावळ हे जुनागडपासून आग-गाडीने एकावन्न मैल अंतरावर आहे. वेरावळ ते सोमनाथ हा रस्ता आता ाक्रीटचा झालेला असून क्षेत्रास जावयास वेरावळ स्टेशनवर टांगे व आ र वाहने मिळू शकतात.

प्रभासक्षेत्राचा आणि सोमनाथाचा महिमा इतिहासपुराणांनी मुक्तकंठाने होर्त ायिलेला आहे. स्कंदपुराणाचे सातवे खंड 'प्रभासखंड' याच

नावाचे असून, त्याचे पहिले ३६५ अध्याय प्रभासक्षेत्राच्या माहा
वर्णनासाठी खर्ची पडलेले आहेत. त्यात सोमनाथाच्या प्रादुर्भावाची
पुढीलप्रमाणे दिली आहे :

दक्ष प्रजापतीच्या २७ कन्यांशी (नक्षत्रांशी) चंद्राचा विवाह झ
होता. परंतु चंद्र मात्र सदैव एकट्या रोहिणीच्या सहवासातच रम
होऊन इतर सव्वीस जणींची उपेक्षा करू लागला. आपल्या पती
उपेक्षावृत्तीमुळे व्यथित झालेल्या दक्षकन्यांनी पित्याकडे तक्रार केली. त्य
जावयाची कानउघाडणी केल्यावर चंद्राने त्यास वचन दिले की, "मी
जणींना प्रेमाने वागवीन." परंतु चंद्राचे हे वचन कृतीत उतरू शक
नाही. त्याचे रोहिणीविषयीचे आकर्षण चालूच राहिले. हे पुनः दक्षा
समजताच त्याने चंद्राला शाप दिला की, "तू क्षयी होशील!" हा श
ऐकताच चंद्राचे डोळे उघडले. आता आपण आपल्या जगन्मो
रूपाला मुकणार, या कल्पनेने तो अस्वस्थ झाला आणि दक्षाची विनव
करू लागला. दक्षाने सांगितले की, "आता माझ्या हाती काही ना
तू शिवाची आराधना कर, म्हणजे तुझी शापातून अंशतः मुक्तता होईल
हा दक्षाचा उपदेश ग्रहण करून चंद्र रोहिणीसह या ठिकाणी येऊ
अंडाकृति स्पर्शलिंगाची आराधना करू लागला. चंद्राच्या तपश्चर्येस
चार सहस्र वर्षे लोटल्यानंतर शिव प्रसन्न झाला आणि त्याने चंद्राल
वर दिला की, "प्रत्येक महिन्याच्या पहिल्या पक्षात तू वर्धमान राहशील
आणि आपल्या प्रकाशाने साऱ्या स्थिरचराला शांती देऊ शकशील."
या वरदानानंतर ब्रह्मदेवाने चंद्र व रोहिणी यांच्या हस्ते या स्थानी शि
लिंगाची स्थापना करविली. चंद्राला या ठिकाणी पुनश्च प्रभा प्राप्त झाली
म्हणून हे 'प्रभासक्षेत्र' बनले आणि येथील शिवलिंग चंद्राने म्हणजे
सोमाने स्थापिले, म्हणून येथील शिवस्थानास 'सोमनाथ' अ
नाव पडले. लिंगस्थापनेच्या वेळी मूळचे चंद्राने उपासिलेले स्पर्शलिं

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रमांक ३८८२२ दि. ...
क्रमांक ३५५ ... १५।२




भिंतीवरील खोदकाम, सोमनाथ

ठेवून, त्यावर ब्रह्मशिला ठेवली आणि ब्रह्मशिलेवर सोमनाथलिंगाची स्थापना केली.

असे हे पुराणप्रसिद्ध स्थान केवळ सौराष्ट्र-गुजराथ भागातच नव्हे, तर अखिल भारतात प्रसिद्धि पावत गेले. यात्रिकांच्या गर्दीने, सिद्ध-सत्पुरुषांच्या सान्निध्याने आणि राजे-रजवाडयांच्या देणग्यांनी सोमनाथाचे वैभव वाढत राहिले. एक मंदिर जीर्णावस्थेस आले की, त्या जागी नव्या वैभवशाली मंदिराची उभारणी होऊ लागली. गझनीच्या महंमदाने सोमनाथाचे मंदिर लुटले, तेव्हा त्या मंदिराचे जे अपार वैभव होते, त्याचे वर्णन मुसलमान इतिहासकारांनी लिहून ठेवले आहे :


"सोमनाथाच्या नित्याच्या पूजेसाठी गंगेचे पाणी आणि काश्मिरातली फुले आणली जात होती. देवस्थानच्या इनामी गावांची संख्या दहा हजारांवर होती. भारतातील या प्रचंड आणि प्रख्यात शिवमंदिरात दर्शनार्थींची

धुंवड उडत असे. ग्रहणाच्या दिवशी तर येथे लाखांनी यात्रा भरत असे. भाविक भक्त देवापुढे समर्पणद्रव्यांचा वर्षाव करीत असत. याच्या नित्योपासनेच्या व्यवस्थेसाठी एक हजार ब्राह्मण गुंतलेले असत आणि यात्रिकांच्या क्षौरकर्मासाठी तीनशे न्हावी काम करीत. आरतीच्या वेळी नृत्यगायन करण्यासाठी साडेतीनशे नृत्यांगना होत्या. मंदिराचा सभामंडप छप्पन्न रत्नजडित स्तंभांवर उभारलेला असून, गर्भगृहांत सोमनाथाचे लिंग रत्नदीपांच्या प्रकाशाने उजळत असे. मंदिरातील प्रचंड घंटेला दोनशे मण वजनाची सुवर्णशृंखला होती. देवस्थानचे भांडागार सुवर्णालंकार, हिरेमाणके आणि अमाप द्रव्य यांनी भरलेले होते. ”



सोमनाथ मंदिराचे भग्नावशेष

असे हे वैभवशाली देवस्थान लुटण्यासाठी गझनीचा महंमद इ. स. १०२४ मध्ये भारतात आला आणि त्याने एतद्देशियांचा प्रतिकार हाणून पाडून सोमनाथाचे मंदिर उद्‌ध्वस्त केले आणि अमाप लूट बरोबर नेली. त्यानंतर तत्काळ गुजराथचा भीमदेव आणि माळव्याचा भोजराज यांनी नव्या मंदिराची उभारणी केली. सम्राट सिद्धराज जयसिंहाने आपल्या मातेच्या आज्ञेवरून येथील यात्रेकरूंवरील कर माफ केला. त्याच्यानंतर गादीवर आलेल्या कुमारपालाने अनहिलपूरपासून सोमनाथपर्यंत पायी चालत येऊन मंदिराच्या विस्ताराची व्यवस्था केली. या विस्ताराचा पायाभरणसमारंभ भवबृहस्पतींच्या हस्ते झाला. भीमदेवाने दोन प्रशस्त



माजी राष्ट्रपती कै. डॉ. राजेंद्रप्रसाद सोमनाथाची प्रतिष्ठापना-पूजा करताना

मंडप बांधविले. पुढे महान् पाशुपत आचार्य त्रिपुरान्तक याने सोमनाथाचे भव्य व सुंदर मंदिर बांधले आणि प्रभासक्षेत्रात आणखी पाच शिवमंदिरांची उभारणी केली. इ. स. १३०० मध्ये अल्लाउद्दिन खिलजीचा सेनापती आलफखान याने सोमनाथ-मंदिराचा विध्वंस केला आणि त्यानंतर चुडासम घराण्यातील महीपाल राजाने ते पुनः बांधून काढले. पुढे मुझफरशहा पहिला, महंमद बेगडा, मुझफरशहा दुसरा यांनी पुनः पुनः ( अनुक्रमे इ. स. १३९०, १४९०, १५३० या साली) मंदिराचा नाश केला आणि आश्चर्य असे की, ते पुनः पुनः उभारलेही गेले. औरंगजेबाची वक्रदृष्टी इ. स. १७०१ मध्ये सोमनाथाकडे वळली आणि त्याने या पवित्र स्थानाची मशीद बनविली. इ. स. १७८३ मध्ये साध्वी अहल्याबाईने जवळच नवे सोमनाथ मंदिर बांधले. शेवटी ब्रिटिशांच्या पारतंत्र्यातून भारत मुक्त झाल्यानंतर गुजराथचे सिंह सरदार वल्लभभाई पटेल यांनी या पवित्र स्थानाच्या विटंबनेचा कलंक कायमचा


पुसून टाकण्याचा संकल्प केला. त्यांनी मशिदीत रूपांतर पावलेले मूळचे छिन्नभिन्न मंदिर पूर्णपणे उतरविले; त्या जागी पुरातत्त्व विभागातर्फे उत्खनन करून, अनेकवार उभारणी आणि संहारणी झालेल्या मंदिराचे अवशेष काढविले; त्या अवशेषांची वस्तुसंग्रहालयात व्यवस्था करविली आणि त्याच पवित्र जागेवर पूर्ववैभवाच्या स्मृतींना उजळा देण्याऱ्या, स्वतंत्र भारताच्या गौरवाला साजणाऱ्या नव्या मंदिराचे पायाभरण केले. या नव्या मंदिराचा पहिला मजला पुरा होताच, दि. ११ मे १९५१ या दिवशी त्या वेळचे राष्ट्रपति डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या शुभहस्ते त्याच ब्रह्मशिलेवर सोमनाथाच्या ज्योतिर्लिंगाची प्राणप्रतिष्ठा झाली. या प्राण-प्रतिष्ठेच्या क्षणी भारतीयांची चिरंजीविनी अस्मिता पुनः आनंदाने आणि अभिमानाने गर्जून उठली—

तदेव गर्भस्य गृहं च सा शिला यथातथं द्वित्रसहस्रवत्सरान् ।
अधस्तनस्योपरि यत्र नूतनः पुराणमूर्तेर्गरिमा प्रकाशते ॥

( दोन-तीन हजार वर्षांपासून पावित्र्य पावलेल्या त्याच गर्भगृहात आणि त्याच ब्रह्मशिलेवर पुराणप्रसिद्ध शिवाचा महिमा नव्याने दीप्तिमान् झाला आहे. )


देवद्रोह्यांच्या घणाघातातूनही जेथील श्रद्धा उद्ध्वस्त झाली नाही, ते सोमनाथपाटण प्रत्येक भारतीयाने पाहिलेच पाहिजे.

सोमनाथाच्या दर्शनापूर्वी यात्रिक त्रिवेणीसंगमावर जाऊन स्नान करतात. हिरण्या आणि कपिला या दोन लहान नद्या समुद्राला मिळाल्या आहेत. सरस्वती गुप्तच आहे. समुद्राचे पाणी नद्यांच्या मुखांत शिरत असल्यामुळे या त्रिवेणीसंगमातील पाणी खारट आहे. जवळ हिरण्या नदीच्या काठी 'देहोत्सर्ग' नावाचे पवित्र स्थान आहे. या ठिकाणी भगवान श्रीकृष्णाच्या पार्थिव देहाला अग्निसंस्कार केला गेला, म्हणून हे स्थान 'देहोत्सर्ग' या नावाने ओळखले जाते. या ठिकाणी हिरण्या



देहोत्सर्ग, सध्याची स्थिति

नदीला लहानसा घाट बांधलेला आहे. यात्रिक या घाटावर स्नान करतात आणि वर येऊन भगवान श्रीकृष्णाच्या चितास्थानी बांधलेल्या चौथऱ्यावर [illegible] भक्तिभावाने वंदन करतात. या ठिकाणी [illegible] खांबांवर उभे असलेले एक लांबच लांब स्मारक उभारण्याचा संकल्प आहे. तसेच, [illegible] गीतामंदिरही उभे राहिले आहे.




देहोत्सर्गाच्या ठिकाणी योजलेले बांधकाम

या स्थानाचे दर्शन घेतांना आपल्या मनात भगवंताचे ते दिव्य चरित्र जागे होते. तो मथुरेच्या बंदिशाळेत जन्मलेला, गोकुळात वाढलेला, वृन्दावनात गोप-गोपींच्या सहवासात रमलेला, सांदीपनींच्या आश्रमात शिकलेला, कंसवध करून द्वारकाधीश बनलेला, कुरुक्षेत्रावर महाभारत घडविणारा आणि साऱ्या मानवजातीला गीतेचा अमर संदेश देणारा लीलालाघवी भगवान श्रीकृष्ण देहोत्सर्ग करावयास या ठिकाणी आला. यादवांच्या विनाशानंतर बलराम आणि श्रीकृष्ण या दोघांही बंधूंनी येथेच आपल्या अवतारांची समाप्ती केली. प्रथम बलरामाने समुद्रात प्रवेश करून देहत्याग केला आणि नंतर भगवंताने व्याधाच्या बाणाचे निमित्त करून स्थिरचित्ताने देह सोडला. जेथे श्रीकृष्णाच्या डाव्या पायाच्या अंगठ्याला व्याधाचा बाण लागला, ते स्थान 'भालुका-तीर्थ' या नावाने येथे प्रसिद्ध आहे. भालुकातीर्थ वेरावळ आणि सोमनाथपाटण यांच्यामध्ये मुख्य रस्त्यापासून थोडे आडबाजूला आहे. तेथे श्रीकृष्णाची एक मूर्ति बसविलेली आहे. व्याधाचा बाण पायाला लागल्या नंतर अंगठ्यातून वाहणारे रक्त श्रीकृष्णाने ज्या ठिकाणी धुतले, ते पद्म-कुंडही भालुकातीर्थाशेजारीच आहे.

देवी अहल्याबाईने बांधलेले सोमनाथ-मंदिर मूळ उद्ध्वस्त मंदिरापासून जवळच आहे. अहल्याबाईला सोमनाथाने मंदिर बांधण्याचा स्वप्नात आदेश दिला, असे सांगतात. त्या साध्वीने देवाने स्वप्नांत दिलेल्या आदेशानुसार मंदिर बांधले आणि मोंढे आडनावाच्या ब्राह्मणास पुजारी नेमले. हे मंदिर दुहेरी कोटाच्या आत आहे. बाहेरच्या कोटाचा मुख्य दरवाजा शनिवारवाड्याच्या दिल्ली दरवाजाप्रमाणे आहे. या दरवाजातून आत आल्यावर दुसऱ्या कोटाचा दरवाजा लागतो. या दुसऱ्या कोटाच्या आत प्रशस्त प्रांगण असून मध्ये मंदिर आहे. मंदिराचा चौथरा उंच आहे. चौथरा चढून गेल्यावर सभामंडप लागतो. त्यापुढे गर्भगृह

आहे. गाभाऱ्यातील शिवलिंग केवळ दर्शनी आहे. मुख्य लिंग गाभाऱ्याखालच्या तळघरात आहे. तळघरात जाण्याचा जिना सभामंडपातून डाव्या बाजूने आहे. त्या अंधाऱ्या जिन्याने खाली जाऊन शिवदर्शन घ्यायचे. भक्तांची दुर्बलता वाढली की देवालाही असेच भूमिगत व्हावे लागते. अशी परिस्थिती समाजाला आणि राष्ट्राला लांछनास्पद आहे, हे




नटराजशिव, सोमनाथ मंदिरांतील खोदकाम

स्वतंत्र भारताचे एक निर्माते आणि पहिले गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल व भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळातील मंत्री ना. काकासाहेब गाडगीळ यांनी ध्यानी आणले आणि मूळच्याच जागेवर देवाची वैभवशाली रीतीने पुनः प्रतिष्ठा केली.

नवे मंदिर जेव्हा कळसापर्यंत पूर्णता पावेल, तेव्हा ते भारतीय कलेचा एक उत्कृष्ट नमुना ठरेल. कोणार्क, पुरी, भुवनेश्वर इत्यादी उत्कृष्ट मंदिरशिल्पांचे सौंदर्य अद्ययावत् साधनांच्या सुकरतेमुळे येथे चढत्या-वाढत्या स्वरूपात उमलून येणार आहे. मुखमंडप, सभामंडप आणि गर्भगृह अशा तीन भागांचे हे संकल्पित मंदिर जितके भव्य तितकेच सुंदर ठरणार आहे. प्रत्येक मंडपाच्या नक्षत्राकृति भिंती

पानाफुलांच्या, वेलपत्त्यांच्या, पशुपक्ष्यांच्या, नृत्यांगनांच्या सौंदर्याकृतींनी आणि नानाविध सुंदर शिल्पपट्टांनी सुशोभित होणार आहेत. प्रत्येक मजल्याला सुंदर सज्जे होणार आहेत आणि मंदिराच्या तिन्ही भागांवर प्रेक्षणीय शिखरे उभी राहाणार आहेत. असे हे शिल्पसौन्दर्याने



प्रदक्षिणेच्या मार्गावरील वायव्य कोपरा, सोमनाथमंदिर

नटलेले मंदिर, भोवताली अत्यंत विस्तृत प्रांगण, त्यात अनेक पुष्करिणी, थुईथुई नाचणारी कारंजी आणि सुगंधाने सारा परिसर दरवळून टाकणारी रंगीबेरंगी फुले — असे संपूर्ण दृश्य दिसणार आहे.

या मंदिरात गर्भगृहात त्याच ब्रह्मशिलेवर पुनः विराजमान झालेल्या

शिवाचे दर्शन घेतांना आपल्यापुढे गेल्या हजार वर्षांचा इतिहास उभा राहतो आणि विषाद व संताप धुवून टाकणाऱ्या ताज्या घटनांमुळे मन उत्साहित होते—आपल्या खऱ्या कर्तव्याची जाणीव मनात तरारून येते.


सोमनाथपाटणात आणखीही अनेक मंदिरें आहेत. संगमाच्या समोरच्या बाजूस एक मूर्तिविहीन प्राचीन सूर्यमंदिर आहे. काळाच्या प्रभावाने उदास बनलेल्या या मंदिराचे एके काळचे सौंदर्य आपल्या अंतश्चक्षूंना जाणवल्यावाचून राहात नाही. गावातील प्राचीन भद्रकाली-मंदिरात प्रवेशद्वाराच्या उजवीकडे भिंतीवर ५१ श्लोकांचा शिलालेख आहे. हा शिलालेख वलभी संवत् ८५० मधील असून, त्यात राजा कुमारपालाने आचार्य भवबृहस्पतींच्या आदेशानुसार जी मंदिरे बांधली, जे जीर्णोद्धार केले आणि जी दाने दिली, त्यांची नोंद आहे.

असे हे पुरातन सोमनाथपाटण अनेक विध्वंसनांचा इतिहास पचवून पुनश्च नव्या वैभवाने उभे राहू लागले आहे. एके काळी भारताच्या विदेशव्यापाराचे आणि भारतीयांच्या धर्मश्रद्धेचे केंद्र असलेले हे स्थान भक्तभाविकांप्रमाणेच हौशी यात्रिकांनाही आपल्याकडे आकर्षून घेऊ लागले आहे. येथील समुद्रकिनारा अत्यंत सुंदर आहे. मावळत्या सूर्याच्या तांबूस प्रकाशाने नटलेल्या लाटा जेव्हा सोमनाथाच्या सायं-कालीन आरतीच्या वेळी साथ देण्यास झेपावतात, तेव्हा नास्तिकांची मनेही दिव्यभावाने ओलावतात. आद्य शंकराचार्यांनी सोमनाथाला वंदन करताना म्हटले आहे :

सौराष्ट्रदेशे विशदेऽतिरम्ये ज्योतिर्मयं चन्द्रकलावतंसम् ।
भक्तिप्रदानाय कृपावतीर्णं तं सोमनाथं शरणं प्रपद्ये ॥

☆ ☆ ☆

पानाफुलांच्या, वेलपत्त्यांच्या, पशुपक्ष्यांच्या, नृत्यांगनांच्या सौंदर्याकृतींनी आणि नानाविध सुंदर शिल्पपट्टांनी सुशोभित होणार आहेत. प्रत्येक मजल्याला सुंदर सज्जे होणार आहेत आणि मंदिराच्या तिन्ही भागांवर प्रेक्षणीय शिखरे उभी राहाणार आहेत. असे हे शिल्पसौन्दर्याने



प्रदक्षिणेच्या मार्गावरील वायव्य कोपरा, सोमनाथमंदिर

नटलेले मंदिर, भोवताली अत्यंत विस्तृत प्रांगण, त्यात अनेक पुष्करिणी, थुईथुई नाचणारी कारंजी आणि सुगंधाने सारा परिसर दरवळून टाकणारी रंगीबेरंगी फुले — असे संपूर्ण दृश्य दिसणार आहे.

या मंदिरात गर्भगृहात त्याच ब्रह्मशिलेवर पुनः विराजमान झालेल्या


शिवाचे दर्शन घेतांना आपल्यापुढे गेल्या हजार वर्षांचा इतिहास उभा राहतो आणि विषाद व संताप धुवून टाकणाऱ्या ताज्या घटनांमुळे मन उत्साहित होते—आपल्या खऱ्या कर्तव्याची जाणीव मनात तरारून येते.

सोमनाथपाटणात आणखीही अनेक मंदिरें आहेत. संगमाच्या समोरच्या बाजूस एक मूर्तिविहीन प्राचीन सूर्यमंदिर आहे. काळाच्या प्रभावाने उदास बनलेल्या या मंदिराचे एके काळचे सौंदर्य आपल्या अंतश्चक्षूंना जाणवल्यावाचून राहात नाही. गावातील प्राचीन भद्रकाली-मंदिरात प्रवेशद्वाराच्या उजवीकडे भिंतीवर ५१ श्लोकांचा शिलालेख आहे. हा शिलालेख वलभी संवत् ८५० मधील असून, त्यात राजा कुमारपालाने आचार्य भवबृहस्पतींच्या आदेशानुसार जी मंदिरे बांधली, जे जीर्णोद्धार केले आणि जी दाने दिली, त्यांची नोंद आहे.

असे हे पुरातन सोमनाथपाटण अनेक विध्वंसनांचा इतिहास पचवून पुनश्च नव्या वैभवाने उभे राहू लागले आहे. एके काळी भारताच्या विदेशव्यापाराचे आणि भारतीयांच्या धर्मश्रद्धेचे केंद्र असलेले हे स्थान भक्तभाविकांप्रमाणेच हौशी यात्रिकांनाही आपल्याकडे आकर्षून घेऊ लागले आहे. येथील समुद्रकिनारा अत्यंत सुंदर आहे. मावळत्या सूर्याच्या तांबूस प्रकाशाने नटलेल्या लाटा जेव्हा सोमनाथाच्या सायंकालीन आरतीच्या वेळी साथ देण्यास झेपावतात, तेव्हा नास्तिकांची मनेही दिव्यभावाने ओलावतात. आद्य शंकराचार्यांनी सोमनाथाला वंदन करताना म्हटले आहे :

सौराष्ट्रदेशे विशदेऽतिरम्ये ज्योतिर्मयं चन्द्रकलावतंसम् ।
भक्तिप्रदानाय कृपावतीर्णं तं सोमनाथं शरणं प्रपद्ये ॥

☆ ☆ ☆



## २ : श्रीमल्लिकार्जुन

श्रीमल्लिकार्जुन हे ज्योतिर्लिंग दोन-अडीच हजार वर्षांपासून गाजते असून त्याचा महिमा पुराणांनी मुक्तकंठाने गायिला आहे. या शिव-स्थानाचा जसा द्वादश ज्योतिर्लिंगांत समावेश आहे, त्याचप्रमाणे शिवाच्या प्रमुख अष्टस्थानातही त्याचा समावेश आहे. लिंगपुराणात या स्थानाचा उल्लेख आहे. महाभारताच्या वनपर्वात श्रीशैलावरील या शिवस्थानाविषयी म्हटले आहे :

श्रीपर्वते महादेवो देव्या सह महाद्युतिः
न्यवसत् परमप्रीतो ब्रह्मा च त्रिदशैः सह ।
तत्र देवहृदे स्नात्वा शुचिः प्रयतमानसः
अश्वमेधमवाप्नोति कुलं चैव समुद्धरेत् ॥

( दिव्य तेजाने युक्त आणि प्रसन्न अशा महादेवाने देवीसह श्रीपर्वता-वर निवास केला आहे. त्याच्याबरोबर ब्रह्मदेवानेही अन्य देवांसह निवास केला आहे. येथील देवसरोवरांत जो पवित्र आणि संयत मनाने स्नान

करील, त्याला अश्वमेधाचे पुण्य लाभेल आणि त्याच्याबरोबर त्याच्या संपूर्ण कुलाचाही उद्धार घडेल.)

असे हे पुराणप्रसिद्ध शिवस्थान आंध्र प्रदेशातील कुर्नूल जिल्ह्यात (नंदीकोटकुर तालुक्यात) श्रीपर्वत अथवा श्रीशैल नावाच्या डोंगरावर आहे. आंध्रमध्ये हा पर्वतभाग 'नल्लमलै' या नावाने ओळखला जातो. हे स्थान विजयवाड्याच्या सरळ पश्चिमेस आहे. नंद्याळ रेल्वे स्टेशनावर उतरल्यानंतर श्रीशैल अवघे ७३ मैलांवर आहे. नंद्याळहून ३८ मैल अंतरावर असलेल्या आत्मकूरला मोटारने यावयाचे. तेथून १० मैलांवर नागलुटी हे स्थान आहे. नागलुटीहून श्रीशैलास जाण्यास दोन मार्ग आहेत: एक पेड्डाचेरुवकडून घनदाट अरण्यातून जाणारा पायरस्ता आणि दुसरा दोर्नलकडून जाणारा रस्ता. दोर्नलपर्यंत सडक आहे आणि दोर्नल ते श्रीशैल हा घाटमार्ग नव्यानेच तयार झालेला आहे. पेड्डाचेरुवकडून जाणारा पायरस्ता निसर्गरम्य वातावरणातून जात असून, तो उत्तम पायऱ्यांनी बांधून काढलेला आहे.

काही वर्षांपूर्वीपर्यंत श्रीशैलाची यात्रा करणे महादुष्कर होते. अत्यंत घनदाट अरण्यात असलेल्या या क्षेत्री जाणाऱ्या यात्रिकांना अनेक प्रकारच्या संकटांना तोंड द्यावे लागे. परंतु आता स्वातंत्र्योत्तरकाळात श्रीशैलाची यात्रा सुगम झाली आहे. कुर्नूल, गुंतूर इत्यादी ठिकाणांहून श्रीशैलाकडे बसने जाता येते. दोर्नलपासून श्रीशैलापर्यंत जाणारा नवीन घाटमार्ग तयार झाल्यापासून थेट मंदिरापर्यंत बस जाऊ लागली आहे. देवस्थानाने बांधलेल्या उत्तम धर्मशाळांत यात्रिकांना विनामूल्य राहता येते. ज्या यात्रिकांना स्वतंत्र खोली हवी असेल, त्यांना ती पाच रुपये रोज भाड्याने मिळते. तसेच येथे सर्व अद्ययावत सुखसोयींनी युक्त असे उत्तम अतिथिगृहही आहे. देवस्थानने पाण्याची आणि विजेच्या दिव्यांची सोय

केलेली आहे. प्रवासाच्या आणि निवासाच्या या सोयीमुळे श्रीशैल हे यात्रिकांच्या गर्दीने गजबजलेले क्षेत्र बनले आहे.

श्रीशैलाच्या स्थलमाहात्म्यात श्रीमल्लिकार्जुन शिवासंबंधी विशेष कथा आहे : कृष्णा नदीच्या उत्तर तीरावरील चंद्रगुप्तपुरम् येथील राजाला चंद्रावती नावाची एक मुलगी होती. राजा दीर्घकाल मोहिमेवर होता. तो मोहिमेवरून परत आला, तेव्हा त्याची मुलगी वयात आली होती. आश्चर्य असे की, आपल्या स्वतःच्या मुलीविषयी राजाच्या मनात विकार उत्पन्न झाला. चंद्रावती ही सुशील मुलगी होती. आपल्या पित्याच्या मनात आपल्याविषयी विकार उत्पन्न झाल्याचे ध्यानात येताच तिला संताप अनावर झाला आणि पित्याला शाप देऊन ती घराबाहेर पडली. कन्येच्या शापामुळे राजा पाताळगंगेत बुडून मेला. इकडे चंद्रावती काही विश्वासू गवळ्यांसह पाताळगंगेच्या दक्षिण तीरावर तपस्वी जीवन कंठू लागली. काही दिवसांनी तिच्या असे ध्यानात आले की, आपल्या गायींच्या कळपांपैकी एका दुभत्या गाईचे दूध उडाले आहे. हे ध्यानात येताच तिने गवळ्यांना त्याचे कारण शोधावयास सांगितले. गवळ्यांनी त्या गायीवर विशेष लक्ष ठेवल्यावर त्यांना असे दिसून आले की, ती गाय आपल्या कासेतील सर्व दूध अरण्यातील एका स्वयंभू शिवलिंगावर सांडीत असे. गवळ्यांनी हे वृत्त चंद्रावतीला कळविल्यावर तिनेही स्वतःच्या डोळ्यांनी खात्री करून घेतली. ज्या दिवशी तिने ते दृश्य पाहिले, त्या दिवशी रात्री शिवाने तिला स्वप्नात दर्शन दिले आणि तिला सांगितले की, "त्या शिवलिंगाच्या रूपाने साक्षात् मीच या ठिकाणी वास करीत आहे." या स्वप्नदर्शनाने चंद्रावतीला अत्यंत हर्ष झाला. तिने त्या शिवलिंगावर मंदिराची उभारणी केली आणि मनोभावे त्याची उपासना सुरू केली. चंद्रावती नित्य मल्लिकापुष्पांचा (मोगऱ्याच्या फुलांचा) हार देवाला अर्पण करीत असे, म्हणून त्याचे

'मल्लिकार्जुन' असे नाव रूढ झाले. सध्याच्या मंदिराच्या प्राकाराच्या भिंतींवर जे शिल्पपट्ट आहेत, त्यांतील दोन शिल्पपट्टांत या कथेचे शिल्पांकन केलेले आहे.

मल्लिकार्जुनाच्या उद्‌भवाविषयी आणखीही एक कथा येथील चेंचू नावाच्या आदिवासी जमातीत प्रचलित आहे. ही चेंचू जमात श्रीशैलाच्याच परिसरात राहाणारी आहे. चेंचू जमातीत प्रचलित असलेल्या कथेनुसार शिव एकदा शिकार करण्याच्या निमित्ताने या भागात आला होता. शिकारीसाठी जंगलात हिंडत असताना शिवाने एक सुंदर चेंचू तरुणी पाहिली आणि त्याच्या मनात तिच्याविषयी प्रीती निर्माण झाली. कालांतराने शिवाने त्या चेंचू तरुणीशी विवाह केला. विवाहानंतर ही शिवाची आदिवासी पत्नी त्याला शिकारीत साहाय्य करू लागली आणि या पत्नीच्या इच्छेखातर शिवाने येथे कायमचे वास्तव्य केले.

अशा प्रकारे चेंचू जमात शिवाला आपला जावई मानते. ते मल्लिकार्जुनाला 'चेंचू मल्लिहा' या नावाने संबोधतात. मंदिराच्या प्राकारावरील एका शिल्पपट्टात या कथेला सुरेख शिल्पसाज चढविलेला आहे. शिव आपल्या त्रिशूळाने एका जंगली वाघाला मारीत आहे आणि त्याच्याबरोबर चेंचू वेशातील पार्वती हातात बाण घेऊन चार शिकारी कुत्र्यांसह उभी आहे, असे दृश्य त्या शिल्पपट्टात कोरलेले आहे. चेंचूंनी आपल्या या थोर जावयाशी स्नेहाचे संबंध आजवर अव्याहत राखलेले आहेत. चेंचूंना मल्लिकार्जुनाच्या गर्भगृहापर्यंत सर्वत्र मुक्त प्रवेश आहे. मंदिरातील नित्यनैमित्तिक उपासनेत चेंचूंना विशेष मानाचे स्थान आहे. देवाच्या रथोत्सवाच्या वेळी रथ ओढण्याचे काम चेंचूच करतात. शिवरात्रिमहोत्सवात गर्भगृहात बसून स्वहस्ते शिवलिंगाची पूजा करण्याचा त्यांना मुक्त अधिकार आहे. यावरून असे वाटते की, या महान शिवस्थानाशी चेंचू जमातीचा पूर्वापार दृढ संबंध असला पाहिजे.

श्रीशैल हे प्राचीन देवस्थान आहे. त्याची प्राचीनता ख्रिस्तपूर्व काळा-इतकी मागे जाते. फाहैन आणि हुएनत्संग या चिनी बौद्ध प्रवाशांनी श्रीपर्वताचा म्हणजे श्रीशैलाचा उल्लेख केला आहे. बौद्धधर्माच्या उत्तरकालात जेव्हा बौद्धधर्मात तंत्रविद्येचा प्रवेश झाला, तेव्हा श्रीशैल हे तंत्रमार्गी बौद्धधर्मीयांचे एक मोठे केन्द्र बनले होते. या तंत्रमार्गात पुरुषांबरोबर स्त्रियाही मोठ्या संख्येने समाविष्ट झालेल्या होत्या. इतक्या की, त्यांच्या बहुसंख्येमुळे श्रीशैलाच्या परिसरातील कदलीबनाला स्त्रीराज्य अशी संज्ञा प्राप्त झाली होती. या स्त्रीराज्यात अडकलेल्या आपल्या गुरूला--मत्स्येंद्रनाथाला—बाहेर काढून तंत्रमार्गी लोकांच्या धार्मिक अनाचाराविरुद्ध गोरक्षनाथाने येथेच बंड उभारले आणि नाथ-संप्रदायाची स्थापना केली, असे श्री. रा. चिं. ढेरे यांनी सिद्ध केले आहे. गुरु गोरक्षनाथांच्या प्रयत्नांमुळे या शैव क्षेत्राला पुनः पूर्वीची प्रतिष्ठा प्राप्त झाली.

मल्लिकार्जुनाच्या मंदिरातील कोरीव लेखांचे पुरावे चौदाव्या शतका-पासूनचे आहेत. सर्वांत जुने लेख काकतीय राजा प्रतापरुद्र याच्या राज्यकाळातले आहेत. विजयनगरच्या राजांनी मल्लिकार्जुनमंदिराच्या उभारणीत आणि वाढीत विशेष वाटा उचललेला दिसतो. मंदिराचा मुखमंडप इ. स. १४०५ मध्ये द्वितीय हरिहराने उभारला. प्रौढदेवराय येथे दर्शनार्थ येऊन गेला होता. विजयनगरच्या साळुव घराण्यातील राजांनी येथील काही तीर्थकुंडे बांधून काढली. कृष्णदेवरायाने रथयात्रा-पथावर दोन्ही बाजूंना इमारती बांधविल्या; काही गावे देवस्थानाला करमुक्त इनाम दिली आणि वाहतुकीच्या जनावरांवरील करही देवस्थानाला लावून दिला. या घराण्यातील राजांच्या काही अधिकाऱ्यांनीही देव-स्थानाला इनामे दिली आणि मंदिराच्या वाढीचे व वैभवाचे प्रयत्न केले.

मल्लिकार्जुनाचे मंदिर श्रीशैलावर एका खोलगट भागात आहे.

मंदिराभोवती रमणीय असा अरण्यप्रदेश आहे. मंदिराच्या पूर्व बाजूस पाताळगंगेच्या ( कृष्णेच्या ) पात्राकडे उतरणारा नागलुटीस जाणारा रस्ता आहे. कृष्णा नदी येथे पाताळगंगा या नावाने ओळखली जाते.



नटराजाची मूर्ती

पाताळगंगेचे पात्र येथून सुमारे दोन मैल अंतरावर असून, तिकडे उतरण्यासाठी पायऱ्यांचा रस्ता बांधून काढलेला आहे. या पायऱ्या रेड्डी घराण्यातील एका राजाने ( १५ वे–१६ वे शतक ) बांधून काढल्या, असे मंदिरातील एका शिलालेखावरून दिसते.

मल्लिकार्जुनमंदिराचे बंदिस्त आवार प्रशस्त आहे. पूर्वपश्चिम पाचशे फूट आणि दक्षिणोत्तर सहाशे फूट एवढा त्याचा विस्तार आहे. या प्राकाराला उत्तर, दक्षिण आणि पूर्व या तीन बाजूंना भव्य प्रवेशद्वारे आहेत.

या प्राकाराच्या आत दगडी बांधणीच्या भिंतीने मल्लिकार्जुनाचे मंदिर वेढलेले आहे. या मुख्य मंदिराच्या परिसरात इतर अनेक लहान लहान मंदिरे आहेत. भ्रमरांबेचे मंदिर मल्लिकार्जुन–मंदिराच्या आवाराबाहेर पश्चिमेकडे आहे. मल्लिकार्जुन–मंदिराचे गर्भगृह लहानसेच आहे. गर्भगृहाला लागून स्तंभांवर उभारलेली अरुंद ओटी असून, त्यापुढे हरिहररायाने बांधलेला सुंदर मुखमंडप आहे. या मंडपातील स्तंभांवर आणि छतावर सुंदर शिल्पाकृती आणि मूर्ती कोरलेल्या आहेत. याच मंडपात ब्रॉंझ धातूची नयनमनोहर नटराजमूर्ती आहे. केवळ दर्शनाने यात्रिकाच्या हृदयात भक्तीचा जिव्हाळा निर्माण करणारी ही मूर्ती म्हणजे मूर्तिशिल्पाचा एक उत्कृष्ट नमुना आहे. या मुखमंडपानंतर सुंदर स्तंभावर उभे असलेले दोन मंडप आहेत. त्यांपैकी शेवटच्या मंडपात नंदी असून, नंदीमंडपापुढे मंदिराच्या प्राकाराचे पूर्वद्वार आहे. मल्लिकार्जुन–मंदिराच्या उत्तरेस वटवृक्षाच्या छायेखाली मूलमल्लिकार्जुनाचे मंदिर आहे. राजकुमारी चंद्रावतीची गाय ज्याच्यावर दूध सांडीत होती, ते स्थान हेच होय, अशी लोकांची श्रद्धा आहे. मुखमंडपाच्या उत्तरेस एक लहानसे शिवमंदिर आहे. या मंदिरातील शिवलिंगाला ‘ सहस्रलिंग ’ असे म्हणतात. कारण यावर सहस्रलिंगे कोरलेली आहेत. या लिंगाला त्रिमुखी नागाकृतीने वेढलेले आहे. या मंदिराचे वैशिष्ट्यच असे की, याचे चढते शिखर, दरवाजे आणि छत तांब्याच्या नक्षीदार पत्र्याने मढविलेले आहे.

मल्लिकार्जुन–मंदिराच्या प्राकाराच्या भिंतींवर बाहेरील बाजूस अनेक शिल्पपट्ट कोरलेले आहेत. विशेषतः दक्षिण आणि पूर्व बाजूंचे शिल्पपट्ट प्रेक्षणीय आहेत. या शिल्पपट्टांत कितीतरी कथाप्रसंग आणि मूर्ती कोरलेल्या आहेत. शिवाची विविध रूपे आणि त्या रूपांशी संबंधित अशा पुराणकथा यांचे हे विविधतापूर्ण आणि कलायुक्त शिल्पचित्रण

अनुक्रम ... वि: ... नोंद दि ...

पाहून प्रेक्षकांचे डोळे दिपून जातात. भिक्षाटन-शिव, भुजंगललित–शिव गजासुराचा वध करणारा शिव, महिषमर्दिनी, किरातार्जुनीय युद्धप्रसंग, शिवपार्वतीविवाहप्रसंग, इत्यादी मूर्ती व प्रसंगशिल्पे मनोहर आहेत.

श्रीशैल-क्षेत्र असे आहे. कृष्णेच्या प्रवाहाने शीतल आणि हिरवागार बनलेला हा परिसर क्षेत्राच्या पावित्र्यात भर टाकीत आहे. येथे शिव अक्षरशः 'वन-वासी' बनून राहिला आहे. शेकडो वर्षांपासून येथे यात्रिकांच्या झुंडी लोटताहेत. कोणी दर्शन करून जातात; कोणी एकान्तरमणीय वातावरणात तपाला बसतात; तर कोणी येथेच समाधिस्थ होऊन चिरविश्रांती पावतात. फेब्रुवारी ते मे या चार महिन्यांच्या काळात हा परिसर उत्सवयात्रांच्या निमित्ताने गजबजलेला असतो. या काळात मंदिराची व्यवस्था कुडाप्पा जिल्ह्यातील पुष्पगिरी मठाकडे असते; आणि इतर वेळी जंगम पुरोहित आणि चेंचू लोक यांच्याकडे असते. शिवरात्रि-उत्सव आणि त्यानंतर येणारा भ्रमरांबेचा उत्सव यात्रिकांच्या गर्दीने गाजत असतो. येथे पुरातन काळापासून सर्वसाधारण यात्रिकांपासून राजेरजवाडयांपर्यंत आणि हौशी प्रवाशांपासून साधु-संतांपर्यंत असंख्य यात्रिक येत राहिले आहेत. ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठल-पंत येथे येऊन गेल्याची नोंद आहे. विशेष म्हणजे कर्नाटक मोहिमेच्या वेळी छत्रपती शिवाजी महाराज मल्लिकार्जुनाचे दर्शन घेऊन गेले होते. या निसर्गरम्य आणि एकान्ताने गूढ बनलेल्या शिवस्थानी येताच त्यांचे आंतरिक वैराग्य उफाळून आले आणि राजसंन्यास घेऊन येथेच शिवसान्निध्यात राहून तप आचरावे, असा संकल्प त्यांच्या हृदयात जागा झाला, असे वर्णन ऐतिहासिक ग्रंथात आढळते. हा शिवावतारी महापुरुष शिवाच्या दर्शनाने भारावून जावा, हे स्वाभाविकच आहे.

श्रीशैलाचा महिमा केवळ शिवपीठ म्हणूनच नव्हे, तर शक्तिपीठ म्हणूनही प्राचीन काळापासून गाजत आहे. श्रीशैल हे भारतातील अठरा

प्रमुख शक्तिपीठांपैकी एक समजले जाते. येथील देवी माधवी अथवा भ्रमरांबा या नावाने ओळखली जाते. स्थानिक लोक या जगन्मातेला अम्मा (आई) या नावाने संबोधतात. भ्रमरांबा हे कालीचेच एक रूप आहे, असे मानतात. भ्रमरांबेचे मंदिर शिवमंदिराच्या पश्चिमेस आहे. मंदिराचे सध्याचे बांधकाम विजयनगरकालीन आहे. मंदिर अगदी लहानसेच आहे. देवीचा उत्सव शिवरात्रि–महोत्सवाला जोडूनच सुरू होतो. या उत्सवात पशुबली देण्याची प्रथा आहे. श्रीशंकराचार्य आले असताना त्यांनी भ्रमरांबेची स्तुति करण्यासाठी एक मधुर अष्टक रचलेले आहे. त्या अष्टकात त्यांनी या 'श्रीशैलस्थलवासिनी' देवीच्या चरणांवर आपल्या अपार श्रद्धेचा जणू अभिषेक केला आहे. 'ग' अक्षराच्या पुनरावृत्तीने अनुप्रास साधलेला पुढील श्लोक पाहा :

गायत्रीं गरुडध्वजां गगनगां गान्धर्वगानप्रियाम् ।
गम्भीरां गजगामिनीं गिरिसुतां गन्धाक्षतालंकृताम् ॥
गंगागौतमगर्गसंनुतपदां मां गौतमीं गोमतीम् ।
श्रीशैलस्थलवासिनीं भगवतीं श्रीमातरं भावये ॥

(श्रीशैलावर वास करणाऱ्या जगन्मातेचे मी चिंतन करतो. ती गायत्री आहे. तिच्या ध्वजावर गरुडाचे चिन्ह आहे. ती गगनात लीलया विहार करणारी आहे. तिला गंधर्वांचे गायन प्रिय आहे. ती गंभीर आहे. तिची गती हत्तीच्या गतीसारखी आहे. ती हिमगिरीची कन्या आहे. तिनें आपल्या भाळी गंधाक्षता लावलेल्या आहेत. गंगा, गौतम आणि गर्ग यांनी ती पूजिलेली आहे आणि तिला मा, गौतमी आणि गोमती या नावांनी संबोधिले आहे.)

श्रीशैल हे लिंगायतांचे एक प्रमुख केंद्र आहे. लिंगायत पंथाच्या पंचाचार्यांपैकी चौथे जे पंडिताराध्य त्यांचा मठ श्रीशैलावर होता. या पंचाचार्यांच्या पाच मठांना लिंगायत पंथात फार मान आहे. लिंगायतांच्या

येथील मठाचा शिलालेखीय उल्लेख ‘वीरशैव सिद्धि मठ’ अथवा ‘भिक्षाटनवृत्ति मठ’ या नावाने आढळतो. लिंगायत लोक येथील स्वयंभू शिवलिंगाला ‘लिंगचक्रवर्ती’ मानतात. पाताळगंगेच्या किनाऱ्यावरील प्रत्येक शिलाखंड त्यांच्या दृष्टीने शिवलिंगच असतो. ते शिवलिंग म्हणून येथील खडे चांदीच्या अथवा लाकडाच्या टोपणात बंद करून श्रद्धेने गळ्यात घालतात. लिंगायत पंथाच्या आद्य संतांपैकी अल्लमप्रभु, रेवणसिद्ध आणि अक्क महादेवी या तिघांनी श्रीशैलाच्या परिसरातील कदलीबनात समाधी घेतली, असे उल्लेख लिंगायतांच्या ग्रंथांत आढळतात. चौदाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत मल्लिकार्जुनाच्या उपासनेचे अधिकार जंगमांकडे होते. यावरून या स्थानी असलेल्या लिंगायतांच्या प्रभावाची कल्पना येऊ शकेल.

दत्तात्रेयाचे दुसरे अवतार आणि दत्तोपासनेचे संजीवक श्रीनरसिंह सरस्वती यांचे प्रयाण श्रीशैल–कदलीबनातच घडून आले. गुरुचरित्रात श्रीशैलाचा महिमा वर्णिण्यासाठी एक सबंध अध्याय ( ४३ वा ) रचलेला आहे. गुरुचरित्राच्या बावन्नाव्या अध्यायात श्रीनरसिंह सरस्वतींच्या श्रीशैलावरील प्रयाणाचे विस्तृत वर्णन आलेले आहे.

लौकिकार्य दाखवावयासी । निघाले आपण श्रीशैलासी ।<br>
कथा असे अतिविशेषी । सिद्ध म्हणे नामधारका ।।

असे या प्रसंगाचे महत्त्व गुरूचरित्रकारांनी सांगितले आहे. श्री. रा. चिं. ढेरे यांनी आपल्या “दत्तसंप्रदायाच्या इतिहासा” त या प्रसंगाचे हृदयंगम चित्र रेखाटले आहे. ते लिहितातः “ते शिष्यांसह श्रीशैलाकडे निघाले...इष्ट स्थळी पोचल्यावर ते सर्व पाताळगंगेच्या तीरावर उभे राहिले. पलीकडे मल्लिकार्जुन जणू त्यांना निमंत्रण देत उभा होता. त्यांनी शिष्यांना पुष्पासन करण्यास सांगितले. कर्दळीच्या पानावर शेवंतीचे नि कमळांचे आसन तयार झाले आणि तो


अमृताचा पुत्र कुसुमांच्या कोवळ्या आसनावर बसून पाताळगंगेच्या तरंगांवर तरंगत पैलतीराकडे जाऊ लागला. ते चिरपरिचित तेजोमय रूप हळूहळू धूसर दिसू लागले आणि काही क्षणांनंतर प्रकाशाच्या असीम अर्णवात लुप्त झाले. शिवाचा महान् उपासक शिवस्वरूपात एकाकार झाला. अमृताची पाऊलवाट पाताळगंगेने लाटांच्या हातांनी उरी साठविली.... "

श्रीशैलाचा महिमा असा अनेकविध आहे. आदिवासींचे श्रद्धास्थान, बौद्धधर्मीयांच्या योगसाधनेचे एक केंद्र, बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक प्रख्यात शिवस्थान, भ्रमरांबा देवीच्या वास्तव्यामुळे गाजत राहिलेले एक शक्तिपीठ, लिंगायतधर्मीयांचे एक पवित्र स्थान आणि दत्तावतार श्री नरसिंह सरस्वतींचे निर्याणस्थान असलेले हे श्रीशैल आजही भक्तभाविकांना आकर्षून घेत आहे. येथे नांदणारा श्री मल्लिकार्जुन शिव आजही हजारो भाविकांची हृदये उजळीत आहे. आपण आद्य शंकराचार्यांच्या शब्दांत त्याला वंदन करू या :

श्रीशैलशृंगे विविधप्रसंगे शेषाद्रिशृंगेपि सदा वसन्तम् ।
तमर्जुनं मल्लिकपूर्वमेनं नमामि संसारसमुद्रसेतुम् ।।

( जो श्रीशैल शिखरावर व शेषाद्रि शिखरावर सदा निवास करीत आहे आणि जो मानवांना संसारसागरातून तरून नेणारा सेतू आहे, त्या मल्लिकार्जुन शिवाला मी वंदन करतो. )

☆ ☆ ☆



## ३ : श्रीमहाकालेश्वर

श्री महाकालेश्वराचे स्थान माळव्यातील उज्जयिनी नगरीत आहे. उज्जयिनी ही नगरी एक सांस्कृतिक केंद्र म्हणून पुरातन काळापासून अत्यंत प्रसिद्ध आहे. प्राचीन काळी ही नगरी "उज्जयिनी" या नावाशिवाय स्वर्णशृंगा, कुशस्थली, पद्मावती, कुमुद्वती, अमरावती, विशाला इत्यादी अनेक गौरवपूर्ण नावांनी ओळखली जात होती, परंतु तिचे "अवन्ती" अथवा "अवन्तिका" हे नाव अतिशय प्रसिद्ध होते. एक प्रख्यात क्षेत्र म्हणून उज्जयिनीचा महिमा स्कंद पुराणातील अवन्तीखंडात विस्ताराने आलेला आहे. तसेच, महाभारत, मत्स्यपुराण, नृसिंहपुराण इत्यादी अनेक पौराणिक ग्रंथांतून येथील शिवस्थानाची प्रसिद्धी वर्णिलेली आहे. महाराष्ट्रात घरोघरी वाचल्या जाणाऱ्या श्रीधरस्वामींच्या "शिवलीलामृता"तही महाकालेश्वराचा महिमा गायिलेला आहे.

पुराणांच्या म्हणण्यानुसार महाकालेश्वराच्या मंदिराची पहिली उभारणी देवांचा शिल्पी विश्वकर्मा याने केली. वत्सराज उदयन आणि

वासवदत्ता यांची प्रमकथा उज्जयिनीशीच निगडीत आहे. वासवदत्ता ही उज्जयिनीचा राजा प्रद्योत याची कन्या. उज्जयिनीतील वृद्ध नागरिक शिळोप्याच्या वेळी परस्परांना उदयन–वासवदत्तेच्या कथा सांगतात. असे कालिदासाने "मेघदूता"त म्हटले आहे. प्रद्योतानंतर दोन-तीन शतकांनी ही नगरी मौर्यांच्या शासनाखाली आली. बिंदुसाराच्या राज्यकालात त्याचा पुत्र अशोक हा उज्जयिनी विभागाचा अधिकारी होता. अशोकाच्या राज्यकालात उज्जयिनीत बौद्ध धर्माचा प्रसार झाला, त्याचबरोबर व्यापार व विद्या यांनाही उत्तेजन मिळाले. मौर्यांच्या अस्तानंतर हे स्थान शुंगांच्या स्वामित्वाखाली आले. शुंगकालात येथील बौद्धधर्माचा पगडा कमी होऊन हिंदू धर्म पुनश्च बळावला. शुंगांनंतर मालवगण, त्यांच्यानंतर शक आणि शकांच्या नंतर गुप्त राजे आले. शक राजांनीही उज्जयिनीच्या वैभववृद्धीत वाटा उचलला. त्यांच्याच काळात येथे प्रसिद्ध ज्योतिर्गणिती वराहमिहिर याने वेधशाळा सुरू केली. इसवी सनाच्या चौथ्या शतकात गुप्त सम्राट चंद्रगुप्त विक्रमादित्य याने शकांना परास्त करून उज्जयिनी हीच आपली राजधानी बनविली. विक्रमादित्य हा जसा पराक्रमी होता, तसाच विद्वान व रसिकही होता. त्याने उज्जयिनीचे वैभव सर्व अंगांनी वाढविले. त्याच्या काळात येथे भौतिक समृद्धीबरोबर धर्म, विद्या आणि कला यांचाही विकास घडून आला. या राजांच्या आश्रयानेच कविकुलगुरू कालिदासाचे साहित्य उज्जयिनी येथे निर्माण झाले. गुप्तांच्यानंतर हे स्थान हर्षवर्धनाच्या राज्यात गेले. हर्षानंतर प्रतीहार आणि परमार वंशातील राजे झाले. परमारांच्या राज्यकालातच तेराव्या शतकात मुसलमानांची धाड उज्जयिनीवर आली आणि तेव्हापासून दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडलेली उज्जयिनी पुढे पाच शतकांनी मराठ्यांनी मुक्त केली.

क्षिप्रेच्या पूर्वतीरावर वसलेली ही नगरी अशी इतिहासप्रसिद्ध आहे.

हिने अनेक राजकुले पाहिली आहेत, अनेक पंडितांना पोसले आहे आणि अनेक कवी कलावंतांना अंगाखांद्यावर खेळविले आहे. मध्यंतरी काही शतके विपरीत गेली हे खरे, परंतु त्या विपरीत स्थितीतही आपल्या पूर्व वैभवाच्या आठवणी जतन करून आणि आपला सांस्कृतिक वारसा सांभाळून तिने पुनः मान वर केली आणि विकासाची वाटचाल सुरू केली.

पुराणात, काव्यनाटकात आणि इतिहासात असे चिरंतन स्थान प्राप्त केलेल्या उज्जयनीत श्रीमहाकालेश्वर विराजत आहे. या ज्योतिर्लिंगाचा महिमा महाभारताच्या वनपर्वात गायिलेला आहे; तसेच स्कंद, मत्स्य व नृसिंह या पुराणांनीही गायिलेला आहे. आपल्या मराठी भाषेत श्रीधर स्वामींनी शिवलीलामृतात महाकालेश्वराचे माहात्म्य वर्णन केलेले आहे. प्राचीन वाङ्मयात महाकालेश्वराच्या मंदिराचे वैभवशाली स्वरूप आढळते. सोन्याचांदीने आणि हिरेमाणकांनी शृंगारलेले ते प्रकाशमान मंदिर किती प्रेक्षणीय असेल याची आज केवळ कल्पनाच करावयाची. द्वितीय चंद्रगुप्त विक्रमादित्याच्या काळातही महाकालेश्वर मंदिराचे वैभव असेच अपार होते. महाकवी कालीदास याच काळात उज्जयिनी येथे नांदत होता. त्याच्या ग्रंथात शिवाच्या सायंकालीन आरतीच्या समारोहाचे उल्लेख आढळतात. विक्रमादित्यानंतर परमार राजा भोज याने या देवस्थानचा विकास करण्यात मोठा वाटा उचलला. त्याच्या काळात देवस्थान फारच भरभराटीस आले. पुढे इ. स. १२३५ मध्ये शमशुद्दीन अल्तमश याने हे मंदिर उद्ध्वस्त केले आणि महाकालेश्वराचे लिंग कोटितीर्थात फेकून देऊन व मंदिराची मशीद बनवून अगणित लूट नेली. त्यानंतर शतके लोटली. मराठ्यांनी भारताच्या सर्व भागात आपला वचक बसविल्यावर पेशव्यांचे सरदार राणोजी शिंदे यांचे दिवाण रामचंद्रबाबा शेवणी यांनी येथील मशीद पाडून पुनः तेथे

महाकालाचे मंदिर उभारले व कोटितीर्थात पडलेल्या शिवलिंगाची प्राणप्रतिष्ठा केली. रामचंद्रबाबांनी उभारलेल्या या मंदिराचे महाद्वार दक्षिणाभिमुख आहे. उरलेल्या तीन बाजूंना सोपे आहेत. या सोप्यांचा उपयोग यांत्रिक धर्मशाळेप्रमाणे करतात. महाद्वारासमोर नंदी आहे. गाभाऱ्यात संगमरवरी फरशी आहे. महाकालेश्वराचे लिंग शाळिग्राम-शिळेचे असून, त्यावर चांदीचा पत्रा मढविलेला आहे. देवाच्या मागच्या बाजूच्या कोनाड्यात पार्वती आणि दोन्ही बाजूंच्या कोनाड्यात गणेश व कार्तिकेय या दोन शिवपुत्रांच्या मूर्ती आहेत. गाभाऱ्यात एक तेलाचा व दुसरा तुपाचा असे दोन नंदादीप सदैव उजळलेले असतात. त्या नंदादीपांच्या प्रकाशात श्रीमहाकालेश्वराचे दर्शन घेताना यात्रिकांचे मन प्रसन्न होते.

देवाच्या रोजच्या उपासनेत एकूण चार पूजा असतात. पहाटेच भस्म-पूजा होते. पंचोपचारांनी पूजा केल्यावर शिवलिंगावर चिताभस्माचे लेपन करतात. म्हणून या पूजेस भस्मपूजा असे म्हणतात. भस्मपूजा झाल्यावर काकडआरती होते. पुढे सूर्योदयानंतर, मध्यान्हकाली आणि सायंकाळी अशा आणखी तीन वेळी पूजा होते. महाद्वारावर दर दोन प्रहरांच्या अंतराने चौघडा झडत असतो. हा चौघडा ग्वाल्हेरच्या महाराजांतर्फे आहे. सोमवार हा शिवाचा वार. या वारी रोजच्या पेक्षा दर्शनार्थींची अधिक गर्दी असते. श्रावणी सोमवारी सायंकाळच्या वेळी पालखीतून देवाच्या उत्सवमूर्तीची मिरवणूक निघते. ही पालखी वाजतगाजत नदी-काठी जाते आणि तेथे क्षिप्रादेवीची भेट झाल्यावर गोपाळकृष्णमंदिरावरून बाजारातून मिरवत पालखी परत स्वस्थानी येते. दसऱ्याच्या दिवशी देव पालखीतून सीमोल्लंघनाला जातो. तसेच, वैकुंठ चतुर्दशीचा हरिहरांच्या भेटीचा सोहळाही पाहण्यासारखा असतो. या सोहळ्याची प्रथा महाराणी बायजाबाई शिंदे यांनी सुरू केली आहे. या दिवशी गोपाळकृष्ण व

महाकालेश्वर पालखीतून वाजत-गाजत परस्परांच्या भेटीसाठी परस्परांच्या मंदिरात जातात आणि अनुक्रमे बिल्वपत्र व तुलशीपत्र यांनी परस्परांचे पूजन करतात. महाशिवरात्रीचा महोत्सव साजरा करण्यासाठी तर लाखांनी यात्रा लोटते. हा उत्सव माघ वद्य षष्ठीपासून चतुर्दशीपर्यंत नऊ दिवस चालतो. शिवरात्रीच्या दिवशी मंदिराचा परिसर यात्रिकांच्या गर्दीने गच्च भरलेला असतो. महाकालेश्वरावर बिल्वदलांचा खच पडत राहतो आणि एकादशण्या मात्र बाहेर कोटेश्वराच्या लिंगावर होत राहातात. या दिवशी प्रदोषपूजेनंतर शेजारतीचा कार्यक्रम न होता रात्री महापूजा होते. ही महापूजा पाहण्यासाठी यात्रिक मंदिरात गर्दी करीत असतात. रात्री दहाच्या सुमारास प्रथम पंचामृतपूजा होते. त्यानंतर नाना प्रकारच्या धान्यराशींनी, फुलांच्या आकर्षक मुकुटाने शिवलिंग सुशोभित करतात. ही धान्यपूजा व पुष्पपूजा प्रेक्षणीय असते. दुसऱ्या दिवशी सूर्योदय होईपर्यंत ही पूजा पाहण्यासाठी लोक एकसारखे येत असतात. दुसऱ्या दिवशी सकाळी नऊच्या सुमारास ही महापूजा विसर्जित होऊन नित्याची भस्मपूजा होते.



महाकालेश्वरमंदिर उज्जैन

शिवरात्रीच्या उत्सवाशिवाय उज्जयिनीत आणखी दोन [illegible] मंदिरात होतात : एक गंगादशहराउत्सव आणि दुसरा गणपति [illegible]


पहिला उत्सव ज्येष्ठ शुद्ध प्रतिपदेपासून दशमी-पर्यंत दहा दिवस पिशाचमोचनतीर्थ, रामघाट, उदासीमठाखालचा भाग आणि गंधर्वतीर्थ अशा चार ठिकाणी होतो. नित्य कीर्तन, मंत्रजागर, ब्राह्मणभोजन अशा कार्यक्रमांनी हा उत्सव साजरा होतो. गणेशोत्सव भाद्रपदात दहा दिवसापर्यंत गोपाळमंदिरात होतो; आणि शेवटच्या दिवशी गणेशविसर्जनाची मिरवणूक वाजत-गाजत नदीवर जाते.

या महोत्सवाप्रमाणे येथे विशेष पर्वणीच्या वेळी लहान-मोठे मेळे भरतात. गणगौरीचा मेळा ( चैत्र शु. ३ ). वैशाखी स्नानाचा मेळा ( वैशाख शु. १५ ), फूलडोलाचा मेळा ( भाद्रपद शु. ११ ), कार्तिकी मेळा ( कार्तिक शु. १५ ), निशाणाचा मेळा ( फाल्गुन व. ५ ) इत्यादी मेळे येथे भरतात. या सर्व मेळ्यांहून अतिशय मोठा मेळा म्हणजे सिंहास्थानचा मेळा होय. हा दर बारा वर्षांनी गुरू सिंह राशीत असताना वैशाखी पौर्णिमेस क्षिप्रेच्या काठी भरतो. या मेळ्यासाठी अनेक बैरागी, साधुसंत आणि भाविक यात्रिक यांची यात्रा आठ लाखांवर जमते.

उज्जयिनींत इतकी मंदिरे आहेत की, तिला मंदिरांची नगरी म्हणजे यथार्थ होईल. उज्जयिनीत चौऱ्यायशी सिद्धलिंगे आहेत; या सिद्धलिंगां-व्यतिरिक्त आणखीही पंचवीस-तीस शिवालिंगे आहेत; एकादश रुद्रांची स्थाने आहेत. तसेच गणेश, देवी, अष्टमातृका, अष्टभैरव, विष्णु, नवग्रह, मारुती इत्यादी देवतांचीही अनेक स्थाने आहेत.

या मंदिरांपैकी काही मंदिरे विशेष प्रसिद्ध आहेत. हरसिद्धि देवी, गोपाळकृष्ण, अंगारकेश्वर, महाकाली आणि कालभैरव या देवांची मंदिरे यात्रिकांनी टाळता कामा नयेत. हरसिद्धिदेवीचे मंदिर जोगीपुऱ्यात रुद्रसागर तीर्थाच्या पश्चिम काठावर आहे. हे मंदिर दगडी कोटाच्या कोटाला सर्व दिशांनी प्रवेशद्वारे आहेत. मंदिर हेमाडपंती पूर्वाभिमुख आहे. मुखमंडप, सभामंडप आणि गर्भगृह

३०८२२ १७।२।६५ ३४५



हरसिद्धीदेवीमंदिर, उज्जैन

अशा तीन भागांचे मंदिर आहे. मंदिरात देवीची मूर्ती नसून एका शिलासनावर श्रीयंत्र कोरलेले आहे. जवळच अन्नपूर्णेची मूर्ती आहे. येथे नवरात्राचा उत्सव गाजतो. ही देवी विक्रमादित्य राजाला प्रसन्न होती, असे सांगतात.

महाराणी बायजाबाई शिंदे यांनी बांधलेले गोपालकृष्णाचे मंदिर उज्जयिनीत प्रसिद्ध आहे. हे मंदिर सराफ पेठेसमोर आहे. गर्भगृह आणि त्यावरील शिखर संगमरवरी असून बाकीचे मंदिर काळ्या कुरुंदाचे बांधलेले आहे. पूर्वाभिमुख महाद्वारावर नगारखाना आहे. या मंदिराच्या गाभाऱ्याचे दार दुहेरी आहे. आतील दार चांदीच्या पत्र्याने मढविलेले असून बाहेरील दार चांदीच्या चौकटीत बसविलेल्या रंगीत दगडांचे आहे. गाभाऱ्यात मध्ये गोपालकृष्ण, डावीकडे राधा व उजवीकडे शंकर अशा मूर्ती आहेत. याशिवाय या मूर्तित्रयाच्या डावीकडे गरुड असून उजवीकडे स्वतः बायजाबाईची संगमरवरी प्रतिमा आहे. येथील नित्यनैमित्तिक उपासनाक्रम थाटामाटाचा आहे. गोकुळअष्टमी, गोवर्धनोत्सव आणि वैकुंठचतुर्दशी हे या मंदिरात गाजणारे उत्सव आहेत.


नगराच्या उत्तरेस सुमारे दीड मैल अंतरावर अंकपाद नावाचे एक पवित्र स्थान आहे. या भागात भगवान् श्रीकृष्णांचे गुरू सांदीपनी यांचा आश्रम होता. अध्ययन संपल्यानंतर श्रीकृष्णाने गुरूदक्षिणा म्हणून सांदीपनींचा पुत्र शोधून परत आणला आणि त्या पवित्र आश्रमभूमीत आपली आठवण म्हणून हे अंकपाद तीर्थ निर्माण केले. अंकपादाच्या ईशान्य दिशेस सांदीपनींच्या आश्रमाचे स्थान आहे. तेथे त्यांची मूर्ती स्थापिलेली आहे. शेजारीच असलेल्या कुंडेश्वरनामक शिवमंदिरात श्रीकृष्ण, बलराम, सुदामा व सांदीपनींचा पुत्र अशा चार मूर्ती आहेत. आश्रमासमोर गोमतीकुंड आहे. भगवान् श्रीकृष्णांच्या विद्यार्थीदशेतील आठवणी हृदयी साठवणारी आणि त्यांच्या संचाराने पावन झालेली ही भूमी पाहून भाविकांचे हृदय श्रद्धेने ओतप्रोत होऊन जाते.

अंकपादाच्या पुढे मंगलतीर्थाजवळील गंगाघाटावर असलेले मंगलेश्वराचे अथवा अंगारकेश्वराचे मंदिर प्रशांतरम्य आहे. दगडी कोटात असलेले हे मंदिर लहानसे असले, तरी तेथील:एकान्त आणि क्षिप्रेच्या प्रवाहाचे रम्य दृश्य मनाला मोहून टाकणारे आहे.

महाकवी कालिदासाने ज्या काली देवीची उपासना केली असे सांगतात, त्या महाकालीचे स्थान नगराच्या उत्तरेस आहे. हे पुरातन मंदिर एका उंचवट्यावर असल्यामुळे ते "गडावरील कलिका" या नावाने ओळखले जाते. हर्षाच्या काळापासून प्रसिद्ध असलेल्या या स्थानीचे मंदिर घोटीव काळ्या शिळांचे आहे. खांबांवर नक्षी कोरलेली आहे. या मंदिरातील महाकालीचे ध्यान अत्यंत उग्र आहे. तिच्याजवळ चामुंडा व गिरीश-रुद्र यांच्या मूर्ती आहेत. नवरात्रात येथे नऊ दिवस उत्सव चालतो.

नगराच्या उत्तरेकडेच दोन-अडीच मैल अंतरावर भैरवगड नावाच्या वस्तीत कालभैरवाचे स्थान आहे. या वस्तीच्या नैर्ऋत्य दिशेस नदीच्या

उत्तरकाठावर कालभैरव मंदिर आहे. मंदिर पक्क्या कोटाच्या आत असून पश्चिमाभिमुख आहे. येथील उत्सव कालाष्टमीच्या म्हणजे कार्तिक वद्य अष्टमीच्या दिवशी होतो.



क्षिप्रातीरावरील घाट, अवंतिका

उज्जयिनीतील पवित्र स्थानात या अनेक देवदेवतांच्या मंदिरांप्रमाणेच अनेक जलतीर्थे आहेत. क्षिप्रेच्या प्रवाहात एकूण अठ्ठावीस तीर्थे आहेत. नदीत स्नानादी विधी करण्यासाठी संपन्न धार्मिकांनी आणि राजेरजवाड्यांनी प्रशस्त घाट बांधलेले आहेत. तसेच गावात रुद्रसागर, पुष्करसागर, क्षीरसागर, गोवर्धनसागर, रत्नाकरसागर, विष्णुसागर आणि पुरुषोत्तमसागर हे सप्तसागर ( तीर्थे ) प्रसिद्ध आहेत. याशिवाय अनेक पवित्र कुंडे येथे दाखविली जातात.


येथवर भक्त–भाविकांच्या दृष्टीतून उज्जयिनीतील पवित्र स्थानांचा परिचय आपण स्थूलपणे करून घेतला. परंतु केवळ हौशी प्रवाशांनाही दर्शनीय वाटणारी काही स्थाने येथे आहेत. भैरवगडाच्या पुढे सुमारे दोन मैल अंतरावर नदीच्या प्रवाहात “ कालियादेह ” या नावाचा एक

डोह आहे. या डोहाच्या पुढे प्रवाहात एक बेट आहे. या बेटावर पूर्वी एक सुंदर सूर्यमंदिर होते. परंतु माळव्याचा सुलतान नासिरुद्दीन खिलजी याने हे मंदिर पाडले आणि त्या जागी आपल्या विलासोपभोगांसाठी एक महाल बांधला. हा महाल "कालिया देहाचा महाल" या नावाने ओळखला जातो. या महालाच्या बांधणीत पूर्वीच्या मंदिराच्या घडणी-तले अनेक शिल्पसुंदर पाषाण आजही दिसतात. अलीकडे श्रीमंत माधवराव शिंदे यांनी या महालाचा जीर्णोद्धार करून तेथे आपले निवासस्थान बनविले होते.

उज्जयिनीतील वेधशाळाही पाहण्यासारखी आहे. जयपूरचा राजा सवाई जयसिंह याने अठराव्या शतकात बांधलेली ही वेधशाळा नगराच्या दक्षिणेस नदीकाठच्या एका उंचवट्यावर आहे. या वेधशाळेत दगड, विटा व चुना यांच्या साहाय्याने बांधलेली सम्राटयंत्र, नाडीवलययंत्र, दिगंशयंत्र, व भित्तियंत्र अशी (म्य) चार यंत्रे आहेत. या यंत्रांच्या सहाय्याने ग्रहांचे वेध घेऊन स.२ जयसिंहाने ग्रंथरचना करविली होती. ज्योतिर्विद्येचे प्राचीन केंद्र असलेल्या उज्जयिनीत उभी असलेली ही अलीकडची वेधशाळा आपल्या जुन्या ज्ञानपरंपरेची स्मृती जागवणारी आहे.

अशी ही उज्जयिनी आहे–धर्म, ज्ञान आणि कला यांची त्रिवेणी! येथील श्री महाकालेश्वराच्या दर्शनाने या नगरीचा सर्व वैभवशाली इतिहास आपल्या डोळ्यांसमोर तरळतो आणि विपत्तींवर मात करून चिरंतन यश मिळविणारी निष्ठा आपल्या मनात उदित होऊ लागते. अनेक स्थित्यन्तरांतून प्रवास करून पुनः विकासोन्मुख झालेल्या क्षिप्रेकाठच्या या नगरीकडे पाहिले की वाटते : खरोखरच श्रीमहाकालेश्वराच्या चरणी कालपुरुष नतमस्तक होऊन राहिला आहे!

☆ ☆ ☆



## ४ : श्रीओंकार-अमलेश्वर

बारा ज्योतिर्लिंगांतील चौथे ज्योतिर्लिंग ओंकार–अमलेश्वर हे आहे. हे ज्योतिर्लिंग माळव्यातील निमाड जिल्ह्यात नर्मदा नदीच्या काठी आहे. हे क्षेत्र ओंकारजी, ओंकारमांधाता किंवा मांधाता या नावांनी ओळखले जाते. हे इंदूर–खांडवा लोहमार्गावरील ओंकारेश्वर रोड रेल्वे स्टेशनपासून पाच मैल अंतरावर आहे. हे क्षेत्र तसे नर्मदा नदीच्या काठावर नसून प्रवाहातील बेटावर आहे. हे ओंकाराच्या आकाराचे बेट सुमारे दीड मैल लांबीचे असून ते टेकड्यांनी व्यापलेले आहे. या बेटाच्या मधून दक्षिणो-

त्तर दरी असल्यामुळे बेटाचे दोन भाग पडलेले दिसतात. सर्वत्र गर्द तरुवेलींची दाटी असल्यामुळे या क्षेत्राला नैसर्गिक रमणीयता प्राप्त झालेली आहे. येथील झाडीत वानरे पुष्कळ आहेत. भोवती वाहणारा जलप्रवाह, टेकडयांची शिखरे, त्यांवरील निसर्गश्री आणि पार्श्वभूमीवर उंचावलेले मंदिरांचे कळस दुरून पाहताच यात्रिकाच्या चित्तवृत्ती प्रारंभीच प्रसन्न होतात. शिवदर्शनासाठी त्याचे हृदय आतुर बनते.

नर्मदेच्या दक्षिण तीरावर मांधाता हे गाव वसलेले आहे. बेट आणि गाव यांच्यामध्ये वाहणाऱ्या नर्मदेच्या प्रवाहात शेकडोहजारो मासे आहेत; तसेच मगरीही आहेत. दोन्ही तीरांना प्रचंड असे हिरवट रंगाचे खडक आहेत. मांधाता हे गाव आज लहानसेच दिसत असले, तरी त्याच्या परिसरातील प्राचीन अवशेषांचे दर्शन झाले म्हणजे आपल्याला कळून चुकते की, कोणे एके काळी ही वैभवशाली नगरी असली पाहिजे. आजही हे लहानसे गाव आणि बेट आपले मन:वेधून घेते. खडकांच्या क्रमाने उतरत जाणाऱ्या पायऱ्यांसारख्या भागांवर उभ्या असलेल्या घरांच्या रांगा आणि अधून मधून झळकणारे मंदिरांचे कळस आपल्या मनाला भुरळ घालतात. बेटाच्या वरच्या भागात कावेरी नावाची एक लहानशी नदी नर्मदेला येऊन मिळते. लोकांची अशी समजूत आहे की, कावेरी जरी नर्मदेला मिळाली असली, तरी तिचे पाणी नर्मदेच्या पाण्यात मिसळत नाही. तुम्ही संगमावर नारळ अर्पण केला, तर तो ज्या नदीला अर्पण करण्याचा संकल्प केला असेल, तिच्याच पाण्यातून वाहत जातो असे म्हणतात.

मांधाता क्षेत्राचे तीन भाग ( त्रिपुरी ) मानतात. बेट हे 'शिवपुरी' या नावाने ओळखिले जाते. दक्षिण तीरावरील वसती 'ब्रह्मपुरी' आणि 'विष्णुपुरी' अशा दोन भागात विभागलेली असून, त्या दोन भागातून 'कपिला' नावाचा एक लहानसा प्रवाह वाहत जाऊन नर्मदेला

मिळतो. खरे म्हणजे ‘ विष्णुपुरी ’ पूर्वी नर्मदेच्या उत्तर तीरावर असली पाहिजे, असे तेथील अवशेषांवरून दिसून येते.

बेटावर प्राचीन काळी वस्ती होती. त्या वस्तीचे अवशेष आपणास आजही दिसतात. जुन्या किल्ल्याचे दोन प्रेक्षणीय दरवाजे अजूनही उभे आहेत. या भागात ऋणमुक्तेश्वर, गौरीसोमनाथ आणि सिद्धनाथ अशी तीन भव्य मंदिरे आहेत. असे सांगतात की, येथे येणाऱ्या यात्रिकांना कालिकादेवीचे भैरवगण अत्यंत उपद्रव देत असत. यात्रिकांना धरून आणून कालिकादेवीला मनुष्यबळी देण्याचे त्यांचे सत्र अव्याहत चालत असे. पुढे बाबा दरियाईनाथ नामक सिद्धपुरुष येथे आला आणि त्याने कालिकादेवीस प्रसन्न करून घेतले. त्याने देवीला नित्य बळीऐवजी नैमित्तिक बळी घेण्याचे सांगून तेथे आपली गादी स्थापन केली आणि यात्रिकांना अभय प्राप्त करून दिले. बाबा दरियाईनाथाच्या या कामगिरीमुळे पुनः येथे माणसांचा वावर निर्भयपणे सुरू झाला. बाबाने येथे जेव्हा गादी स्थापन केली त्या वेळी नत्थू नामक भिल्ल राजा राज्य करीत होता. इ. स. ११९५ मध्ये भारतसिंह चौहान नामक राजाने भिल्लांचे राज्य जिंकून घेतले. आज मांधाता क्षेत्रात त्याचेच वंशज ‘ राजे ’ या बिरुदासह नांदत आहेत. त्यांचा येथे राजवाडा आहे.

यात्रिक विष्णुपुरीमध्ये येऊन पोचल्यावर नावेत बसतात आणि नावेतून त्रिपुरीतील देवांना वंदन करून चक्रतीर्थ घाटावर उतरतात. येथे मठ, धर्मशाळा आणि पंड्यांची घरे यात्रिकांच्या निवासासाठी आहेत. पंड्यांकडे उतरून यात्रा यथासांग पार पाडावयाची असेल, तर तीन दिवसांचा विधियुक्त यात्राक्रम ठरलेला आहे. पंड्ये तो यथाविधि करवितात.

नावेतून जात असतांना यात्रिक नर्मदेचे स्तोत्र गाऊ लागतात. नर्मदामाईच्या त्या प्रसन्न आणि पावन प्रवाहातून शिवदर्शनासाठी जात

असताना यात्रिकांची हृदये त्या लोकमातेविषयीच्या कृतज्ञतेने उचंबळून आल्यावाचून राहात नाहीत. आद्य शंकराचार्यांनी भक्तिभराने गायिलेले नर्मदास्तोत्र अत्यंत सुमधुर आहे :

महागभीरनीरपूरपापधूतभूतलं
ध्वनत्समस्तपातकारिदारितापदाजलम् ।
जगल्लये महाभये मृकंडुसूनुहर्म्यदे
त्वदीयपादपंकजं नमामि देवि नर्मदे ॥

नर्मदेच्या महागंभीर जलराशीने भूतलावरील पापे धुवून टाकली आहेत, त्याचप्रमाणे आपदांचेही निवारण केले आहे, अशी आचार्यांची श्रद्धा आहे. त्याचमुळे ते मृकंडुऋषींची कन्या असलेल्या अभयदायिनी नर्मदामाईच्या पादपंकजाभोवती भ्रमर होऊन गुंजारव करीत आहेत. नर्मदामाईने आजवर अनेक आत्म्यांना अशीच दिव्य प्रेरणा दिली आहे.

मांधाता क्षेत्रात अनेक महत्त्वपूर्ण मंदिरे आहेत. ही बहुतेक जुनी मंदिरे मध्ययुगीन ब्राम्हणी वास्तुपद्धतीची आहेत. बेटावरील मंदिरांपैकी अत्यंत महत्वाचे मंदिर सिद्धनाथाचे आहे. हे बेटाच्या पूर्वेकडील भागात आहे. हे मंदिर जुन्या वास्तुशिल्पाचा नमुना म्हणून पाहण्यासारखे आहे. त्याचा चौथरा उंच असून चौथऱ्यावर सर्व बाजूंनी पाच फूट उंचीचे व विविध प्रकारचे हत्ती कोरलेले आहेत. त्यामुळे सर्व मंदिर अनेक हत्तींनी आपल्या पृष्ठांवर सावरले असल्याचा भास होतो. काही हत्ती परस्परांशी झुंज खेळत आहेत, तर काही आपला एक पाय माणसाच्या आकृतीवर ठेवून उभे आहेत. आज हे बहुतेक हत्ती खराब झालेले आहेत. यातील काही काढून नेलेले आहेत. त्यांपैकी दोन नागपूरच्या वस्तुसंग्रहालयात दर्शनी भागी आहेत. मंदिराच्या सभामंडपाला दोन्ही बाजूंनी दारे असून, पुढे चौदा फूट

उंचीच्या अठरा नकशीदार खांबांवर उभा असलेला मुखमंडप आहे. मंदिरातील अनेक खांब पडलेले आहेत. मूळचे शिखरही गेले आहे. असे सांगतात की, या मंदिराच्या शिखरावरून मांडवगढचे दिवे दिसत असत. हे मंदिर जेव्हा पूर्ण स्थितीत असेल, तेव्हा त्याच्या दर्शनाने यात्रिकांच्या डोळ्यांची धणी पुरत असेल. इ. स. १९०५ मध्ये हे मंदिर पाहण्यासाठी त्या वेळचे हिंदुस्थानचे व्हॉईसरॉय लॉर्ड कर्झन आले असताना त्यांना एका दगडी पेटीत एक प्राचीन ताम्रपट आढळला. हा ताम्रपट भाद्रपद शु. १५ विक्रम संवत, १२८२ मधील आहे. या दिवशी राजा देवपालदेवाने चद्रग्रहणाच्या पर्वणीनिमित्त मथुर आदी ठिकाणच्या बत्तीस ब्राम्हणांना जुनागावचे काही हिस्से दान केल्याची नोंद या ताम्रपटात आहे. सध्या हा ताम्रपट नागपूर वस्तुसंग्रहालयात आहे. सिद्धनाथ-मंदिराजवळच 'वीरखला' नावाचे स्थान आहे. येथून सव्वाशे फूट उंचीवरून खाली उडी घेऊन देहत्याग करण्याची प्रथा होती. इंग्रजी अधिकाऱ्यांनी आणि प्रवाशांनी याची वृत्ते नोंदवून ठेवली आहेत. आता ही प्रथा बंद झालेली आहे.

बेटाच्या उत्तर भागात गौरीसोमनाथाचे प्राचीन मंदिर आहे. हे विशाल मंदीर नक्षत्राकृती बांधणीचे आहे. या मंदिरातील शिवलिंग प्रचंड असून ते घोटीव गंडकी शिळेचे आहे. याला स्थानिक लोक 'मामाभाच्यांची पिंडी' असे म्हणतात. या नावामागे समजूत अशी आहे की, दोन बरोबरीच्या पुरुषांनी आपल्या हाताने या लिंगाला कवळण्याचा प्रयत्न केला, तरी ते कवेत मावत नाही; परंतु जर बरोबरीच्या वयाचे सख्खे मामाभाचे असतील, तर त्यांच्या कवेत ते मावते. याच लिंगाच्या बाबतीत आणखीही अशी आख्यायिका आहे की, हे लिंग ('सोमनाथ' नावाला साजेल असे) शुभ्र रंगाचे होते. त्यात दर्शनार्थीला आपल्या तीन (पूर्वीच्या, सध्याच्या आणि पुढच्या)

जन्मांची रूपे दिसत असत. एकदा औरंगजेब बादशहा येथे आला असता त्याने या ख्यातीची परीक्षा पाहण्यासाठी लिंगाचे दर्शन घेतले; तो त्याला आपला भावी जन्म डुकराचा आहे असे दिसले. त्यामुळे त्याने चिडून जाऊन मंदिराला आग लावून दिली. त्या आगीत लिंग काळे पडून तडकले आहे, असे सांगितले जाते.

येथील ओंकारेश्वराचे मंदीर भव्य आणि उत्तुंग आहे. याचे स्तंभ प्रचंड आहेत. प्रांगण प्रशस्त आहे. मंदिराचे हे स्तंभ पुरातन असले तरी बाकीची बांधणी फारशी जुनी जाणवत नाही. गाभाऱ्यातील लिंग खोलगट शाळुंकेत आहे. या खोलगट भागात पाणी असून ते नेहमी एकाच पातळीत राहते. या पाण्यावर अनेकदा बुडबुडे उठतात. हे बुडबुडे उठणे शिवाच्या संतोषाचे द्योतक मानले जाते. दैत्यांनी पराभूत केलेल्या देवांना पुनः बल प्राप्त करून देण्यासाठी जे ज्योतिर्मय ॐकार-स्वरूपी लिंग पाताळातून उद्भवले, तेच हे ओंकारलिंग होय, असा पुराणांचा अभिप्राय आहे. पुढे सूर्यवंशातील यौवनाश्व राजाचा तपस्वी पुत्र मांधाता याने येथे शंभर यज्ञ करून शिवाला प्रसन्न केले. म्हणून या क्षेत्रास ‘ ओंकार मांधाता ’ असे नाव पडले.

ओंकारेश्वराचे त्रिकालपूजन होते. प्रातःकाली स्थानिक राजेसाहेबांतर्फे भस्मपूजा होते, मध्यान्हकाली ग्वाल्हेरच्या राजेसाहेबांतर्फे पूजा व महानैवेद्य होतो आणि रात्रीची शयनार्तिपूजा इंदूरच्या होळकरांतर्फे होते. शिवाय अन्नछत्र, नौबतखाना व घडयाळघरही येथे आहे. दर सोमवारी शिवाची उत्सवमूर्ती सुवर्णाचा पंचमुखी मुखवटा चढवून पालखीतून मिरविली जाते. ही मिरवणूक प्रेक्षणीय असते. येथे वैशाखमास, श्रावणमास, कार्तिकी पौर्णिमा आणि महाशिवरात्र या वेळच्या चार यात्रा प्रसिद्ध आहेत. पैकी महाशिवरात्रीची यात्रा सर्वांत मोठी असून, तिच्या खालोखाल कार्तिकी पौर्णिमेची यात्रा भरते.

बेटाच्या पश्चिमेकडील कडेला ऋणमुक्तेश्वराचे मंदीर आहे. या शिवलिंगापुढे मूठभर धान्य वाहिल्यामुळे आपण फेडू न शकलेल्या ऋणाच्या पापातून माणूस मुक्त होतो, अशी भाविकांची श्रद्धा चालत आलेली आहे.

मांधाता क्षेत्राच्या दक्षिण तीरावरील भागातील प्रख्यात मंदीर म्हणजे अमलेश्वराचे किंवा अमरेश्वराचे होय. ओंकारेश्वराइतकेच अमलेश्वराचेही माहात्म्य आहे. त्यामुळेच आपण 'ओंकारममलेश्वरम्' असा या दोन्ही शिवस्थानांचा जोड उल्लेख करीत असतो. हे मंदीर एक हजार वर्षांहूनही प्राचीन आहे, असे आतील शिलालेखांवरून दिसते.

या मंदिरातील मंडपाच्या भिंतीवर आतील बाजूंनी (शिव आणि नर्मदा यांची) चार संस्कृत स्तोत्रे कोरलेली आहेत. (या चार संस्कृत स्तोत्रांत पुष्पदंताचे प्रसिद्ध असे महिम्नस्तोत्रही कोरलेले आहे.) येथील शिवोपासनेचे वैशिष्टय असे की, इंदूर दरबारतर्फे नियुक्त केले गेलेले बावीस ब्राह्मण रोज येथे येतात. त्यांच्या हाती लाकडी फलक असतात. या एकेका फलकाला सुमारे तेराशे छिद्रे असतात. ते या छिद्रांतून मृत्तिकेच्या पार्थिव लिंगांची स्थापना करतात आणि मग त्या सुमारे तीस हजार पार्थिव लिंगांची पूजा करून त्यांचे नर्मदेच्या प्रवाहात विसर्जन करतात. अमलेश्वराच्या मंदिराजवळच जे वृद्धेश्वराचे मंदीर आहे, त्याचे प्रवेशद्वार अतिशय सुंदर कोरीव कामाने सजविलेले आहे.

या प्रमुख मंदिरांशिवाय मांधाता क्षेत्रात इतर अनेक देवदेवतांची मंदिरे, साधूंचे मठ आणि पवित्र स्थाने व तीर्थे आहेत. नदीच्या उत्तर तीरावर वैष्णवधर्मी मंदिरांचे अवशेष आहेत. या अवशेषांत विष्णूच्या चोवीस अवतारांचे मंदीर प्रमुख आहे. या चोवीस अवतारांपैकी काही अवतारांच्या मूर्ती आजही ठीक आहेत. या मंदिरापासून जवळच असलेल्या सिद्धवरकूट नामक टेकडीवर पुरातन

जैन मंदिरांचे अवशेष होते. त्या ठिकाणी जैन समाजाने पुनः मंदिरांची उभारणी केली आहे. या वैष्णव आणि जैन अवशेषांमधून 'रावणनाला' या नावाचा प्रवाह वाहतो आहे. या प्रवाहाला 'रावणनाला' असे नाव पडण्याचे कारण असे की, त्याच्या काठी एक साडेअठरा फूट लांब अशी प्रचंड आणि उग्र भयंकर मूर्ती पडलेली असून, तिला लोक रावणमूर्ती समजतात. वास्तविक ती चामुंडा देवीची मूर्ती आहे. तिला दहा हात आहेत. तिचा एक पाय दैत्याच्या देहावर रोवलेला आहे. गळ्यात मुंडमाला आहेत. तिच्याजवळ सिंहशावक आणि मूषक असल्याचे दाखविले आहे.


असे हे अनेक पुरातन अवशेषांनी गजबजलेले, निसर्गश्रीने नटलेले, नर्मदामाईच्या निर्मळ आणि गंभीर प्रवाहाने वेढलेले पुराणप्रसिद्ध प्रसन्न आणि पवित्र मांधाता क्षेत्र आहे. श्रीमत आद्य शंकराचार्यांनी या स्थानाचा महिमा गातांना म्हटले आहे की —

कावेरिकानर्मदयोः पवित्रे समागमे सज्जनतारणाय ।
सदैव मान्धातृपुरे वसन्तं ॐकारमीशं शिवमेकमीडे ।।

(सज्जनांना तारण्यासाठी कावेरी आणि नर्मदा यांच्या संगमस्थानी सदैव वास करणाऱ्या ॐकारशिवाला माझे वंदन असो.)

☆ ☆ ☆

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ..........
क्रमांक ..........



## ५ : श्रीवैजनाथ

महाराष्ट्रातील पाच ज्योतिर्लिंगांपैकी जी तीन मराठवाड्यात आहेत, त्यांत श्रीवैजनाथ हे एक आहे. शिव पुराणातील ज्योतिर्लिंगगणनेत या ज्योतिर्लिंगाचा स्थाननिर्देश 'परल्यां वैद्यनाथं च' असा आहे, म्हणजे वैद्यनाथ हे ज्योतिर्लिंग परळी येथे आहे. वैजनाथ हा वैद्यनाथ या नावाचा मराठी अपभ्रंश आहे. परंतु उत्तरेकडील लोकांना हा स्थाननिर्देश मान्य नाही. बारा ज्योतिर्लिंगांची गणना करताना ते वैद्यनाथाविषयी शंकराचार्यविरचित स्तोत्रातील पुढील श्लोक म्हणतात :

पूर्वोत्तरे प्रज्वलिकानिधाने सदा वसन्तं गिरिजासमेतम् ।
सुरासुराराधितपादपद्मं श्रीवैद्यनाथं तमहं नमामि ॥

[ उत्तर भारतात पूर्वेकडील भागात प्रज्वलिका ( पर्यलिका किंवा परळी नव्हे ) नावाच्या स्थानी गिरिजेसह निवास करणाऱ्या आणि ज्याची पदकमळे सुर आणि असुर या दोघांनीही आराधिली आहेत, त्या श्रीवैद्यनाथाला मी नमन करतो. ]


उत्तर भारतातील लोकांच्या मताने हे स्थान म्हणजे बंगालमध्ये पूर्व रेल्वेच्या फाटयावरील वैद्यनाथम् नावाचे जे स्टेशन आहे, ते होय. तेथे जे वैद्यनाथाचे भव्य मंदिर आहे, तेच वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाचे ठाणे होय. परंतु ही समजूत प्रादेशिक अभिमानातून दृढावलेली दिसते. कारण शिवपुराणातील त्या सर्वप्रसिद्ध गणनेत परळीचा स्पष्ट निर्देश आहे. तसेच 'सिद्धान्तशिरोमणी' या ज्योतिष-ग्रंथात भूमध्यरेषेवरील प्रसिद्ध क्षेत्रांत परळीचा समावेश आहे. ही रेषा कन्याकुमारी, कांची, श्रीशैल, परळी, वाशीम, उज्जयिनी या स्थानांवरून मेरुपर्वतापर्यंत जाते, असे म्हटले आहे.

हे परळी क्षेत्र मराठवाड्यातील बीड जिल्ह्यात आहे. हे ठिकाण मनमाड–हैद्राबाद लोहमार्गावर पूर्णा जंक्शनच्या अलीकडे असलेल्या परभणी स्टेशनवरून जाणाऱ्या फाट्यावर आहे. हा फाटा परळीपर्यंतच आहे. याशिवाय बीड, लातूर, उस्मानाबाद येथून परळीकडे जाणाऱ्या मोटारी आहेत. आंबेजोगाई हे मराठीचे महातीर्थ परळीच्य अलीकडे अवघ्या सोळा मैलांवर आहे. तेथूनही परळीला जाता येते.

परळी हे गाव फारसे मोठे नसले, तरी येथे व्यावहारिक उलाढाल बरीच चालते. या गावाची लोकसंख्या तेरा-चौदा हजार आहे. रेल्वे आणि बसेस अशी दुहेरी वहातुकीची सोय असल्यामुळे येथे या उलाढालींना उत्तेजन मिळाले आहे. सर्व गावात कॉंक्रीटचे रस्ते आहेत. गावात सायकलरिक्षा पुष्कळ आहेत, त्यामुळे यात्रिकांना अल्प खर्चात आणि अल्प वेळात सर्व स्थाने सुकरतेने पहाण्याची सोय होते. दोन-अडीच रुपयांत गावातील आणि गावाबाहेरील सर्व महत्त्वाची स्थाने तीन-चार तासांत पाहून घेता येतात.

वैजनाथाचे देवालय एका उंचवट्यावर आहे. जवळच एक तलाव आहे, परंतु त्यात पाण्याचे दुर्भिक्षच आहे. मंदिराच्या प्राकारात

असलेल्या विहिरीला मात्र मुबलक पाणी आहे. सध्याचे मंदिर देवी अहल्याबाईने उभारलेले असल्यामुळे प्राचीन मंदिराच्या शिल्पाविषयी काहीच कल्पना करता येत नाही. नंदी आणि शिवलिंग फक्त प्राचीन दिसते. या मंदिराभोवती बंदिस्त कोटाच्या आत प्रशस्त प्रांगण आहे. कोटाच्या भिंतीला लागून आत ओवऱ्या आहेत. देवालयात प्रवेश करण्यासाठी उत्तर, दक्षिण आणि पूर्व अशा तीन बाजूंना प्रवेशद्वारे आहेत. या दारांसमोर चढून येण्यासाठी रुंदच रुंद घाटवजा पायऱ्या आहेत. तेथे या पायऱ्यांच्या चढावाला घाटच म्हणतात. नवा घाट, तीर्थ घाट आणि जुना घाट अशी या तीन घाटांची नावे आहेत. जुन्या घाटाच्या बांधणीत वापरलेल्या एका शिळेवर 'शके ११०८' असा कालाचा उल्लेख खोदलेला आहे. म्हणजे ही शिळा प्राचीन मंदिराच्या अवशेषांपैकी असावी. या घाटाच्या वरच्या पायरीवर एक पोकळ स्तंभाकृती शिल्प आहे. या स्तंभाच्या वरच्या भागात एक गवाक्ष आहे. त्या गवाक्षातून चैत्री आणि आश्विनी पौर्णिमेस उगवत्या सूर्याचे किरण शंकराच्या पिंडीवर पडण्याची व्यवस्था होती असे म्हणतात. जीर्णोद्धाराच्या वेळी मंदिराच्या रचनेत काही फरक झाल्यामुळे आता या



वैजनाथमंदिराचे प्रवेशद्वार

तिथींना गवाक्षातून किरण येताना दिसत नाहीत. या व्यवस्थेला 'दिशा-साधन' असे म्हणतात. हे दिशासाधन पूर्वेकडल्या किरणांसाठी असल्यामुळे हे शिल्प 'प्राची' (पूर्वा) या नावाने ओळखले जाते. आजही चैत्र आणि आश्विन महिन्यांत सूर्यकिरण शिवलिंगावर पडतात; पण त्यांची तिथी अनिश्चित झालेली असून, मंदिरात प्रवेश करण्याचा गवाक्षमार्गही ढळलेला आहे.



दीपमाळ, वैजनाथमंदिर

मंदिराच्या दक्षिणेकडील घाटावर 'हरिहरतीर्थ' आहे.

मंदिराची घडण चिरेबंदी आहे. समोर भव्य, उंच आणि प्रशस्त असा लाकडी सभा-मंडप असून तिहेरी दालनाचे गर्भगृह आहे. गर्भगृह आणि सभामंडप समपातळीत असल्यामुळे सभामंडपातूनही शिवलिंगाचे दर्शन घडू शकते. कोटाबाहेर एक प्रचंड दीपमाळ आहे.

या मंदिराचा जीर्णोद्धार देवी अहल्याबाईने केला आहे. ही साध्वी तीर्थक्षेत्रे पाहात पाहात आणि देवदर्शने घेत घेत परळीस आली असता, वैजनाथाच्या मंदिराची पडझड पाहून तिचे धर्मपरायण मन अस्वस्थ झाले आणि तिने या मंदिराच्या जीर्णोद्धाराचा संकल्प सोडला. परंतु बांधकाम सुरू करायचे तर जवळपास चांगला दगड मिळेना. या विवंचनेत असता तिला दृष्टान्त झाला की, परळी गावाच्या उत्तरेकडे जो त्रिशूला देवीचा डोंगर आहे, त्याच्या पायथ्याशी आवश्यक त्या

दगडांची खाण सापडेल. या स्वप्नदृष्टान्तानुसार त्रिशूला देवीच्या डोंगरात खाण पाडण्यात आली आणि मंदिराचे बांधकाम चालू झाले. या जीर्णोद्धाराचे काम पूर्ण झाल्याचा कालनिर्देश पूर्वेकडील दरवाज्याजवळ असलेल्या एका संस्कृत शिलालेखात आला आहे. त्याचा आशय असा: " या कांतिपुरीक्षेत्रात म्हणजे परळी येथे शके १७०६ मधील चैत्र शुक्ल पंचमी या तिथीला शुक्रवारी अहल्याबाई होळकर हिने हे मंदिर बांधून पूर्ण केले. "

गाभाऱ्यात जाऊन वैजनाथाचे दर्शन घेत असताना यात्रिकाचे मन या स्थानाच्या माहात्म्याने भारावून जाते. येथे शिव शक्तीसह वास करीत आहे, अशी भाविकांची श्रद्धा आहे. तसेच येथे हरिहरतीर्थ आहे आणि गोपीनाथाच्या रूपाने साक्षात् हरीही या क्षेत्रात हरशंकराबरोबर निवास करीत आहे, त्यामुळे येथे हरिहरांचे मीलन पाहावयास मिळते. हरि-हरांबरोबर धन्वंतरीचाही या स्थानाशी संबंध सांगितला जातो. समुद्रमंथनातून जी चौदा रत्ने निघाली, त्यांतील धन्वंतरी हा वैद्यांचा राजा. त्याने विष्णूच्या आज्ञेवरून परळीच्या ज्योतिर्लिंगांत प्रवेश केला, म्हणून हे शिवलिंग 'वैद्यनाथ' असे नाव पावले, अशी या नावाची व्युत्पत्ती सांगतात. आपल्या शिवलीलामृतात आलेली चिलयाबाळाची कथा याच क्षेत्राशी संबंधित आहे, असे म्हणतात. तसेच शिवाची आराधना करून यमाला पराजित करणारा मृत्युंजय मार्कंडेयही येथीलच. जुन्या घाटाजवळ त्याच्या स्मृतीची साक्ष असलेले ' मार्कंडेयतीर्थ ' आहे. असे अनेक पुराणकथांनी गाजलेले हे क्षेत्र आहे. त्याचे दर्शन घेत असताना आपले मन उजळते– पवित्र होते.

वैजनाथमंदिरात नित्य-नैमित्तिक उपासनेचा क्रम अव्याहत चालू आहे. वैजनाथमंदिराच्या व्यवस्थेसाठी पेशव्यांनी स्थानिक ब्राह्मणांस ५२८० बिघे जमीन इनाम दिली असल्याचा उल्लेख

ऐतिहासिक कागदपत्रात आढळतो. सोमवार हा शंकराच्या उपासनेतील महत्त्वाचा दिवस. त्या दिवशी नेहमीपेक्षा मंदिरात अधिक वर्दळ असणे स्वाभाविकच आहे. महाशिवरात्रीचा सोहळा येथे इतर शिवस्थानांतल्याप्रमाणेच गाजतो. त्या दिवशी यात्रिक हरिहरतीर्थात स्नान करून वैजनाथाचे दर्शन घेण्यासाठी हजारोंनी लोटतात. याच हरिहरतीर्थातील पवित्र जळ नित्याच्या पूजाभिषेकासाठी वापरले जाते.


महाशिवरात्रीशिवाय वर्षप्रतिपदा, श्रावण मास, विजयादशमी व वैकुंठचतुर्दशी हे दिनविशेष येथे गाजतात. या वेळी वैजनाथ-मंदिरांतील उपासनेचा सोहळा अनुभवताना यात्रिकांची मने संतृप्त होऊन जातात. वर्षप्रदिपदेच्या दिवशी वैजनाथमंदिरात गुढी उभारण्याचा समारंभ थाटामाटाने होतो. या वेळी देवाला वस्त्रालंकारांनी नाना प्रकारे सजवितात. श्रावण मासात रोज दूरचे गोदावरीचे पवित्र जळ कावडींनी आणून देवाला रुद्राभिषेक होतो आणि बिल्वपत्रांची लाखोली वाहिली जाते. या महिन्यात शिवदर्शनाचा लाभ घेण्यासाठी, गंगाजळाने रुद्राभिषेक करण्यासाठी आणि बिल्वपत्रांची लाखोली वाहण्यासाठी दूरदूरच्या ठिकाणांहून भक्तमंडळी येत असतात. विजयादशमीच्या दिवशी भक्तजनांच्या समूहासह देवाची उत्सवमूर्ती पालखीतून वाजत गाजत सीमोल्लंघनाला जाते. तसेच दसऱ्यानंतर कोजागरी पौर्णिमेपासून त्रिपुरी पौर्णिमेपर्यंत एक महिनाभर नित्यपूजेचा सोहळा विशेष प्रेक्षणीय असतो. वैकुंठचतुर्दशीच्या दिवशी मध्य रात्रीच्या वेळी महापूजा होते. त्या वेळी शिवलिंगावर बिल्वदल;चा खच पडतो. या महापूजेचा सोहळा पाहण्यासाठी त्या प्रसन्न गंभीर वातावरणात अनेक भक्त-भाविकजन मंदिरात तिष्ठत उभे असतात. मध्यरात्रीचा एकान्त, शिवमंदिरातील गंभीर वातावरण आणि अशा वातावरणात दरवळणारी पूजेची पवित्रता यांमुळे दर्शन घेणारांचे मन हरखून जाते.

वैजनाथ-मंदिराच्या परिसरात, परळी गावात आणि गावाबाहेर अनेक तीर्थे, पवित्र स्थाने व मंदिरे आहेत. गोपीनाथाचे मंदिर ब्राह्मणगल्लीत आहे. या मंदिरातील मूर्ती भुयारी गाभाऱ्यात आहे. वैजनाथमंदिराच्या पूर्वघाटाच्या उत्तरेस असलेल्या गणेशमंदिरांतील गणेशमूर्ती भव्य आणि वैशिष्ट्यपूर्ण आहे. या गणेशाला सोंड नाही आणि त्याने मल्लाप्रमाणे आसन घातलेले आहे, हें या मूर्तीचें वैशिष्ट्य आहे. या गणेशाचे दर्शन घेऊनच वैजनाथाच्या दर्शनास जावयाचे, असा येथील रूढ संकेत आहे. वैजनाथमंदिराच्या परिसरात अनेक तीर्थे आहेत. दक्षिण घाटाजवळ हरिहरतीर्थ आहे, उत्तरेकडील नव्या घाटाजवळ नारायणतीर्थ आहे आणि जुन्या घाटाजवळ मार्कंडेयतीर्थ आहे. हरिहरतीर्थ आकाराने मोठे आहे. नारायणतीर्थ चौकोनी असून लहानसेच पण सुबक आहे. मार्कंडेय तीर्थापासून थोड्याच अंतरावरून सरस्वती नदी वाहाते आहे. या नदीच्या पूर्वपश्चिम तीरांवर परळी गाव वसले आहे. पूर्वतीरावरील भाग कसबा आणि पश्चिम तीरावरील भाग 'पेठ' या नावाने ओळखला जातो.

या पवित्र स्थानांशिवाय नारायण डोंगरातील वटेश्वरमंदिर, काळ्या व गोऱ्या रामाची मंदिरे आणि संत जगमित्र नागा यांचे समाधीमंदिर या स्थानांचा उल्लेख करायला हवा. जगमित्र नागा यांचे समाधीमंदिर डोंगराकडील रस्त्यावर गावाला लागूनच आहे. हे समाधीमंदीर अगदी साध्या बांधणीचे आहे. सभामंडप आणि गाभारा अशी त्याची रचना आहे. गाभाऱ्यात जगमित्र नागांच्या समाधीचा चौथरा असून, त्यामागे विठ्ठल-रखुमाईच्या मूर्ती आहेत.

महीपतिबुवांनी जगमित्र नागांचे चरित्र 'भक्तविजयच्या एकोणिसाव्या अध्यायात वर्णिले आहे. जगमित्र हे परळीचे विठ्ठलभक्त ब्राह्मण. ते गावात भिक्षा मागून आपल्या कुटुंबाचा निर्वाह करीत असत आणि

रात्रंदिवस पांडुरंगाच्या भक्तीत तन्मय होऊन जात असत. निंदकांनी रात्री त्यांचे खोपट जाळण्याचा प्रयत्न केला; परंतु प्रभुकृपेने त्यातून ते सुरक्षित राहिले. ग्रामस्थांनी त्यांच्या भक्तीचा प्रभाव अनुभवून, त्यांस



जगमित्र नागांची समाधी, परळी वैजनाथ

इनाम जमीन दिली आणि सर्व मिळून ती जमीन पिकवून ते जगमित्रांचा योगक्षेम चालवू लागले. एकदा परळीस एक नवा यवन हवालदार आला. त्याने जगमित्रांची इनामी जमीन जप्त केली आणि त्यांना सांगितले की, "जर तू खराच 'जगमित्र' असशील, तर आमच्या घरच्या कार्यात पूजा करण्यासाठी खऱ्या वाघाचे देवक लागते

त्यासाठी वाघ पकडून आणून दे." जगमित्र रानात गेले आणि त्यांनी देवाचा धावा केला. देव त्यांच्यासाठी वाघ बनला. तो भयंकर वाघ बरोबर घेऊन जगमित्र हवालदाराच्या घरी येताच हवालदार भयाने हवालदिल बनून जगमित्रांस शरण आला आणि त्याने त्यांची जप्त जमीन आदरपूर्वक परत केली.


जगमित्र नागांच्या समाधीचे दर्शन घेताना आपल्या मनात त्यांचे हे अद्भुत चरित्र आणि त्यांची पवित्र वाणी उमळून येते :

महाप्रसाद ताटींचा । विडा आपुले हातींचा ॥
इतुके झडकरी पाठवावे । नाहीतरी बळिया होऊनी राहावे ॥
चुवा चंदन केशराचा । झगा आपुले आंगीचा ॥
तीर्थ चरणीचे शीतळ । आणि कंठीची सुमनमाळ ॥
विनवी जगमित्र नागा । जाऊनी विठोबाला सांगा ॥

असे हे तीर्थ-मंदिरांनी गजबजलेले, साधुसंतांच्या पदस्पर्शाने पावन झालेले आणि पुराणकथांनी गाजलेले शिवक्षेत्र आहे.

☆ ☆ ☆

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम .................... विः ....................
क्रमांक .................... नों दिः ....................



# ६ : श्रीभीमाशंकर

भीमाशंकर हे स्थान पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यात आहे. हे स्थान सह्याद्रीच्या पश्चिमेकडे पसरलेल्या एका उंच फाट्यावर आहे. या फाट्याला 'भीमाशंकराचा डोंगर' असे नाव आहे. याला लागूनच भवरगिरीचा डोंगर आहे. भीमाशंकर शिखराची उंची समुद्रसपाटीपासून चौतीसशे चौपन्न फूट म्हणजे सुमारे पाऊण मैल आहे.


भीमाशंकरला दोन–तीन मार्गांनी जाता येते. एक मार्ग पुण्याहून उत्तरेस खेड, मंचर व तेथून पश्चिमेला घोडेगाव आणि तेथून पोखरी घाटाने अगदी भीमाशंकराच्या मंदिराजवळ जातो. या मार्गाने पुण्यापासून हे स्थान सुमारे पंचाहत्तर मैल आहे. या मार्गाने मंचरहून निघाल्यावर पोखरीचा घाट चढताना भीमाशंकराच्या चढणीवर सृष्टिशोभा फारच अप्रतिम दिसते. सागाचे उंच वृक्ष, फळांनी लढलेले आम्रवृक्ष, फुलांनी फुलल्यामुळे लाल लाल दिसणारी पांगाऱ्याची झाडे, करवंदे, तोरणं,

दा. क्र. १८२८

कारवी, कुंदवेली, रामेठा इत्यादी जंगली वनस्पतींच्या विपुलतेमुळे हा भाग प्रसन्न दिसतो.

दुसरा मार्ग कोकणातून येणारा. कर्जत आणि नेरळ येथून खांडसपर्यंत सडक आणि खांडसपासून पुढे सुमारे सहा मैल घाट चढून भीमाशंकराजवळ येता येते. घाटात पाऊलवाटाही आहेत. कोकणातून येणारे यात्रेकरू या वाटेने येतात. या मार्गापेक्षा पुण्याहून येणारा मार्ग जास्त सुखकर आहे.

खेड, चासकमान, वाडे, भवरगिरी या तिसऱ्या मार्गानेही भीमाशंकराला येता येते.



भीमाशंकराचे मंदिर

भीमाशंकराच्या पठारावरच मोटारतळ आहे आणि येथून मंदिरापर्यंत सरळ वाट आहे. देवळाच्या जवळच पाच-सात घरे आहेत. येथे पुजारी लोक, गुरव आणि आदिवासी महादेवकोळी लोक यांची अगदी थोडी वस्ती आहे.

भीमाशंकराचे देऊळ अर्धे जुने आणि अर्धे नवे आहे. हल्ली देवालयाचे तीन भाग दिसतात : गाभारा, कूर्ममंडप आणि त्या बाहेरचा सभामंडप. सभामंडप सुमारे अडीचशे वर्षांपूर्वी ( इ. स. १७३७ मध्ये ) पुण्याचे सावकार चिमणाजी अंताजी नाईक भिडे यांनी बांधला. गाभाऱ्याचा

जीर्णोद्धार करून तो नवीन बांधलेला आहे. हे काम सुमारे पावणेदोनशे वर्षांपूर्वी नाना फडणिसांनी सुरू केले आणि ते त्यांच्या पत्नीने पुरे केले. देवळाचे बांधकाम काळ्या ताशीव दगडाचे असून त्याची बांधणी हेमाडपंती पद्धतीची आहे. त्यावर दशावतारांतील मूर्ती कोरलेल्या आहेत. मूर्ती रेखीव आणि सुंदर आहेत. देवळाजवळ दगडी नंदी बसविलेला आहे.

नंदीच्या जवळच दोन जाडजूड खांबांच्या मधल्या लोखंडी दांडीला एक प्रचंड घंटा टांगलेली आहे. तिचे वजन सुमारे चार-पाच मण असेल. यात्रेकरूंनी घंटेलाही शेंदूर फासला आहे. घंटेवर १७२९ असा सन रोमन लिपीत कोरलेला आहे. बहुधा त्या साली ही घंटा ओतून तयार केली असावी. इ. स. १७३९ मध्ये चिमाजी अप्पाने वसई जिंकल्यानंतर ठाणे जिल्ह्यातल्या वाशिंद येथील पोर्तुगीज चर्चमधून ही घंटा मराठ्यांनी आणली आणि त्यानंतर ती येथे आणण्यात आली असावी.

नंदीजवळचा भाग मोडकळीस आलेला असून गाभारा आणि त्यावरील भाग चांगल्या स्थितीत आहे. गाभाऱ्यात भरपूर उजेड येतो. तेथे एका प्रशस्त शाळुंकेवर ठेंगणेसे शिवलिंग आहे. देवावर पाण्याची संततधार असते. हेच ते भीमाशंकर ज्योतिर्लिंगाचें प्रसिद्ध स्थान. ' जय भीमाशंकर ' अशी गर्जना करून आपण देवाचे दर्शन करू. १९६४ मध्ये भीमाशंकर मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी एक समिती स्थापन करण्यात आली असून लवकरच हे काम सुरू होणार आहे.

भीमाशंकरासंबंधी स्कंदपुराण आणि पद्मपुराण यात काही कथा आल्या आहेत.

पुराणकाळापूर्वी त्रिपुरासुर नावाच्या दैत्याने या भागात फारच धुमाकूळ उडविला. त्याचा नाश करण्यासाठी श्रीशंकरांनी प्रचंड असे भीमरूप धारण केले. त्यांनी अनेक दिवस त्रिपुरासुराशी युद्ध करून

त्याला ठार केले आणि जनता निर्भय केली. या परिश्रमाने घामाघूम होऊन शंकर येथील शिखरावर बसले होते. त्यांच्या अंगातून निघणाऱ्या घामांच्या धारांपासून ही लोकमाता भीमा नदी येथून उत्पन्न झाली. अशी कथा आहे. ‘भीम’ म्हणजे मोठे. ‘भीमशंकर’ म्हणजे मोठे रूप धारण केलेला शंकर. ‘भीमशंकर’ या नावाचे मराठी उच्चार-सुलभ रूप ‘भीमाशंकर’ हे होय. भीमा नदीकाठचा शंकर तो भीमा-शंकर, असेही स्पष्टीकरण देता येईल.

भीमाशंकराच्या स्थानासंबंधी आणखी एक पौराणिक कथा आहे ती अशी :

भीमासुर नावाचा एका बलाढ्य दैत्याचा मुलगा एका निबिड अरण्यात राहात होता. तो वयाने जसजसा वाढू लागला, तसतसे त्याच्या लक्षात आले की, आपली आई चिंताग्रस्त आहे; म्हणून त्याने एकदा आपल्या आईला विचारले, “आई, तुझा चेहरा एवढा कष्टी का? या अरण्यातले सारे राज्य आपले आहे!”

आई म्हणाली, “बाळा, या राज्याचा तू स्वामी आहेस, पण यापेक्षाही मोठे असे तुझ्या वडिलांचे राज्य होते. ते राज्य गेले आणि एका युद्धात तुझे वडील मारले गेले!”

“कुणी मारले माझ्या वडिलांना ते सांग. आत्ता त्याच्या नरडीचा घोट घेतो.”

“कशाला सांगू त्याचे नाव! तो फार बलाढ्य आहे. तुला वडिलांच्या वधाचा सूड म्हणून त्याला मारायचेच असेल तर आधी तपश्चर्या करून तुला शक्ती प्राप्त करून घेतली पाहिजे!”

“कोणी वध केला? आणि मी तपश्चर्या कोणाची करू? तेवढे तर सांग.”

“प्रियधर्म नावाच्या एका मानवी राजाने त्यांचा वध केला. तो

महाबलाढ्य आहे. पूर्वतयारी झाल्यावरच त्याच्यावर चालून जा. शक्ती मिळविण्याकरता सृष्टी निर्माण करणाऱ्या ब्रह्मदेवाची तूं आराधना कर!"

आईचा निरोप घेऊन तो भीमासुर एका पर्वतशिखरावर गेला आणि तेथे ब्रह्मदेवाची प्रार्थना करीत बसला.

त्याने तामस तपश्चर्या केली. तिच्या प्रभावाने त्याच्या शरीरातून अग्नी निर्माण झाला आणि तो अरण्यातील झाडे, पशुपक्षी यांना जाळू लागला. त्यांना वाचविण्यासाठी साक्षात ब्रह्मदेव भीमासुरापुढे प्रकट झाले आणि म्हणाले, "तुझ्या तपश्चर्येने मी प्रसन्न झालो आहे; माग तुला काय वर पाहिजे तो!"

"मला माझ्या वडिलांच्या वधाचा सूड घ्यायचा आहे, त्यासाठी मला प्रचंड सामर्थ्य हवे आहे ते द्या. कोणीही मानव मला युद्धात मारू शकणार नाही, असा वर मला द्या."

"तथाऽस्तु!" असे म्हणून ब्रह्मदेव अंतर्धान पावले.

नंतर भीमासुराने आपले सैन्य जमा केले आणि एकेक राज्य जिंकीत तो निघाला. पराक्रमी म्हणविणारे अनेक राजे त्याच्यापुढे थरथरा कापू लागले. वावटळीप्रमाणे निघालेले त्याचे सैन्य प्रियधर्म राजाच्या राज्यात येऊन पोहोचले. राजाचा सेनापती सैन्य घेऊन पुढे आला. थोड्याच वेळात ते सैन्य पराभव पावून चारी दिशांना पळू लागले. भीमासुर राजवाड्याजवळ आला. आत जाऊन त्याने राजवाडा धुंडाळला, पण त्याला प्रियधर्म मिळाला नाही. तपास करताना त्याला असे समजले की, जवळच्या अरण्यात एका डोंगरावर शंकराचे पार्थिव लिंग करून राजा त्याची पूजा-अर्चा करीत बसला आहे.

भीमासुर सैन्य घेऊन तेथे गेला. त्याने त्या टेकडीला वेढा घातला. तो स्वतः पुढे गेला, तेव्हा त्याला काय दिसले? प्रियधर्म राजा पीतांबर नेसून एका पाटावर बसला होता. त्याने शंकराचे पार्थिव लिंग तयार

केले होते. त्याला आडवे गंध लावले होते. तो त्या मूर्तीवर बिल्वपत्रांचा लक्ष वाहात होता आणि एकीकडे ' ॐ नमः शिवाय ' असा जप करीत होता. जवळ आलेल्या भीमासुराकडे त्याचे लक्षही नव्हते.

भीमासुराने आपली तरवार बाहेर काढली आणि राजाचे शिर धडापासून दूर करण्याकरिता त्याने हात वर केला. इतक्यात राजाच्या आर्त भक्तीमुळे संतुष्ट झालेला भगवान् शंकर त्या पार्थिव लिंगातून प्रकट झाला. त्याने आपला तिसरा डोळा उघडला. त्या डोळ्यातून निघणाऱ्या अग्नीने भीमासुर भस्म झाला. त्याचे सैन्य पळून गेले. राजाने आपले मस्तक शंकराच्या पायांवर ठेवले. शंकर अंतर्धान पावणार इतक्यात राजा म्हणाला, " श्रीशंकरा, या भीमाला मारण्याकरता आपण साक्षात् प्रकट झालात. माझ्याप्रमाणेच अनेक भक्तांना दर्शन देण्याकरता आपण येथेच कायमची वस्ती करा. या भक्तावर अनुग्रह करा. "

शंकर म्हणाले, " तथाऽस्तु ! "

शंकर अंतर्धान पावले. आपल्या तेजात विलीन झाले. राजा डोळे उघडून समोर पाहातो तो त्याला असे दिसले की, एक स्वयंभू शिवलिंग आपल्यासमोर निर्माण झाले आहे. राजा म्हणाला, " श्रीशंकरा, भीम माझा शत्रू असला तरी त्याच्या मृत्यूनंतर ते शत्रूत्व संपले आहे. माझ्याप्रमाणेच भीम राक्षसाच्या निमित्ताने आपण येथे प्रकट झालात म्हणून भक्त या स्थानाला भीमाशंकर म्हणून ओळखतील.


भीमाशंकरासंबंधी आणखी एक दंतकथा आहे. पूर्वी कोणी भतीराव नावाचा माणूस इथे डोंगरावर वृक्ष तोडीत असता एका झाडाच्या मुळावर कुऱ्हाडीचा घाव घालताच त्यातून रक्तप्रवाह आला. मग त्याने दुभती गाय तिथे आणली. तिच्या दुग्धधारांचा तिथे अभिषेक केला. तेव्हा

रक्त थांबले आणि एक स्वयंभू शिवलिंग प्रकट झाले. तोच हा भीमाशंकर.

भीमाशंकर मंदिराच्या डाव्या अंगच्या टेकडीवर अवघड वाट चढून गेल्यावर भीमा नदीच्या उगमाचे कुंड दिसते. हे कुंड पुरुषभर खोल असून दगडी बांधणीचे आहे. आत छोटासा पाझर आहे. हाच तो श्रीशंकराच्या घामापासून निघालेल्या भीमा नदीचा उगम.

या ठिकाणी उगम पावलेली भीमानदी खाली मंदिराजवळच्या मोक्षकुंडात गेली. हे मोक्षकुंड म्हणजे येथे प्राचीन काळी तप करीत राहिलेल्या कौशिक महामुनीच्या सामर्थ्याची साक्ष आहे. त्यांचा एक शिष्य ऋचीक नावाचा ऋषिकुमार होता. तो खूप शिकला, पण त्याने गृहस्थाश्रम स्वीकारला नाही. त्यामुळे त्याच्या पितरांना मोक्षच मिळेना. मग ऋचिकाच्या विनंतीवरून कौशिक मुनींनी इथे हे कुंड खोदले. त्यात कमंडलूतले पाणी टाकले. मग त्यात लगेच वरून भीमरथी नदी उतरली आणि त्या पाण्यातील स्नानामुळे ऋचिकाच्या पितरांना मुक्ती मिळाली. अशी या मोक्षकुंडाची कथा आहे.

मोक्षकुंडातून खाली एक मैलावर भीमेचा प्रवाह सुमारे तीन हजार फूट उंच खडकावरून कोसळतो. तिथे भीमाशंकरांनी गुप्तपणे तो प्रवाह आपल्या मस्तकावर झेलला आहे म्हणतात. या भीमावतरणाला साक्षी विनायकाचे मंदिरही तिथे जवळच आहे. या गुप्त भीमाशंकराचे दर्शन घेणे म्हणजे वाघाच्या जाळ्यातच जाणे होय! असे म्हणतात की, रोज मध्यरात्री येथून वाघ येतात आणि देवाचे दर्शन घेतात. भीमाशंकराच्या परिसरात अनेक देवदेवतांची स्थाने, तीर्थे, कुंडे, राया आणि उपवने आहेत. त्यांत ज्ञानकुंड, पापनाशन तीर्थ, भीमकुंड, साक्षी विनायक, कमळजा देवीचे मंदिर, हनुमान तळे, गोरखनाथांचा मठ इत्यादी ठिकाणे आहेत.




भीमानदीचे मोक्षकुंड

संतवाङ्मयात भीमाशंकराचे आणि भीमानदीचे उल्लेख पुष्कळ ठिकाणी आलेले आहेत. ज्ञानेश्वर वगैरेंनी केलेल्या तीर्थयात्रेचे वर्णन करताना नामदेवांनी आपल्या अभंगांत या स्थानाचा उल्लेख केला आहे. गुरुचरित्रात, समर्थांच्या दासबोधात आणि नरहरी मालोच्या भूपाळीत अशा अनेक ठिकाणी या स्थानाचा उल्लेख आला आहे. आद्य शंकराचार्यांनी भीमशंकराला नमन करताना म्हटले आहे :

यं डाकिनीशाकिनिकासमाजे निषेव्यमाणं पिशिताशनैश्च ।
सदैव भीमादिपदप्रसिद्धं तं शंकरं भक्तहितं नमामि ॥

[ जो शाकिनी–डाकिनींच्या समूहात भूतगणांकडून पूजिला जातो, त्या भीमशंकर नावाने प्रसिद्ध असणाऱ्या भक्तहितकर्त्या शंकराला मी नमन करतो. ]

भीमरथी या नावाने भीमा नदीचा उल्लेख सुमारे दीड हजार वर्षांपूर्वी शके ५५६ मधील दुसरा पुलकेशी याच्या एहोळीच्या शिलालेखात आला आहे. औरंगजेबाशी लढा देताना गुणाजी आणि राजाजी सावंत या दोन पाचहजारी सरदारांनी भीमाशंकराच्या डोंगराचा आश्रय घेतल्याचा उल्लेख इतिहासात आला आहे. इ. स. १७२४ च्या माघात शिवरात्रीला थोरल्या बाजीरावाची आई राधाबाई भीमाशंकराच्या दर्शनाला गेल्याचा उल्लेख आहे. छत्रपती शाहूमहाराज आजारी पडले, तेव्हा ते बरे व्हावेत म्हणून भीमाशंकराला अनुष्ठान आणि तुपाचा अभिषेक झाल्याची नोंद आहे. सवाई माधवराव यांच्या जन्मप्रसंगी भीमाशंकरास ध्वज दिल्याचा उल्लेख आहे. श्रीमंत रघुनाथराव पेशव्यांनी येथे एक विहीर खोदविली आहे.



भीमाशंकर लेणे

भीमाशंकराच्या नित्यपूजेत पंचामृतस्नान, रुद्राची एकादशणी, नैवेद्य इत्यादी गोष्टी होत असत. पूजासाहित्यात चंदन, वेलदोडे, साखर, तूप, फुले, फळे इत्यादी गोष्टी असत. इतकेच नाही तर गंधासाठी केशर आणि कस्तुरी या वस्तूही असत. यासारखे भीमाशंकरासंबंधी अनेक उल्लेख मराठी दप्तरात आले आहेत.

भीमाशंकराच्या डोंगरावरील सृष्टिसौंदर्य बहारीचे आहे. त्यातल्या त्यात


नागफडीचा देखावा फार रौद्र आणि भयंकर आहे. नागफडी हा सह्याद्रीचा एक तुटलेला कडा आहे. तो एक लांबलचक नागफडीसारखा पर्वताचा भाग आहे. येथून खाली तुटलेला कडा अपरंपार खोल आहे. अर्थात् तुटलेल्या कड्याच्या शेवटी काठावर उभे राहून पाहाण्याची सोय नसते. म्हणून लोक हा देखावा निजून पडून नुसते डोके पुढे करून पाहातात. घेरी येऊ नये म्हणून पाठीमागे एकाने पाय धरावे लागतात. येथून कोकणाची शोभा विमानातून पाहिल्याप्रमाणे फार मजेची दिसते. आपण कोकणाचा एखादा उठावाचा नकाशा पाहात आहोत, असे वाटते. खाली निरनिराळे डोंगर, वाकड्यातिकड्या मार्गाने गेलेल्या नद्या, रेल्वेरस्ते, गावे, घरे यांची शोभा फारच रमणीय दिसते. विमानातून भूप्रदेशाचे निरीक्षण केल्याचा अनुभव येतो. किती वेळ हे दृश्य पाहिले तरी समाधान होत नाही.

भीमाशंकर देवस्थानाला सरकारी वर्षासन चालू आहे. येथे दरसाल महाशिवरात्रीला चार दिवस मोठी यात्रा भरत असते. दर माणशी पंधरा नवे पैसे असा कर घेतला जातो. हजारो यात्रेकरू महाशिवरात्रीला येतात, तेव्हा भोवतालचा डोंगर माणसांनी नुसता फुलून गेलेला दिसतो. या वेळी पठारावर खूप मोठा बाजार भरतो. धान्ये आणि इतर दैनंदिन गरजांच्या वस्तू यांची देवघेव होते.

पंढरपूरच्या वाळवंटात चंद्रभागेचा प्रचंड विस्तार झालेला आपण पाहातो. त्या भाग्यवान भीमानदीचा उगम भीमाशंकरावर कसा झाला आहे, हे पाहिल्यावर आपणाला एक प्रकारचा विशेष आनंद होतो. ती थोर भीमरथी नदी भामा, इंद्रायणी, वेळ, घोड, नीरा, मुळामुठा वगैरे नद्यांना आपल्या पोटात सामावून घेते. त्याप्रमाणेच आपले सर्व अपराध पोटात घालून आपणा सर्वांना पावन करो.

जय भीमा ! जय भीमाशंकर !

☆ ☆ ☆



## ७ : श्रीरामेश्वर

समुद्रावर सेतू बांधून श्रीरामाने लंकेवर स्वारी केली. रावणवधानंतर विजयी श्रीराम सीतेसह पुष्पक विमानातून अयोध्येकडे निघाले. वाटेत त्यांचा पहिला मुक्काम गंधमादन पर्वतावर झाला. ऋषिमुनींनी श्रीरामाचे स्वागत केले. पण प्रभू प्रसन्न नव्हते. ऋषींनी कारण विचारले. तेव्हा श्रीराम म्हणाले, " युद्धातील हा विजय म्हणजे मोठा पराक्रम नव्हे, सीतेसाठी ते सारं मला प्राप्त कर्तव्य म्हणून करावं लागलं. पण त्या

कामी माझ्या हातून अनेकांची हत्या घडली. ती टोचणी मला लागल्यामुळे मी अस्वस्थ आहे."

"प्रभू, झालं तें ठीकच आहे. जगाच्या कल्याणासाठी दुष्टांचा नाश झालाच पाहिजे! आता आपण या ठिकाणी शिवलिंगाची स्थापना करावी. जगाला ती एक अमोल देणगीच ठरेल." ऋषी म्हणाले.

त्या गोष्टीला रामाने रुकार दिला आणि कैलासाहून शिवलिंग आणण्याची मारुतीला आज्ञा केली. त्याप्रमाणे मारुती कैलासावर गेला. पण तेथे भगवान शंकर नव्हते म्हणून तो तेथेच वाट पाहात बसला.

ज्येष्ठ शुद्ध दशमीच्या सुमुहूर्तावर दशहरासमाप्तीनंतर गंगापूजन करून श्रीशिवलिंगाची स्थापना करण्याचे ठरविले होते, पण मारुतीला विलंब लागला. प्रभू चिंतामग्न झाले. हा मुहूर्त टळणार काय, असे त्यांना वाटू लागले.

इतक्यात जानकी पुढे झाली. तिने तेथून जवळच असलेल्या समुद्रातील वाळू आणली आणि एक शिवलिंग तयार करून रामापुढे ठेवले. मुहूर्त साधून श्रीरामाने त्याच शिवलिंगाची विधिपूर्वक वेदमंत्रोच्चाराने स्थापना केली. सर्वांनी शिवनामाचा जयजयकार केला. आता आरती होणार इतक्यात कैलासाहून शिवलिंग घेऊन हनुमान तेथे आला. "अरेरे! आता काय उपयोग?" प्रभू रामचंद्र म्हणाले.

ते ऐकून मारुतीला वाईट वाटले. त्याने प्रभूची क्षमा मागितली! रामाने मारुतीचे सांत्वन केले आणि ते वाळूचे शिवलिंग उपटून त्या ठिकाणी मारुतीने आणलेले शिवलिंग ठेवण्यास सांगितले.

मारुती तसे करू लागला, पण काय आश्चर्य कितीही प्रयत्न केले तरी ते दिव्य ज्योतिर्लिंग तेथून हलेना. उलट मारुतीचे शक्तिहरण होऊन तो तेथे मूर्च्छित पडला. तेव्हा सर्व ऋषिमुनी म्हणाले, "माता जानकीने तयार केलेले आणि प्रभू रामचंद्राने स्थापन केलेले हे शिवलिंग विश्वातील

सगळ्या शक्ती एकवटल्या तरीही येथून हलणार नाही ! हा रामेश्वर आहे ! जगाचे मंगल करणारे हे दिव्य ज्योतिर्लिंग आहे !"

नंतर त्या रामेश्वरासमोरच हनुमानाने आणलेले शिवलिंग स्थापन केले. सर्वांनीं त्याला 'हनुमदीश्वर' हे नाव दिले आणि त्याची थाटाने पूजा-आरती केली. रामेश्वराची यात्रा करणारा प्रत्येक यात्रेकरू त्या दोन्ही शिवलिंगांचे दर्शन घेऊन कृतार्थ होतो. रामेश्वराचे महत्त्व हे असे आगळेच आहे.

आद्य शंकरचार्यांनी रचलेल्या 'द्वादशज्योतिर्लिंगस्तोत्रा'त रामेश्वराविषयी जो श्लोक आहे त्यात वानरांनी बांधलेल्या सेतूचा आणि रामसंस्थापित रामेश्वरलिंगाचा असा उल्लेख आहे:

सुताम्रपर्णीजलराशियोगे निबध्य सेतुं विशिखैरसंख्यैः ।
श्रीरामचन्द्रेण समर्पितं तं रामेश्वराख्यं नियतं नमामि ॥


भगवान शंकराच्या बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक ज्योतिर्लिंग आणि भारताच्या चारधाम यात्रेतील एक धाम म्हणून रामेश्वर हे तीर्थक्षेत्र फारच प्रसिद्ध आहे. भारताच्या अगदी दक्षिणेकडील आग्नेय टोकाशी ऐन समुद्रात हे स्थळ असून तेथे आता रेल्वेने जाण्याची सोय केलेली आहे.

रामेश्वर तीर्थक्षेत्राची व्यवस्था सरकारच्या ताब्यात असून यात्रेकरूंनी कचेरीत पैसे भरून पावती घेतल्याशिवाय कोणताही विधी तेथे करता येत नाही. देवाचे पुजारी कोकणस्थ ब्राह्मण आहेत. हे सर्व पगारी नोकर आहेत; पण त्यांचा तेथे वंशपरंपरा हक्क आहे. मंदिरात पूजेची व्यवस्था उत्तम असून सर्व नियम कडक रीतीने पाळले जातात. फक्त साध्या दर्शनास आकार पडत नाही. मात्र दुरूनच देवाचे दर्शन घ्यावे लागते. गाभाऱ्यात सर्वांना मज्जाव आहे.

रामेश्वर देवाच्या दर्शनासाठी आणि त्या यात्रेच्या विधीसाठी तेथे

नित्य गर्दी चालूच असते. केवळ यात्रेकरूंच्या अफाट उत्पन्नावर या सर्व देवस्थानाचा अवाढव्य खर्च भागविला जातो.

रामेश्वरमंदिराच्या प्रवेशद्वाराशी अत्यंत भव्य आणि अप्रतिम असे गोपुर आहे. त्यावरील देवतांच्या मूर्ती आणि चित्रे प्रेक्षणीय आहेत. ते विशाल वास्तु-सौंदर्य पाहून प्रत्येक जण थक्क होऊन जातो. मंदिरात जाताना वाटेत दुतर्फा दुकाने दिसतात. त्यात फोटो, चित्रे, शंख, शिंपा, कवड्या व इतर जलचर प्राण्यांचे अवशेष विक्रीसाठी मांडलेले दिसतात. आत एकात एक अशी पाच महाद्वारे आहेत. ती सर्व प्रदक्षिणेच्या मार्गावर असून मधून मधून अनेक दालने आणि सभामंडप आहेत.



श्रीरामेश्वराचा नंदी

रामेश्वरमंदिराचे सारे प्रचंड बांधकाम दगडांचे केले आहे. वास्तविक रामेश्वर बेटात चोहोकडे वाळूच वाळू असून तेथे दगडाचे नावही नाही. मग या देवळासाठी तीन तीन पुरुष उंचीचे अजस्र खांब, चाळीस फूट लांबीच्या व पाच फूट रुंदीच्या प्रचंड दगडी तुळया, अत्यंत भव्य असा दगडी नंदी या सर्वांसाठी दगड आणलेला आहे तो मुद्दाम थेट कित्येक कोसांवरून विजयानगरजवळून ! किती प्रचंड सामर्थ्य होते त्या प्राचीन

कारागिरांचे ! हे काळ्या कठीण दगडांनी बांधलेले प्रचंड मंदिर मदुरेच्या मीनाक्षीमंदिरापेक्षाही मोठे आहे. रामावतारात वानरांनी समुद्रावर सेतू बांधला होता. त्या दगडातूनच पुढे हे मंदिर बांधले असावे, असेही म्हणतात ! अद्यापही पाल्कच्या उथळ सामुद्रधुनीत तसे काही दगड पडलेले दिसतात.

रामेश्वर महादेवाचे लिंग वाळूचे असून पिंड मात्र गंडकी शिळेची आहे. ती सुमारे एक दीड फूट उंचीची आहे. गाभाऱ्यात अंधार असला तरी दीपांच्या व कापराच्या उजेडात त्या पिंडीचे दर्शन बाहेरून सहज घेता येते.

देवळाच्या आवारात चोवीस विहिरी असून त्यांना पवित्र तीर्थे मानतात. त्यांचे पाणी गोड असून निरनिराळ्या चवींचे आहे. वास्तविक ऐन समुद्रात असलेल्या वाळूच्या या बेटावरील विहिरींचे पाणी समुद्रासारखे खारट असेल असे वाटते, पण ते तसे नाही; हा केवढा निसर्गचमत्कार ! ह्या तीर्थकुंडांत उतरून स्नान करता येत नाही. त्यातील पाणी बाहेर काढून घेऊनच स्नान करावे लागते.


रामेश्वर मंदिराच्या परिसरात पार्वतीदेवीचे स्वतंत्र मंदिर आहे शिवाय काशी विश्वेश्वर, वीरभद्र, गणपती, मारुती, नवग्रह वगैरे देव देवतांचीही मंदिरे आहेत.

मंगळवार, शुक्रवार आणि नवरात्र उत्सवात देवी जगदंबेची पालखी थाटाने मिरवत असते. त्या वेळी मंदिरात सर्वत्र दीपोत्सवाची शोभा करतात. देवीची उत्सवमूर्ती सुमारे तीन फूट उंच अशी आहे. ती सुवर्णाची असून अत्यंत रेखीव आहे. मूर्तीला भरजरी पोषाख आणि अलंकार घालतात. ती नयनरम्य सुंदर मूर्ती पाहून सर्वांचे चित्त हरखून जाते.

देवीची पूजा, अर्चा, मंत्रपुष्प वगैरे चारही शाखांच्या ब्राह्मणांकडून होत असते. भालदार, चोपदार ब्राह्मण आहेत. देवाची पालखी उचलणे

अनुक्रम ३७८२२ दि. २१.११।६५. क्रमांक ३५५ कौ. क्र. १७।२।६५

वगैरे कामेही हे ब्राह्मणच करतात. देवीची पालखी देवालयाच्या आवारातच तीन प्रदक्षिणा घालून मिरवितात. सिंहासनासारखी ती पालखी आणि तिची मिरवणूक फारच प्रेक्षणीय असते. प्रत्येक प्रदोषाला आणि महाशिवरात्रीच्या उत्सवाला भगवान श्रीरामेश्वर शंकराची उत्सवमूर्तिही अशीच थाटाने मिरविली जाते. त्या मूर्तीचे दर्शन घेण्यात सर्वांना धन्यता वाटते. देवाच्या मिरवणुकीसाठी स्वतंत्र हत्ती आहेत. हत्तीवर अंबारी घालून प्रदक्षिणेच्या मार्गावर तो डौलाने मिरवितात. त्या वेळी छताला टांगलेल्या हंड्या अंबारीच्याहीपेक्षा वर असतात. इतकी ती दालने उंच आणि भव्य आहेत! त्या सर्व दालनांतून नाना प्रकारे केलेला दीपांच्या शोभेचा थाट कौशल्यपूर्ण दिसतो. सोमवार, प्रदोष, शिवरात्र, महाशिवरात्र



श्रीरामेश्वराचा चांदीचा रथ

वगैरे प्रसंगीही मंदिरात सर्वत्र दिव्यांचा थाट मोठा मजेदार करतात. त्या वेळी मंदिरात माणसांची प्रचंड दाटी असते. रात्री दोन वाजेपर्यंत तो थाट चालतो.

तिची

तसे पाहिले तर दररोजच रामेश्वराच्या मंदिरात यात्रा चा
पण महाशिवरात्र किंवा महापर्वणी वगैरे प्रसंगी अगदी
व नेपाळ–भूतानपासून हजारो यात्रेकरू लोक थेट
आणि मग येथे विशाल भारताचे विराट दर्शन हो

अंतःकरणाचा विस्तार झालेला प्रत्येक जण पुढे रामेश्वराला येत असतो आणि येथे त्याला रामेश्वरमंदिराच्या प्रवेशद्वारावरील ते प्रचंड गोपुर आणि ते महान् विशाल मंदिर पाहायला मिळते, तेव्हा तर त्याच्या आश्चर्याला आणि आनंदाला सीमाच राहात नाही !

चार धामात बद्रीनाथासारख्या अवघड धामाच्या यात्रेसाठीही कितीतरी लोक जात असतात. त्या मानाने रामेश्वरधाम तर अत्यंत सोपे आणि सोयीचे आहे ! म्हणूनच त्या ठिकाणी लाखो यात्रेकरू येत असतात. बाराही महिने हे धाम खुले असते. बारा महिने सतत येथे यात्रा चालूच असते.

त्या सर्व यात्रेकरूंनी दर्शनाखेरीज इतर बाबतीत सरकारी कराची पावती घेतल्याखेरीज कोणताही व्यवहार होत नाही. देवापुढे कोणतीही वस्तू अगर पैसा तसा ठेवता येत नाही. तो तेथील बंद तोंडाच्या घागरीतच टाकावा लागतो. तेथील कोणत्याही नोकराला दान घेता येत नाही. सर्वच व्यवहार सरकारी कडक बंदोबस्ताचा असतो आणि ती गोष्ट इतर तीर्थक्षेत्रांच्या मानाने चांगलीच आहे. त्यामुळे प्रत्येक यात्रेकरूला त्रासाशिवाय यात्रा करता येते. देवळाच्या सर्व उत्पन्नातूनच देवळातील व्यवस्थेचा प्रचंड खर्च भागविला जातो. यात्रेकरूंच्यामुळेच रामेश्वरातील मजूर, व्यापारी, कारागीर, पंडे वगैरेंचे पोषण होते. येथे पाण्यासारखा पैसा नित्य येत असतो.

रामेश्वर मंदिराचा काही भाग मोडकळीस आला होता. तो उतरून घेऊन पुनः जसाच्या तसा बांधण्याचे काम 'नाटकोट' नावाच्या एका मोठ्या तेल कंपनीने केले आहे. या कामी तिने लाखो रुपये खर्चून दहा वर्षे सुमारे हजारो माणसांना काम दिले. पार्वतीदेवीच्या भव्य ...रपाचे कामही त्याच कंपनीने केले आहे. त्याचा पाया दोन पुरुष असून

घालतात. त...

देवीची पूजा,

होत असते. भालद...

रामेश्वर बेट हे वाळूचे बेट असल्यामुळे तेथे इतर उत्पन्न काहीही काढता येत नाही. पण काही ठिकाणी भाताचे पीक काढतात. तो तांदूळ भारी असतो. या बेटावर हिवाळ्यात पाऊस पडतो. सभोवती समुद्र असला तरी वाळूमुळे येथील उन्हाळा चांगलाच जाणवतो. मात्र चैत्र-वैशाखात येथील भूभाग हिरवागार आणि नयन-रम्य दिसतो.

रामेश्वराला येणाऱ्या यात्रेकरूने येथे तीर्थक्षेत्रातील सगळे विधी केले पाहिजेत. पुरुष क्षौर करतात. नंतर समुद्रस्नान आणि चोवीस तीर्थांत स्नाने करतात. काशीहून आणलेली गंगा कचेरीत द्यावी लागते आणि नंतर कचेरीतून पुनः ती घ्यावी लागते. नंतर पूजाअर्चा, दानधर्म वगैरेंची पावती घेऊन मंदिरात जावे लागते. तेथे दारावरच ते सर्व पूजा-साहित्य आणि पावती देऊन देवदर्शन घ्यावे लागते. प्रसाद मिळाल्यावर तेथून सुटका होते.

सेतू आणण्यासाठी रामेश्वरापासून दूर समुद्रातील भूशिर धनुष्यकोटी येथे जावे लागते. तेथे पश्चिम समुद्र रत्नाकर आणि पूर्व समुद्र महोदधी यांच्या संगमावर स्नान करून ओंजळभर वाळू सेतू म्हणून घेऊन ती परत रामेश्वराला आणावी लागते. सेतुमाधवाच्या मंदिरात त्या वाळूची पूजा करून त्याचे तीन भाग करावे लागतात. त्यांपैकी एक भाग प्रसाद म्हणून घेऊन तो अगदी जपूनच ठेवावा लागतो. त्यांतला कणही सांडणे हे पाप समजतात.

काशीतील बिंदुमाधवाजळ स्नान करून तेथून घेतलेली गंगा थेट रामेश्वराला वाहायची आणि रामेश्वराहून आणलेला सेतुमाधवाचा तो प्रसाद प्रयाग येथे वेणीमाधवाकडे न्यायचा. त्या सेतूची पिंडी करून यथाविधी पूजा झाली की, तो सेतू तेथे त्रिवेणी संगमात विसर्जित करायचा आणि नंतर तेथून प्रसाद म्हणून घेतलेली गंगा घरी आणून तिची

पूजा करून सर्वांना तीर्थ-प्रसाद वाटायचा! अशा रीतीने या यात्रेची संपूर्ण सांगता होत असते.

-रामेश्वर ह्या पुराणतीर्थ-क्षेत्राला अलीकडे नवीन रूप प्राप्त होत आहे. विजेची सोय आणि नळाच्या पाण्याची सोय, यात्रेकरूंची निवासस्थाने वगैरेंमुळे ह्या पवित्र तीर्थ-क्षेत्राचा महिमा आणखी वाढत आहे. भारतीय संस्कृतीचे ते महान् पूज्यस्थान आहे. या क्षेत्राविषयी आणि तेथील व्यवस्थेविषयी सर्वांना आनंद व अभिमान वाटतो. प्रत्येक हिंदूने आपल्या आयुष्यात काशी-रामेश्वराची यात्रा केली तर त्याचे जीवन सफल होते, अशी आपल्याकडे निष्ठेची भावना आहे.


देवी अहल्याबाई होळकर यांनी तर थेट काशीच्या गंगेची कावड दररोज रामेश्वराला यावी, अशी व्यवस्था केली होती.

कोणतेहि काम आपण अंगावर घेतले म्हणजे आपण म्हणत असतो की, "ही काशीची गंगा मी केव्हा एकदा रामेश्वराला वाहीन असे झाले आहे!" म्हणजे या कामाची सांगता कशी लौकर होईल आणि त्या कामी पुण्य लाभून जीवनाचे सार्थक होईल, असे आपणास वाटत असते.

पुरुषोत्तम श्रीरामाने ज्या ठिकाणीं सेतू बांधून कार्यसिद्धी केली आणि जेथे त्यांनी स्वहस्ते शिवलिंगाची स्थापना करून विश्वाच्या मंगलाची प्रार्थना केली त्या स्थळी श्रीशंकराचे हे महान ज्योतिर्लिंग रामेश्वर, भक्तांच्या मनःकामना सदैव पुरविणारे जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध आहे.

जवळच गंधमादन पर्वत होता. तेथे आता फक्त पांढऱ्या वाळूच्या टेकड्या आहेत. तेथून ह्या थोर रामेश्वर तीर्थक्षेत्राचे विहंगम दृश्य विलक्षण विलोभनीय दिसते. तेथेही उभे राहून हात जोडून प्रत्येक जण जयघोष करतो : जय रामेश्वर! जय रामेश्वर!

* * *



## ८ : श्रीऔंढ्या नागनाथ

पुराणकाळात अनेक राक्षसांनी श्रीशंकराला प्रसन्न करून घेतले आणि त्या वरप्रसादामुळे भयंकर उत्पात करून जगाला त्यांनी 'त्राहि भगवन्' करून सोडले. नंतर त्या दैत्यांचा नाश करण्यासाठी आदिशक्ति पार्वतीने अनेक वेळा अवतार घेऊन जगाला सुखी केले. पण त्याच्या उलट असेही एक विशेष उदाहरण आहे की, दारुका नावाच्या राक्षसीने तप करून देवी पार्वतीला प्रसन्न करून घेतले आणि त्या वरप्रसादाने तिने जगाला पीडा देऊन उत्पात मांडला. तेव्हा सज्जनांच्या आणि भक्तांच्या परित्राणासाठी भगवान शंकराला अवतार घ्यावा लागला. त्या विशेष प्रसंगाचे स्मृतिस्थान म्हणजेच औंढ्या नागनाथ हे पवित्र क्षेत्र होय!

दारुका राक्षसीच्या तपश्चर्येला प्रसन्न होऊन देवी पार्वतीने तिला एक स्वतंत्र वन देऊन टाकले. त्या वनात तिला कोणाही देवदेवतेपासून त्रास होणार नाही, असा वरही दिला. तिला अभय देऊन निर्भय केले. तेव्हापासून दारुका राक्षसी आणि तिचा पती दारुक हे उभयता

ऋषीमुनींना आणि देवाब्राह्मणांना छळून त्या वनात आणून बंदिस्त ठेवू लागले. बंदीत पडलेल्या लोकांनी परमेश्वराची प्रार्थना केली, पण त्या ठिकाणी कोणत्याही देवाचा इलाजच नव्हता !

एके दिवशी त्या बंदिजनांपैकी कोणा एका शिवभक्ताने इतर लोकांना शिवभक्तीचा आणि शिवशक्तीचा महिमा सांगून सर्वांनी मिळून आर्त-स्वराने शिवाराधना करण्यास सांगितले. " ॐ नमः शिवाय " ह्या पंचाक्षरी मंत्राचा घोष त्या दारुकावनात दुमदूमू लागला त्यामुळे कैलास डळमळू लागले. शंकराची समाधी भंग पावली.

त्या मंत्रघोषाने दारुकराक्षस संतापला आणि पिसाटासारखा धावत येऊन तो त्या सर्व ब्राह्मणांना मारू लागला. त्याच्या त्या मारण्याच्या वेगाबरोबरच शिवमंत्रघोषांचा वेगही वाढला आणि काय आश्चर्य ! थोड्याच वेळात प्रत्यक्ष भगवान शंकर त्या दारुकावनात प्रगट झाले.

पार्वतीच्या वराने निर्भय झालेल्या त्या निर्दय दारुकदांपत्याला पार्वतीवराने शासन करण्याचे ठरविले. त्या वनात कोणत्याही देवदेवते-पासून त्या राक्षसांना त्रास होणार नव्हता, तरीही देवाब्राह्मणांना आणि शिवभक्तांना त्रास देणाऱ्या त्या उन्मत्त दैत्यांना महादेवाने ठार केले आणि आपल्या भक्तांना संकटमुक्त केले.

कैलासाहून मृत्युलोकावर आलेल्या त्या शंकराच्या ज्योतिर्मय मूर्ती-भोवती पाताळातील सर्व नागांनी संरक्षक वेष्टन देऊन विलक्षण योग साधला होता. त्या नागेश शंकराने त्या वेळी दिव्य अवतार घेऊन भक्तांचे रक्षण केले.

भक्तांचा कैवारी भगवान शंकर नागनाथ रूपाने त्या दारुकावनात राहू लागला. त्याने त्या दुष्ट राक्षसीचा नाश केला खरा, पण पर्यायाने पार्वतीच्या वरालाही एक प्रकारचा कमीपणा आणला; म्हणून तो मनाशी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.



शंकर जसे विषण्ण होऊन उदास फिरत होते, तसेच या वेळी ते विरक्त होऊन दारुकावनात फिरत होते. काय करावे ते त्यांचे त्यांनाच कळेना. दिगंबर अवस्थेतील त्या नागनाथांभोवती भक्त स्त्रीपुरुषांचे थवे सदैव फिरत होते. त्यांच्या अनुग्रहासाठी ते आसुसलेले होते. अशा स्थितीत एके दिवशी आणखी एक महान चमत्कार झाला.

त्या नागेश शंकराने त्या दारुकावनातील एका जलाशयात उतरून आपल्या देहस्वरूपाचे भस्म करून घेतले आणि त्या ठिकाणी एका दिव्य ज्योतिर्लिंगाच्या रूपाने भक्तांना दर्शन दिले. त्या वेळी तेथे 'जय नागनाथ, जय नागेश' असे जयघोष झाले.


दारुकावनातील जलाशयाच्या अमृतमय उदकात भगवान शंकराच्या प्रकाशमान् दिव्य ज्योतिर्लिंगाची पूजा नाग लोकांनी केली आणि लोकांनी त्या नागनाथाच्या भव्य ज्योतिर्लिंगाची त्या स्थळी विधिपूर्वक स्थापना केली.

शंकराच्या बारा ज्योतिर्लिंगांपैकी हे 'नागेशं दारुकावने' आठवे ज्योतिर्लिंग म्हणून भारतात प्रसिद्ध आहे. अमृतोदकातील हे दिव्य ज्योतिर्लिंग नागांकडून पूजले गेले, म्हणून याला नागेश हे नाव आहे आणि त्या स्थळाला – अमृत – अमर्दकक्षेत्र – औंढा क्षेत्र हे नाव आहे.

मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यात – कळमनुरी तालुक्यात पूर्णा-हिंगोली लोहमार्गावर चोंडी स्थानकापासून आठ मैल अंतरावर हे औंढ्या नागनाथाचे स्थान आहे. महाराष्ट्रातील ह्या तीर्थक्षेत्राची यात्रा करण्यासाठी हजारो शिवभक्त नित्य तेथे जातात आणि ह्या दिव्य शिवदर्शनाने जीवन पावन करून घेतात.

श्रीनागनाथांचे हे औंढा क्षेत्र आजही टेकड्याटेकडयांनी सर्व बाजूंनी

औंढा क्षेत्राभोवती जुनाट तट असून गावाजवळच श्रीनागनाथाचे मंदिर आहे. ह्या मंदिराला सुमारे वीस फूट उंचीचा तट असून त्याच्या चार प्रवेशद्वारांपैकी उत्तरेकडील प्रवेशद्वार हेच मुख्य प्रवेशद्वार म्हणजे महाद्वार मानले जाते.



नागेश्वर मंदिराचा सभामंडप


मंदिराच्या प्रशस्त प्रांगणाभोवती भक्कम आणि भव्य ओवऱ्या बांधलेल्या आहेत. हे सर्व बांधकाम कोणा एका 'तूपकरी' नावाच्या थोर शिवभक्त व्यापाऱ्याने केलेले आहे, असे सांगतात.

उत्तर प्रवेशद्वाराशी असलेल्या रमणीय बागेत त्या श्रद्धावान् भक्त 'तूपकऱ्या'ची एक छोटीशी समाधी आहे. त्या बागेतील विहिरीवर एंजिन बसवून नागनाथमंदिरात विजेचा प्रकाश केलेला आहे. ही सोय येथे फारच छान आहे.

पश्चिमाभिमुख असलेले श्रीनागनाथाचे मंदिर द्वादशकोनी हेमाडपंती बांधणीचे आहे. मंदिराच्या मुखमंडपावर सुंदर कळस असून त्यासमोरच नंदीमंडप आहे.

मुख्य द्वाराखेरीज उत्तर-दक्षिण दिशांना आणखी दोन द्वारे असून त्यांच्यावरही छत आहे. हे सर्व मंदिर शिल्पकलासौंदर्याचा अप्रतिम नमुना आहे. मंदिरात ठिकठिकाणी कोरीव मूर्ती आणि शिल्पशिला बसविलेल्या आहेत. हत्ती, घोडे, स्वार, योद्धे, कमळे, यती आणि हरप्रकारच्या शिवमूर्ती या मंदिराच्या शिल्पकामांत कोरलेल्या आहेत.

भिंतीवरील कोनाडयात शिवपार्वतीचे एक सुंदर शिल्प प्रेक्षणीय आहे. रुसलेल्या पार्वतीची समजूत घालणारा शिव म्हणजे कोमल



मंदिराच्या भिंतीवरील शिवपार्वती शिल्प

भावशिल्पाचा एक सुंदर नमुना तर आहेच, पण त्यातच दारुकावनात शिवाने केलेल्या आगमनाचा पश्चात्तापही दर्शित केलेला असावा.

काही ठिकाणी बुद्धमूर्तीही कोरलेल्या आहेत. त्या पाहून अंजिठा-वेरूळच्या शिल्पकलेची आठवण येते. दक्षिणेकडील भिंतीवर गणेशाच्या बहुविध सुंदर मूर्ती आहेत.

एकंदरीत नागनाथाचे मंदिर आणि त्याचा प्रांगणपरिसर फारच प्रेक्षणीय आहे. चिकित्सकांना तो अभ्यासाचा एक मोठा विषय आहे.

मंदिराच्या आतल्या भागात मध्यमंडप असून तो वर्तुळाकार आहे.

त्यातील आठही खांब कोरीव कामाच्या नक्षीने सुंदर बनविलेले आहेत.

मध्यमंडपातील कासवाजवळ उभे राहून गाभाऱ्यात पाहावे तर नागनाथाचे दर्शन होत नाही. कारण त्या दर्शनी गाभाऱ्यात देव नसून तो आतल्या खोल गाभाऱ्यात आहे. त्या छोट्या पण मुख्य गाभाऱ्यात देवदर्शनासाठी जाणाऱ्या भक्तांना अत्यंत नम्रता धारण करावी लागते. ते प्रवेशद्वार कोनाड्यासारखे लहान असून तेथे अंधार असतो.


तळघरासारख्या त्या गुप्त गाभाऱ्यात श्रीनागनाथाचे भव्य ज्योतिर्लिंग समयांच्या मंद प्रकाशात खुलत असते. त्या पिंडीवर अभिषेकपात्रामधून जलाची संतत धार पडत असते. तेथील वातावरण अत्यंत भावपूर्ण असते. त्या अमृतोदकामधील दिव्य ज्योतिर्लिंगाच्या पवित्र दर्शनाने भक्ताला शांतिसुखाचा अनुभव येतो !

रम्यस्थानीं नांदणाऱ्या आणि भक्तिमुक्तीचे देणे देणाऱ्या भोगभूषित नागनाथाला वंदन करताना शंकराचार्यांनी म्हटले आहे :

याम्ये सदंगे नगरेऽतिरम्ये विभूषितांगं विविधैश्च भोगैः ।
सद्भक्तिमुक्तिप्रदमीशमेकं श्रीनागनाथं शरणं प्रपद्ये ॥

हे नागेशाचे जागृत देवस्थान भाविकांच्या नवसाला पावते, याबद्दल अनेक अनुभव आहेत. असे सांगतात की, "एका स्त्रीने मुलगा व्हावा म्हणून नागेशदेवाला काजळ घालून दूध पाजण्याचा नवस केला होता. पुढे तिला देव पावला ! ती नवस फेडण्यास गाभाऱ्यात आली तो काय चमत्कार ! तेथे पिंडीवर प्रत्यक्ष नागदेव फडा काढून बसलेला ! बाई घाबरली. ओरडली. लोक जमले. तरी तो नागेश तसाच बसलेला ! शेवटी कोणालाही त्याच्या डोळ्यांत काजळ घालून त्याला दूध पाजण्याचे

शेवटी कंटाळून रात्री तो नाग फडा आपटून निघून गेला आणि पुनः आश्चर्य झाले की, त्याच वेळी त्या बाईचा मुलगा मरण पावला. देवाला नवस करून तो फेडण्याचे धैर्य ज्यांना होत नाही, त्यांना हे असेच फळ मिळणार ! म्हणून प्रत्येकाने केवळ निष्काम भक्ती करून सर्व-कल्याणासाठी ईशचिंतन केले पाहिजे. हाच जणू त्या नागनाथाचा संदेश आहे.



श्रीनागनाथाचे मंदिर

येहळेगावचे सत्पुरुष तुकाराम महाराज येहळेगावकर हे श्रीनागनाथाचे परमभक्त होते. ते त्यांच्या गावाहून रोज औंढयास येत. ते जातीने ब्राह्मण असून शूद्राचे अन्न सेवन करीत. जातीभेद ते मानीत नसत. एकदा नाग-नाथमंदिरात ब्राह्मणांच्या पंक्तीत ते जेवायला बसले असता सनातनी लोकांनी त्यांना त्या पंक्तीतून पानावरून उठवले. तेव्हा नागनाथाचा कोप झाला आणि अकस्मात आकाशातून हजारो घारी येऊन त्यांनी ते अन्न उचलून नेले. सगळेच ब्राह्मण उपाशी राहिले. त्यांनी देवाची

प्रख्यात शिवभक्त विसोबा खेचर हे राहात होते. त्यांचा गुरूपदेश घ्यावा म्हणून नामदेव त्यांच्या शोधात होते.

गोराकुंभार यांच्या घरी संतमेळा जमला होता. तेव्हा मुक्ताबाईंनी हातात थापटणे घेऊन प्रत्येक संताच्या डोक्यावर मारून पाहिले त्या वेळी नामदेवाचे मडके म्हणजे डोके कच्चे आहे, असे त्यांना आढळले. नामदेवाला तो अपमान सहन झाला नाही, पण जेव्हा प्रत्यक्ष पांडुरंगाने त्याला सांगितले की, " बाबा रे, अहंकार सोड आणि गुरूचा उपदेश घे. गुरू केल्याशिवाय परमार्थ व्यर्थ आहे ! "

विसोबा खेचर हे नामदेवाचे गुरू होण्यास योग्य आहेत, असे सर्वांनी सांगितले. म्हणून त्या थोर विभूतीचा शोध घेत नामदेव औंढ्यास आले. पण पाहातात तो काय चमत्कार—ते विसोबा खेचर नागनाथाच्या पिंडीवर पाय देऊन खुशाल पडलेले आहेत. " वाहवा रे माणूस ! याला का आपण गुरू करणार ! "

नामदेवाला राग आला. त्याने विसोबाला विचारले, तेव्हा विसोबा हसून म्हणाले, " खरंच की ! माझे पाय नागनाथाच्या पिंडीवर आहेत ! बाबा नामदेवा, मी वृद्ध आहे. तेवढे माझे पाय उचलून खाली जमिनीवर ठेव ! "

नामदेवाने विसोबांचे पाय धरले. ते उचलून दुसरीकडे ठेवले. तोच पुनः आश्चर्य ! त्या स्थळीसुद्धा विसोबाच्या पायांखाली महादेवाची पिंड होती. नामदेवाने पुनः पाय उचलून तिसरीकडे ठेवले. तरीही त्या पायांखाली पुनः पिंड होतीच !

असे पुष्कळ वेळा केले, पण छे ! त्याला तोच चमत्कार सर्वत्र आढळला. तेव्हा नामदेवांचा गर्व गळाला, राग पळाला. त्याला 'खरा' गुरू मिळाला. त्याने त्या सद्‌गुरूचा उपदेश घेतला आणि "परमेश्वर सर्वत्र आहे, मीतूपण व्यर्थ आहे, " ह्या अद्वैताची साक्ष त्याला पटली. नामदेवाने गुरू केला,

तेंव्हाच त्याला मोक्षमार्ग मोकळा झाला. ही घटना नागनाथमंदिरात घडली म्हणून तेथे ती आठवण कायम राहिली.

नागनाथाच्या मंदिरासमोर नामदेव एकदा कीर्तन करीत होते. आत मंदिरात त्याच वेळी ब्रह्मवृंद देवाला अभिषेक करीत होता. त्यांच्या मंत्रघोषात त्या भजनामुळे अडथळा येऊ लागला, तेंव्हा ते ओरडून नामदेवाला म्हणाले, " अरे, टाळ कुटणे बंद कर, नाहीतर देवळामागे जाऊन खुशाल भजनाची कटकट कर ! "


बिचारा नामदेव ! त्याने तेथून तो भजनाचा फड उठविला आणि तो देवळामागे जाऊन उभा केला. तितक्यात देवाने काय नवल घडविले— नामदेवाचे भजन ऐकण्यास देवाने आपले मुख तिकडे वळविले. नागनाथाचे सबंध मंदिर पूर्वेकडून पश्चिमेकडे फिरले. नामदेवासाठी देवाचे देऊळ फिरले !

हा चमत्कार पाहून सगळ्यांनी तोंडात बोट घातले. अलोट गर्दी तेथे लोटली. सर्वांनी त्या थोर भक्ताच्या चरणी लोटांगणे घातली. त्या वेळी जे मंदिर फिरले ते अद्यापही तसेच कायम आहे. त्या आठवणीने देव आणि भक्त यांच्या प्रेमाला उजळा मिळतो. नागनाथ मंदिराच्या समोरच नंदीमंडपामागे हे नामदेवस्मृतीचे एक छोटेसे शिवालय बांधले आहे. त्याला नामदेवमंदिर म्हणतात.

नागनाथमंदिराजवळच ' नागतीर्थ ' ह्या नावाचे एक पवित्र तीर्थकुंड आहे. चोहों बाजूंना दगडी पायऱ्यांची मजबूत व सुंदर बांधणी असलेले हे तीर्थकुंड ' सासूसुनेचे कुंड ' म्हणून संबोधले जाते. कारण मुख्य नागतीर्थाच्या आतच आणखी बारत्रेप्रमाणे बांधलेले अतिपावन असें ' ऋणमोचन तीर्थ ' आहे. ह्या दोन्ही तीर्थकुंडातील पाणी पोहऱ्याने शेंदून वर घेऊन यात्रेकरूंना स्नान करावे लागते. ह्या नागतीर्थांत सुमारे बारा वर्षांनी येणाऱ्या कपिलाषष्ठीला प्रत्यक्ष गंगा येऊन उतरते

होते. ती पर्वणी साधून तेथे स्नान करणारे लोक पुण्यवान समजले जातात.

ह्याखेरीज हरिहरतीर्थ, मोक्षतीर्थ, गयातीर्थ वगैरे पवित्र जलाशय स्नानतर्पणासाठी प्रसिद्ध आहेत. नागनाथाच्या दर्शनापूर्वी ह्या तीर्थस्नानाचा आणि तेथील हनुमानदर्शनाचा महिमा थोर मानला जातो.



नागतीर्थ आणि ऋणविमोचनतीर्थ

नागनाथमंदिराच्या दक्षिणेस नागतीर्थाच्या मागील बाजूस एक जुने देऊळ आहे. ते पूर्वाभिमुख असून त्याला तट आहे. तेथील ओवऱ्यांपैकी एका ओवरीत एकमुखी दत्तमूर्ती आहे. छोट्या मंदिरात मुरलीमनोहर आणि दत्तमूर्तीही आहे. मागील बाजूस एक विहीर व ओटा असून तेथे वीणावादिनी अप्सरा, एक मोठे जाते आणि असंख्य शिल्पसुंदर शिळा पडलेल्या आहेत.

औंढा क्षेत्रात अशी कितीतरी मंदिरे आहेत. की, त्या सर्वांचे दर्शन एकाच यात्रेत प्रत्येकाला घेणे अशक्य आहे! तथापी गावाच्या दक्षिणेस एक मैलावर गोकर्णपर्वताच्या पायथ्याशी दोग्धा नदीच्या काठी असलेले कनकेश्वरीदेवीचे मंदिर पाहून त्या माता पार्वतीचे दर्शन घेतल्याशिवाय ही यात्रा सफलच होत नाही. ह्या मंदिराचा परिसर निसर्गरम्य आहे. ही कनकेश्वरी देवी म्हणजे श्रीनागनाथ शंकराची पत्नी देवी भवानीच आहे. ह्या दारुकावनात तिचे विशेष महत्व मानतात. ती अखंड वरदायिनी आहे.

कनकेश्वरी देवीच्या मंदिरापासून दक्षिणेस एक मैलावर डोंगराळ भागात आणि दाट झाडीत आनंदीमहाराज नावाच्या एका निःस्पृह

आहे. आषाढी एकादशीला दरवर्षी तेथे मोठी यात्रा भरते.


गावात दशनामी संन्याशांचे अनेक मठ आहेत. लिंगायतपंथियांचे मठ आहेत. अनेक शिवलिंगे आणि मंदिरे आहेत. थोर भक्तांच्या आठवणी तेथे जागृत आहेत. संतसज्जनांच्या समाध्या आणि स्मृतिस्थळे आहेत. औंढा हे गाव एक खेडे असले तरीही ते नागेश ज्योतिर्लिंगामुळे महान पावनक्षेत्र बनले आहे. दारुकावनात अमृतोदकाच्या ह्या पवित्र-क्षेत्रात भगवान नागेशाचे दिव्य ज्योतिर्लिंग भाविकांच्या कामना पूर्ण करीत आहे.

☆ ☆ ☆

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम .................... वि: ....................
क्रमांक .................... नोंद दि ....................

होते. ती पर्वणी साधून तेथे स्नान करणारे लोक पुण्यवान समजले जातात.

ह्याखेरीज हरिहरतीर्थ, मोक्षतीर्थ, गयातीर्थ वगैरे पवित्र जलाशय स्नानतर्पणासाठी प्रसिद्ध आहेत. नागनाथाच्या दर्शनापूर्वी ह्या तीर्थस्नानाचा आणि तेथील हनुमानदर्शनाचा महिमा थोर मानला जातो.



नागतीर्थ आणि ऋणविमोचनतीर्थ

नागनाथमंदिराच्या दक्षिणेस नागतीर्थाच्या मागील बाजूस एक जुने देऊळ आहे. ते पूर्वाभिमुख असून त्याला तट आहे. तेथील ओवऱ्यांपैकी एका ओवरीत एकमुखी दत्तमूर्ती आहे. छोट्या मंदिरात मुरलीमनोहर आणि दत्तमूर्तीही आहे. मागील बाजूस एक विहीर व ओटा असून तेथे वीणावादिनी अप्सरा, एक मोठे जाते आणि असंख्य शिल्पसुंदर शिळा पडलेल्या आहेत.

औंढा क्षेत्रात अशी कितीतरी मंदिरे आहेत. की, त्या सर्वांचे दर्शन एकाच यात्रेत प्रत्येकाला घेणे अशक्य आहे! तथापी गावाच्या दक्षिणेस एक मैलावर गोकर्णपर्वताच्या पायथ्याशी दोग्धा नदीच्या काठी असलेले कनकेश्वरीदेवीचे मंदिर पाहून त्या माता पार्वतीचे दर्शन घेतल्याशिवाय ही यात्रा सफलच होत नाही. ह्या मंदिराचा परिसर निसर्गरम्य आहे. ही कनकेश्वरी देवी म्हणजे श्रीनागनाथ शंकराची पत्नी देवी भवानीच आहे. ह्या दारुकावनात तिचे विशेष महत्व मानतात. ती अखंड वरदायिनी आहे.


कनकेश्वरी देवीच्या मंदिरापासून दक्षिणेस एक मैलावर डोंगराळ भागात आणि दाट झाडीत आनंदीमहाराज नावाच्या एका निःस्पृह

आहे. आषाढी एकादशीला दरवर्षी तेथे मोठी यात्रा भरते.

गावात दशनामी संन्याशांचे अनेक मठ आहेत. लिंगायतपंथियांचे मठ आहेत. अनेक शिवलिंगे आणि मंदिरे आहेत. थोर भक्तांच्या आठवणी तेथे जागृत आहेत. संतसज्जनांच्या समाध्या आणि स्मृतिस्थळे आहेत. औंढा हे गाव एक खेडे असले तरीही ते नागेश ज्योतिर्लिंगामुळे महान् पावनक्षेत्र बनले आहे. दारुकावनात अमृतोदकाच्या ह्या पवित्र-क्षेत्रात भगवान नागेशाचे दिव्य ज्योतिर्लिंग भाविकांच्या कामना पूर्ण करीत आहे.

☆ ☆ ☆

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ वि: ........................
क्रमांक ........................ नों दि ........................



# ९ : श्रीकाशीविश्वेश्वर

श्रीविश्वेश्वराचे निवासस्थान असलेली काशी ही नगरी भारतीय परंपरेतील सर्व पवित्रतेची खाण आहे. काशी हे जणू भारताचे धर्महृदय आहे. सात मोक्षदायक पुऱ्यांमधली सर्वश्रेष्ठ पुरी आणि बारा ज्योतिर्लिंगांच्या स्थानांपैकी सर्वांत गाजते स्थान म्हणून काशीचा लौकिक हजारो वर्षांपासून आहे.

काशी म्हणजे प्रकाशणारी नगरी. जी शिवाच्या तेजाने नित्य प्रकाशमान झाली आहे, ती काशी. काशीला वाराणसी, अविमुक्तक्षेत्र, आनंदवन आणि महास्मशान अशीही आणखी नावे आहेत. वरुणा आणि असी यांच्या संगमावर वसली आहे म्हणून वाराणसी ( वरुणासी ); शिवाला ज्या ठिकाणी निवास करताना आनंदाचा अखंड ठेवा लाभला, ते आनंदवन; ज्या स्थानाला शिव-शक्ति आपल्या संपर्कातून कधीही

अनुक्रम ... वि: ... क्रमांक ... नौ वि ...

विमुक्त होऊ देत नाहीत. ते विमुक्तक्षेत्र आणि प्रलयकाळी शिव जेथे सर्व सृष्टीचा संहार करतो, ते महास्मशान. असा या विविध नावांचा उलगड पुराणांनी केला आहे.


शिव कैलास सोडून येथे राहावयास कसा आला, त्याची कथा पुराणात अशी आढळते : शिवाने हिमालयावर सतत राहणे इष्ट नव्हे, असे पार्वतीच्या मनात आले. कारण हिमालय हे तिचे माहेर. आपल्या पतीने कायम सासऱ्याच्या घरीच निवास केला. तर ते त्याच्या आणि आपल्या प्रतिष्ठेला बाधक आहे. असे वाटून पार्वती शिवाला म्हणाली, आपण येथून दुसरीकडे जाऊ या." शिवाने योग्य निवासस्थानाचा मनोमन शोध घेता, त्याला काशीक्षेत्र आवडले. मग त्याने आपल्या परिवारातील गणांपैकी निकुंभनामक गणाला सांगितले, "तू काशीचा राजा दिवोदास याला तेथून घालवून देऊन काशीक्षेत्र निर्जन करून टाक." निकुंभाने आज्ञेप्रमाणे व्यवस्था करताच शिव आपल्या परिवारासह काशीस राहावयास आला.

हद्दपार झालेल्या दिवोदासाने उग्र तप करून ब्रह्मदेवाला प्रसन्न करून घेतले. त्याने ब्रह्मदेवाजवळ वर मागितला की, "स्वर्गीच्या देवांनी आणि पाताळीच्या नागांनी आम्हा मानवांच्या पृथ्वीवरचे अतिक्रमण काढून घ्यावे." पुढे ब्रह्मदेवाने शिवाला काशी सोडण्यास सांगितले. ब्रह्मदेवाच्या आदेशानुसार शिव काशी सोडून मंदराचलावर गेला. परंतु त्याला काशीचा मोह आवरेना. मग त्याने युक्तीप्रयुक्तीने दिवोदासाला बाहेर काढण्यासाठी वेगवेगळ्या देवांना पाठविण्यास सुरुवात केली. त्यात बहुतेकांना अपयश आले. विष्णूनें मात्र दिवोदासाला ज्ञानोपदेश करून विरक्त बनविले आणि स्वेच्छेने काशीबाहेर पडावयास प्रवृत्त केले. विष्णूच्या क्लृप्तीने दिवोदासाने काशी सोडल्यावर शिव पुनः काशीक्षेत्री येऊन रमला. अशा प्रकारें शिवाला अत्यंत आवडलेले असे हे त्याचे निवासस्थान आहे.

शिवाच्या नित्य वास्तव्याने पुनीत झालेले, गंगेच्या अर्धचंद्राकार पवित्र प्रवाहाकाठी वसलेले आणि विद्वानांच्या व साधुसंतांच्या सान्निध्याने गाजत आलेले काशीनगर विस्ताराने पुष्कळच मोठे आहे. घाटाकडे जाणारे नागमोडी अरुंद बोळ, दोन्ही बाजूंना उंचच उंच वाडे, रस्त्याने चाललेले नागरिक आणि यात्रिक, कडेला असणारी मेवामिठाईची, रबडीची आणि पानाची दुकाने, क्षेत्रोपाध्यायांची लगबग, साधु-बैराग्यांचा विपुल संचार, घाटावरील स्नानार्थींची गडबड, तेथील पंड्यांच्या चौक्या, ब्राह्मणांचे मंत्रघोष आणि गल्लीबोळांतून मोकाट सुटलेले गाईबैल असे काशीचे दृश्य गजबजलेले दिसते. काशीत उतरण्यासाठी आणि धर्मकृत्ये करण्यासाठी विविध प्रांतातील क्षेत्रोपाध्ये कायमचे राहिलेले आहेत. शिवाय हॉटेले आणि धर्मशाळाही आहेत. गावात एक्के ( टांगे ), सायकलरिक्षा, टॅक्सिज, बसेस इत्यादी वाहतुकीची साधने उपलब्ध आहेत. आश्विन-कार्तिक आणि माघ-फाल्गुन हा काळ काशीयात्रेस हवामानाच्या दृष्टीने उत्तम.

काशीची प्राचीनता वेदकाळाइतकी मागे जाते. काशी किंवा काश्य नावाचे जन या भागात राहात असल्यामुळे याला काशी हे नाव प्राप्त झाले, असे वेदकालीन ग्रंथावरून दिसते. काशीचा विक्रमशाली प्राचीन राजा दिवोदास याच्या पराक्रमाची वर्णने स्कंदपुराणात काशीखंडात आढळतात. बुद्धकाळात काशीचे राज्य गाजलेले होते. त्याला त्यावेळी धार्मिक-सांस्कृतिक महत्त्वाबरोबरच व्यापारीदृष्टयाही महत्त्व होते. ह्यू-एन्-त्संग या चिनी यात्रिकाला काशीत सुमारे तीस बुद्धविहार आणि शंभरांवर मंदिरे आढळली होती. बौद्धधर्माच्या ऱ्हासकाळात वैदिकधर्मियांनी काशी येथे वैदिक धर्माच्या पुनरुत्थानाच्या प्रयत्नांची पराकाष्ठा केली. शंकराचार्यांनी आपल्या तत्त्वज्ञानाचा येथे विशेष प्रचार केला. त्यानंतर हे क्षेत्र वैदिकधर्माचे आणि संस्कृत विद्येचे माहेरघर बनले.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ग्रंथालय
अनुक्रम ........ दि. ........
क्रमांक ........ नोंद दि. ........



गंगाघाट काशी

इस्लामच्या आक्रमणानंतर मात्र भारतातील सर्व धर्मकेंद्रांप्रमाणेच काशीचेही दुर्दैव ओढवले. काशी क्षेत्र उत्तरेत मध्यवर्ती सपाट प्रदेशात असल्यामुळे आणि मुस्लिम सत्तेची केंद्रे त्याच्यापासून निकट असल्यामुळे काशीला या धर्मवेड्या सुलतानांच्या सैतानी कृत्यांची झळ वारंवार अनुभवावी लागली. प्रथम इ. स. १०३३ मध्ये गझनीच्या महंमदाच्या मुलाच्या सेनापतीने काशीत लुटालूट केली. त्यानंतर इ. स. ११९४ मध्ये महंमद घोरीच्या सेनापतीने लुटीबरोबरच मंदिरेही उद्ध्वस्त

करण्याचा प्रयत्न केला. पुढे अल्लाउद्दिन खिलजी, इब्राहिम लोदी, सिकंदर लोदी, शहाजहान यांच्या वक्रदृष्टीला बळी पडण्याचे प्रसंग काशीवर क्रमाक्रमाने गुदरतच राहिले. यावर कळस चढविला तो औरंगजेबाने. त्याने इ. स. १६६९ मध्ये काशीतील अनेक मंदिरांचा विध्वंस तर केलाच, परंतु त्यांच्या जागी मशिदी उभारून हिंदूंच्या दुबळ्या हृदयात कायमचे शल्य रोवून टाकले. त्याने जुन्या विश्वनाथ-मंदिरावर उभारलेल्या मशिदीत त्या प्राचीन भव्य मंदिराचे विपुल अवशेष यात्रिकाला अगदी स्पष्टपणे दिसून येतात. बिंदुमाधवमंदिरावर उभारलेल्या मशिदीत तर त्याने आपल्या या 'सत्कृत्या'चा शिलालेखच कोरून ठेवला आहे.

इ. स. १७२५ पर्यंत काशी संपूर्णपणे मुसलमानांच्याच अधिपत्या-खाली होती. तोवर काशीवर अयोध्येच्या नबाबाचे स्वामित्व होते. त्यानंतर काशी आणि तिच्या आसपासचा बराच प्रदेश मनसाराम नावाच्या व्यक्तीने जमीनदारी म्हणून मिळविला. याचा मुलगा बलवंतसिंग हा महत्वाकांक्षी आणि ध्येयवादी होता. त्याने अयोध्येच्या नबाबाचे स्वामित्व झुगारून दिले आणि आपण स्वतंत्र काशीनरेश बनला हे घराणे अजूनही काशीत रामनगर विभागात नांदत असून काशीराज म्हणून त्याला मानही आहे.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर भारताच्या राजकारणात मराठ्यांचे वर्चस्व वाढले आणि अठराव्या शतकाच्या मध्याला तर भारतात मराठ्यांचे साम्राज्य स्थापन झाले. परंतु काशी-प्रयाग मुक्त करण्यात त्यांना यश आले नाही. थोरले माधवराव पेशवे यांनी मृत्युसमयी राज्यधुरीणांकडून आपल्या अंतिम इच्छा पाळण्यासंबंधी शपथा घेवविल्या होत्या, त्यातील एक इच्छा अशी होती की, "श्रीकाशी–प्रयाग ही दोन्ही स्थळे सरकारात यावी, असा तीर्थरूपांचा हेतू होता, त्यास प्रस्तुत करावया जोगे दिवस आहेत.

दहा–वीस लक्षांची जहागीर मुबदला पडली तरी देउन, दोन्ही स्थले हस्तगत करावी. " पण त्या धर्मपरायण आणि कर्तृत्वशाली पेशव्याची इच्छा त्याच्या मृत्यूनंतरही पुरी होऊ शकली नाही.

इ. स. १७७५ मध्ये काशीवर इंग्रजांची सत्ता प्रस्थापित झाल्यापासून काशीला पुनः भले दिवस प्राप्त झाले आणि काशीचे धार्मिक आणि शैक्षणिक वैभव वेगाने वाढू लागले. हिंदूंच्या धर्मकारणात ढवळाढवळ करावयाची नाही, हे त्यांचे धोरण असल्यामुळे काशीच्या पुनरुज्जीवनासाठी चाललेल्या सर्व प्रयत्नांना गती लाभू शकली. आज स्वतंत्र भारतात काशीक्षेत्र आपल्या पूर्वप्रतिष्ठेसह पुनः गाजते आहे.

चार–पाच हजार वर्षांच्या प्रदीर्घ कालात अनेक चढउतार अनुभवून, अनेक धर्मपंथांचे उदयास्त पाहून आणि विद्यांच्या साधकांना प्रेरणा देऊन ही पुरातन नगरी आज नव्याजुन्याचा संगम साधून नांदते आहे.

काशीचा महिमा जेवढा विश्वनाथामुळे आहे, तेवढाच गंगेमुळेही आहे. गंगा ही विष्णूच्या चरणी रत झालेली आणि शिवाच्या मस्तकी विसावलेली पवित्र नदी आहे. हिमालयाच्या कुशीत जन्म घेऊन, उंच भागातून उड्या मारीत वाहत असताना अनेक सखींना बरोबर घेऊन आलेली ही लोकमाता उत्तर प्रदेशाच्या सपाट भूभागावरून प्रचंड जळराशीनिशी संथपणाने वाहत आहे. ज्ञानदेवांच्या भाषेत तिचा महिमा वर्णन करावयाचा तर–

फेडीत जनांचे पापताप । पोखीत तीरींचे पादप ॥
जाय जैसे आप । जाह्नवीचे ॥


भगीरथाने आपल्या तपोबळाने धरतीवर आणलेली ही स्वर्गीची अमृतप्रवाहिनी भारताच्या हजारो वर्षांच्या परंपरेची साक्षी आहे. तिच्या काठी वैदिक ऋषींनी तप केले. प्राचीन राजेमहाराजांनी यज्ञ-सोहळे पार पाडले. भगवान बुद्धाने आपल्या ज्ञानयज्ञाचा शुभारंभ केला.

साधुसंतांनी आपल्या अनुभवाला शब्दरूप दिले आणि सामान्य भाविकजनांनी आपल्या पापाचे परिमार्जन केले.

भारताच्या सर्व भूभागांतील, सर्व धर्मसंप्रदायांतील आणि जातीजमातींतील संतमहंतांनी, विद्वानांनी, सामान्य अनुयायांनी आणि धुरंधर शासकांनी गंगेचा आदर केला आहे. अनेक विरागी आपला देह गंगार्पण करण्यात स्वतःला धन्य मानतात, ज्यांना हे शक्य होत नाही, ते मृत्युसमयी आपल्या मुखी गंगाजळ पडावे, अशी अपेक्षा करतात आणि ज्यांना शक्य आहे, ते आपल्या पितरांच्या अस्थी तरी गंगाप्रवाहात विसर्जित करतात.

गंगाजळ केवळ रोचक, पाचक आहे, एवढेच नव्हे, तर ते रोगहारकही आहे. " औषधं जान्हवीतोयम् " ही भाविकांची धारणा शास्त्रीय परीक्षणानेही यथार्थ ठरलेली आहे. गंगेच्या या अनन्यसाधारण माहात्म्यामुळेच व्यासांनी " गंगेसारखे अन्य तीर्थ नाही " ( " न गंगासदृशं तीर्थम् । " ) असा तिचा गौरव केला आहे आणि भगवान श्रीकृष्णांनी " सकल प्रवाहात गंगा ही माझी विभूती आहे " ( " स्त्रोतसामस्मि जान्हवी । " ) असे उद्घोषिले आहे. भारतावासीयांना गंगेविषयी एवढी भक्ती आहे की, त्यांनी तिची सगुण-साकार स्त्रीमूर्ती कल्पून पूजा करण्याची प्रथा पाडली आणि नित्याचा स्नानविधी कोठेही करावा लागला, तरी त्या स्नानजलात गंगेने अवतरावे, म्हणून तिला आवाहन करण्याचे विस्मरण होऊ दिले नाही. आजच्या बुध्दीवादी जगाचे एक अध्वर्यु आणि पारंपरिक निष्ठांना न मानणारे असे भारताचे भूतपूर्व महामंत्री पं. जवाहरलाल नेहरू यांनाही गंगेची महती मुक्तकंठाने गाताना भावनांचे भरते येत असे. आपले पार्थिव अवशेष त्या पुण्यसरितेच्या प्रवाहातच विसर्जित करण्याची अंतिम इच्छा त्यांनी व्यक्त केल्याचे सर्वांना माहीतच आहे.

गंगास्नान आणि गंगापान यांचे माहात्म्य हे असे असल्यामुळे काशी येथे गंगेला अनेक प्रशस्त आणि सुंदर घाट बांधून काढलेले आहेत. येथील गंगेचा अर्धचंद्राकृती प्रवाह घाटांनीच व्यापलेला आहे. त्यांतले प्रमुख घाट असे :



गंगाघाट काशी

दशाश्वमेध घाट : या स्थानी ब्रह्मदेवाने दहा अश्वमेघ केले. म्हणून या घाटाचे नाव दशाश्वमेघ घाट असे पडले. अशी कथा आहे. या घाटाचे धार्मिक महत्त्व फार आहे. काशीत श्राद्धविधी ज्या पाच तीर्थात करावयाचा असतो. त्या पंचतीर्थांपैकी हा एक घाट आहे. येथे गंगास्नान करणे विशेष महत्त्वाचे समजले जात असल्यामुळे स्नानासाठी यात्रिकांची येथे गर्दी असते. या घाटावर वरच्या बाजूला दशाश्वमेघेश्वराचे सुंदर मंदिर आहे. ओहरयात्रा ( नवविवाहित वधुवरांची गंगाभेट ), जावळ इत्यादी विधी येथे करतात. येथे कथा-कीर्तने प्रवचने

आणि भजने यांचा घोष मध्यरात्रीपर्यंत चालू असतो. तसेच, येथे यात्रिकांची प्रचंड गर्दी असल्यामुळे राजकीय पक्षांच्या प्रचारसभाही येथे होतात. येथे येण्याचा रस्ता रुंद आहे.

शीतला घाट : दशाश्वमेध घाटाच्या दक्षिणेस असलेला हा घाटही तितकाच गजबजलेला असतो. या घाटावर स्त्रियांच्या स्नानाची स्वतंत्र सोय आहे.

मणिकर्णिका घाट : सर्व घाटात पावित्र्याच्या दृष्टीने सर्वश्रेष्ठ असलेला हा घाट पुराणान्तरी गाजलेला आहे. या घाटाजवळ गंगाजळात अर्धवट बुडलेले तारकेश्वर मंदिर आहे आणि घाटावर मणिकर्णिका कुंड आहे. या कुंडास पूर्वी ' चक्रपुष्करिणी ' असे नाव होते. विष्णूने आपल्या हातातील चक्राने हे तयार केले होते. पुढे यात शिवाच्या कुंडलातला मणी पडल्यामुळे यास मणिकर्णिका असे नाव मिळाले, असे पुराणे सांगतात. या कुंडात स्नान करण्याचे विशेष महत्व आहे. या मणिकर्णिका कुंडाची प्रतीकतीर्थे भारतात सर्वत्र दाखविली जातात, एवढे याचे महत्व आहे.

पंचगंगा घाट : किरण, सरस्वती, यमुना व धूतपाप या चार नद्या येथे गंगेला येऊन मिळाल्या आहेत, अशी कल्पना असल्यामुळे या घाटाला पंचगंगा घाट असे म्हणतात. कार्तिक महिन्यात येथे असंख्य आकाशदिवे लावले जातात. पंचतीर्थांपैकी एक श्राद्ध येथे करतात. पंडितराज जगन्नाथाने " गंगालहरी " हे गंगास्तोत्र याच घाटावर लिहिले आणि गंगेने आपल्या लाटांचे बाहू पसरून त्या पंडित कवीला त्याच्या यवन प्रेयसीसह येथेच पवित्र केले. अशी आख्यायिका आहे. घाटावरून गंगेचा प्रवाह पाहात असताना मनात " गंगालहरी " उसळू लागल्यावाचून राहत नाहीत:

समृद्धं सौभाग्यं सकलवसुधायाः किमपि तन्-
महैश्वर्यं लीलाजनितजगतः खण्डपरशोः।
श्रुतीनां सर्वस्वं सुकृतमयमूर्तं सुमनसां
सुधासोदर्यं ते सलिलमारीवं नः शमयतु ॥

( हे ! गंगे ! तुझे हे जल म्हणजे सर्व पृथ्वीचे जणू महासौभाग्यच आहे. आपल्या लीलेने जगाची निर्मिती करणाऱ्या शंकराचे ते महान ऐश्वर्यच आहे. श्रुतींचे सर्वस्व, देवांच्या सुकृताचे मूर्त स्वरूप, अमृताचे सहोदर भावंड असे हे तुझे जल आमच्या अशुभाचे निवारण करो. )

अस्सी घाट : अस्सी-गंगा संगमावर असलेला हा घाट कच्चा असला तरी पंच तीर्थांपैकी एक आहे. विश्वविद्यालयाला हा घाट जवळचा असल्यामुळे येथे येण्यास रस्ता चांगला केलेला आहे.

या घाटांशिवाय दशाश्वमेध घाटाजवळचा राजा मानसिंगाने बांधलेला मानमंदिर घाट, त्यावरील सवाई जयसिंहाच्या वेधशाळेमुळे प्रसिद्ध आहे. तसेच हरिश्चंद्र घाट ( स्मशानघाट ), जलशायी घाट, शिवाला घाट, मुन्शी घाट, इत्यादी घाट प्रसिद्ध आहेत.

रामनगर घाट : काशीपासून सुमारे दीड मैल अंतरावर गंगेच्या पैलतीरावर काशीच्या राजाची रामनगर नामक राजधानी आहे. तेथे हा प्रशस्त, सुंदर आणि भव्य असा घाट आहे. तेथे नावेतून जाणे सोयीचे पडते. या घाटावर मागे काशी नरेशांचा प्रेक्षणीय राजवाडा आहे. जवळच रामबाग आहे. तसेच या घाटावर वेदव्यासांची मूर्ती आहे. येथून काशीच्या घाटांचे विहंगम दृश्य मनोहर दिसते. गंगेचा अर्धचंद्राकृती प्रवाह, त्याच्या काठावरील घाट, घाटांवर उभे असलेले उत्तुंग वाडे, त्यांतून डोकावणारी मंदिरांची शिखरे, सर्वच दृश्य आपल्या मनाला मोहून टाकणारे असते. अनेक हौशी यात्रिक हे नेत्रसुख अनुभवण्यासाठी नावेतून रामनगरास जातात.

काशीच्या घाटांचे सौंदर्य केवळ भारतातील भाविकांनाच आकर्षक वाटते असे नाही, तर भारताबाहेरील प्रवासीही या घाटांच्या दृश्याने वेडावून जातात. काशीत गंगेवर एकूण चौऱ्यायशी घाट आहेत. पायऱ्यांच्या प्रमाणबद्ध चढावाने शोभिवंत दिसणारे हे प्रशस्त घाट, त्यांच्या चरणांशी खेळणारे गंगाजळ आणि त्यांच्या पाठीशी उभी असणारी भवने व मंदिरे छाया चित्रात टिपून घेण्यासाठी अनेक अभाविकही गर्दी करतात.

राजेरजवाड्यांचे औदासीन्य वाढल्यामुळे नव्या राज्यात उद्ध्वस्त झालेले आणि मोडकळीस आलेले घाट दुरुस्त करण्यासाठी आपले सरकार लक्ष घालू लागले आहे, ही समाधानाची बाब आहे.

यात्रिक मंडळी गंगेच्या घाटांवरून गंगास्नान करून देवदर्शनासाठी निघतात. काशीत देवदेवतांची व त्यांच्या मंदिरांची इतकी गर्दी आहे की, रोज चार मंदिरात जाऊन यायचे म्हटले, तर सर्व देवांची दर्शने घेण्यासाठी काशीत एक वर्षभर राहावे लागेल. काशीतील लहानमोठ्या मंदिरांची संख्या दीड हजारांहून अधिकच आहे. अर्थात काशीतील मंदिरे ही गेल्या दोनशे वर्षांतीलच असल्यामुळे आणि त्यातील निम्मी तर एकोणिसाव्या शतकातील म्हणजे इंग्रजांचा अमल सुरू झाल्यानंतरची असल्यामुळे त्यांना प्राचीन मंदिरांची भव्यता व सुंदरता नाही. काशीतील प्राचीन मंदिरे भव्य व सुंदर होती. परंतु ती मुसलमानांच्या विध्वंसन-सत्रात नष्टभ्रष्ट झाली. त्यांच्या उर्वरित अवशेषांवरून त्यांच्या प्रेक्षणीयतेची काही कल्पना करता येते. काशीतील आजची बहुतेक सर्व मंदिरे संपूर्ण दगडी बांधणीची आहेत. त्यांची शिखरे गोल नसून वर उतरत्या होत गेलेल्या चौकोनाची आहेत. मुख्य शिखराच्या चारी बाजूंना एकापुढे एक लहान लहान पोटशिखरे असतात. शिवमंदिरांवरचे कळस त्रिशूळाकार व इतर चक्राकार असतात.

माहात्म्याच्या दृष्टीने काशीतील सर्व मंदिरात विश्वनाथमंदिर अधिक गाजते-जागते आहे. हे सांगावयास नकोच. सातव्या शतकातील चिनी प्रवाशाच्या वर्णनावरून असे दिसते की, त्या वेळेचे विश्वनाथ मंदिर फारच भव्य असून, त्यावर शंभर फूट उंचीचे शिखर होते. त्या मंदिराचे अवशेष राजघाटाजवळच्या उत्खननात मिळाले आहेत. ते मंदिर इ. स. ११९४ मध्ये उद्ध्वस्त झाले. त्यानंतर उभारले गेलेले मंदिर इ. स. १४९४ त पुनः उद्ध्वस्त झाले. पुढे इ. स. १५८० मध्ये अकबराच्या राज्यकालात पैठणच्या नारायणभट्ट नामक महापंडिताने राजा तोडरमलाच्या मदतीने विश्वनाथाला साजेशा भव्य मंदिराची उभारणी केली. आज त्याच्यावर औरंगजेबाच्या जुलमाची साक्ष सांगणारी मशीद उभी आहे, तेच ते जुने मंदिर होय. त्या मंदिराकडे तोंड करून बसलेला नंदीही अजून त्या मंदिराची भक्तांना आठवण करून देतो. औरंगजेबानेइ.स. १६६९ त आपले विध्वसंक कृत्य पार पाडल्यानंतर शंभर-सव्वाशे वर्षे हा विश्वाचा नाथ भक्तांच्या दुर्बलतेमुळे अगदी अनाथ स्थितीत गुप्तपणे कोठे तरी पुजाऱ्याच्या घरातील भुयारी भागातून दिवस कंठीत होता.



अहिल्याबाईने बांधलेले काशी विश्वेश्वराचे मंदिर, कळसावरील सोन्याचा पत्रा रणजितसिंगाने चढविलेला.


सध्याचे मंदिर इ. स. १७७७ मध्ये देवी अहल्याबाईने उभारले. हे मंदिर मशीद व त्याजवळचा ज्ञानवापी मंडप यांच्या पश्चिमेस लागूनच

आहे. मंदिराचा प्राकार अवघा पन्नास फुटी चौरसाएवढा आहे. या छोट्या मंदिरास डावी–उजवीकडे १०'×१०' या आकाराची दोन गर्भगृहे असून दोहींच्या मध्ये १६'×१६' एवढासा समाईक सभामंडप आहे. दोन्ही गर्भगृहांवर उंच चौकोनी शिखरे असून सभामंडपांवर घुमटकार शिखर आहे. या घुमटावर व उजव्या गर्भगृहावरच्या शिखरावर महाराजा रणजितसिंगाने सोन्याचा पत्रा चढविला आहे. दुरून मंदिर जाणवत नाही एवढे लहान आहे आणि त्यातून त्याच्या सर्व बाजूंनी वाड्यांच्या भिंती खेटलेल्या आहेत. नागमोडी बोळांतून चढत्या पायऱ्यांच्या रस्त्याने फर्लांगभर चालत गेल्यावर महाद्वार दिसते. महाद्वारातून आत शिरल्यावर उजव्या बाजूच्या गर्भगृहात जे शिवलिंग आहे, तेच पुराणप्रसिद्ध पवित्रतम विश्वनाथाचे ज्योतिर्लिंग होय. डाव्या गर्भगृहातही एक शिवलिंग आहे.

गाभाऱ्यात काहीशा ईशान्य बाजूला एक चौकोनी कुंड असून त्यात शिवाची पिंडी आहे. अभिषेकजलाने आणि बेलफुलांनी कुंड भरून गेलेले असल्यामुळे शिवपिंडीचा वरचा थोडाच भाग उघडा दिसतो. येथे स्पर्शपूर्वक शिवदर्शन घेण्यास सर्व हिंदूंना मोकळीक आहे. सकाळीच गंगाजलाने विश्वनाथाला अभिषेक करण्यासाठी आणि त्याच्या मस्तकी आपल्या श्रद्धेची बेलफुले वाहण्यासाठी भक्तभाविकांची झुंबड उडते. दुपारी बाराच्या सुमारास महापूजा होते. रात्री आठ वाजल्यावर होणारी आरती तर अत्यंत श्रवणीय व प्रेक्षणीय असते. दिवाळी, त्रिपुरी पौर्णिमा, शिवरात्र, शृंगारी एकादशी (फाल्गुन शु. ११), होळी इत्यादी पर्वांच्या वेळी विश्वनाथाला वस्त्रालंकारांनी विभूषित करतात. त्यावेळच्या दर्शनाचा आनंद आगळाच असतो.

विश्वनाथाचे दर्शन भक्तिपूर्वक घेत असताना यात्रिकांची हृदये आनंदाने ओसंडून जातात. "काशीस जावे नित्य वदावे," असा

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ... वि:
क्रमांक ... नों. दि.



पुष्पपूजा केलेले श्रीविश्वेश्वर

काशीयात्रेच्या संकल्पाचा महिमा आपल्याकडे चालत आलेला आहे. काशीत देह ठेवल्याने मुक्ती प्राप्त होते ( 'काश्यां मरणान् मुक्तिः' ) यावर अनेकांची श्रद्धा आहे. त्यामुळे काशीस जाऊन शिवाचे दर्शन घेतल्याचा आनंद श्रद्धावान भारतीयाला किती होत असेल, त्याचे वर्णन करता येणे अशक्य आहे. विश्वनाथदर्शन घडले की त्याला जीवन सफल झाल्याचे सुख लाभते. अशा सश्रद्ध मनाला दर्शनाच्या वेळी श्री विश्वनाथाचे ते आश्वासन जणू ऐकू येते :

वाराणसी तु भुवनत्रयसारभूता
रम्या सदा मम पुरी गिरिराजपुत्रि ।
अत्रागता विविध दुष्कृतकारिणोऽपि
पापक्षयादविरजसः प्रतिभान्ति मर्त्याः ॥

( हे पार्वती, वाराणसी ही त्रिभुवनांचे सार असलेली माझी रम्य नगरी आहे. नाना प्रकारची दुष्कृत्ये आचरणारे लोकही या क्षेत्रात येऊन पापक्षय झाल्यामुळे निर्मळ आणि तेजस्वी बनतात.




अन्नपूर्णा, काशी

विश्वनाथमंदिरावरून दशाश्वमेघ घाटाकडे जावयास लागल्यावर लगेच डाव्या बाजूला एक शनिमंदिर आहे आणि त्याच्यापुढे पस्तीस–चाळीस फुटावर अन्नपूर्णामंदिर आहे. विश्वनाथ-मंदिराहून प्रशस्त असलेल्या या मंदिरात चांदीच्या सिंहासनावर अन्नपूर्णेची पितळी मूर्ती आहे. प्राकारात सभोवार असलेल्या ओवऱ्यांतून कुबेर, सूर्य, गणेश इत्यादी देवदेवता आहेत. या मंदिरात नित्य शे-पन्नास ब्राह्मणांचे पूजापाठ चालू असतात. येथील दर्शनार्थींच्या गर्दीत स्त्रियांचा भरणा अधिक असतो. काशीतील सर्व व्यक्तींच्या मुखी अन्न पडल्याशिवाय अन्नपूर्णा नैवेद्याचा स्वीकार करीत नाही, असे म्हणतात. बलिप्रतिपदेच्या दिवशी या मंदिरात मोटा अन्नकोट होत असतो.

अन्नपूर्णामंदिराच्या पुढे सुमारे पंधरा फुटांवर एका कमानीखाली छोट्या देवळीत ढुंढिराज (गणपती) आहे. तेथून थोड्या अंतरावर विश्वनाथ गल्लीतच साक्षी विनायकाचे मंदिर आहे. कालभैरवाचे स्थान पूर्वी म्हणजे औरंगजेबाच्या विध्वंसनसत्रापूर्वी विश्वनाथमंदिरातच होते. सध्याचे कालभैरव मंदिर विश्वनाथमंदिरापासून सुमारे पाऊण मैलावर विसेसर-गंज विभागात आहे. या ठिकाणी वाहने आणि मजूर यांचे केंद्र आहे.

या काशीच्या कोतवालाची चतुर्भूज मूर्ती चांदीच्या पत्र्याने मढवलेली आहे. यात्रिक भैरवनाथाचे दर्शन घेऊन स्वहस्ते याचा सोटा पाठीवर मारून घेतात व त्याचा काळा गंडा अशुभनिवारणार्थ हातात बांधतात.

श्रीकालभैरवाच्या देवळाबाहेर नवग्रहांचे स्थान आहे आणि जवळच दंडपाणीमंदिर आहे. हा दंडपाणी म्हणजे दंड हाती घेऊन दुष्टांना दंडन करणारा शिवाचा एक भक्त होय. तो मूळचा कनककुंडला यक्षिणीचा हरिकेशन नामक पुत्र होय. चार फूट उंचीचा दगडी खांब त्याच्या स्मारकार्थ उभा आहे.




श्रीकालभैरव, काशी

भैरवमंदिरापासून अर्धा मैल अंतरावर बिंदुमाधव आहे. इ. स. १६४२ मध्ये मिर्झा राजा जयसिंगाने बांधलेले बिंदुमाधवमंदिर सौंदर्याच्या आणि भव्यतेच्या दृष्टीने काशीतील सर्वोत्कृष्ट मंदिर होते. औरंगजेबाने ते पुरे झाल्यानंतर अवघ्या सत्तावीस वर्षांनीच उद्ध्वस्त करून त्या जागी मशीद उभारली. हल्ली त्या मशिदीशेजारीच एका खाजगी घरात बिंदुमाधवाची छोटी मूर्ती सर्व सवर्ण हिंदूंच्या दर्शनार्थ उभी आहे.

काशीतील आणखी एक महत्वाचे मंदिर म्हणजे केदारनाथ मंदिर हे मंदिर गंगेच्या काठी हरिश्चंद्र घाटाजवळच्या केदार घाटावर आहे. विश्वनाथाच्या खालोखाल महत्वाचे असे हे शिवस्थान बंगाली वस्तीत असून तेथे दर्शनासाठी यात्रिकांची नित्य गर्दी असते.

दुर्गादेवीचे मंदिर काशीच्या दक्षिणेकडील सीमेवर आहे. या मंदिराजवळ उत्तम बांधणीचे प्रशस्त दुर्गाकुंड आहे. या मंदिराभोवती माकडांचा संचार फार आहे. दर्शनार्थींना त्यांचा उपद्रव पुष्कळच होत असतो. या पश्चिमाभिमुख मंदिराभोवती तट असून, तटाला आतून ओवऱ्या आहेत. प्रवेशभागी द्वारावर नगरखाना आहे. आतील मंदिर सुंदर कोरीव कामाने संपूर्णपणे सजलेले आहे. नवरात्रात दुर्गामंदिरात होमहवन होते आणि देवीला पशुबलीही दिला जातो.




दुर्गामंदिर, काशी

याशिवाय संकटमोचन व संकटहरण ही मारुतीची स्थाने, नेपाळी मंदिर म्हणून ओळखले जाणारे पशुपतेश्वर मंदिर, नावाप्रमाणेच असणारा बडा गणेश इत्यादी देवस्थाने प्रसिद्ध आहेत.

काशी हे जसे धर्मपीठ म्हणून गाजत आले आहे. तसेच ज्ञानपीठ म्हणूनही त्याची पूर्वापार ख्याती आहे. प्राचीन काळी बौद्ध विहारातून आणि हिंदु मठ-मंदिरातून अनेक विद्वान आचार्य गुरुकुल पद्धतीने ज्ञानदान करीत असत. भारतीय ज्ञानपरंपरेत काशीचा वाटा फार मोठा आहे. काशी येथे ग्रंथ रचनाही विपुल प्रमाणात झालेली आहे. आपल्या पारंपरिक विद्यांत एखाद्याला प्रवीण होऊन यायचे असेल, तर काशीस जाऊन गुरुगृही अध्ययन करावे लागे. काशीत सर्वांच्या ज्ञानाचा कस लागत असे आणि आपल्या दृष्टीने विशेष अभिमानाची गोष्ट अशी की, काशीतील विद्वत्तेच्या क्षेत्रात गेली पाचशे वर्षे तरी महाराष्ट्रीय


पंडित अग्रमान्य गणले गेले आहेत. पैठणचे भट्ट घराणे काशीतील विद्वानात अग्रमान भोगणारे होते. अजूनही तो मान त्या घराण्याला दिला जातो. विश्वनाथाच्या मंदिराची उभारणी करणारा नारायणभट्ट, 'निर्णयसिंधू'चा कर्ता कमलाकरभट्ट आणि शिवप्रभूंना राज्याभिषेक करणारा गागाभट्ट हे सर्व गाजलेले विद्वान याच घराण्यातले. नांदेडचे



बनारस हिंदु विश्वविद्यालय

शेष घराणे असेच नावाजलेले होते. तसेच, रंगोजी दीक्षित, कोंडभट्ट दीक्षित, नागोजीभट्ट काळे, वैद्यनाथ पायगुंडे, महादेवशास्त्री पुणतांबेकर, भाऊशास्त्री वझे, लक्ष्मणशास्त्री द्रविड, राजेश्वरशास्त्री द्रविड, फडकेशास्त्री, खिस्तेशास्त्री इत्यादी दिवंगत आणि विद्यमान पंडितांची नामावळी महाराष्ट्रीयांना अभिमान वाटावयास लावणारी आहे.

काशीतील ज्ञानोपासनेत जसा महाराष्ट्रीयांचा वाटा आहे, तसाच काशीच्या नव्या उभारणीतही महाराष्ट्राने पुढाकार घेतलेला आहे. पेशवाईच्या काळापासून महाराष्ट्रीय संस्थानिकांनी आणि सरदार-दरकदारांनी काशीत अनेक मंदिरे उभारली, मठांना आश्रय दिले, अन्नछत्रे चालविली, वाडे व घाट बांधले आणि इतर अनेकानेक मार्गांनी काशीचे पुनरुत्थान घडविले. इंग्रजी राज्य आल्यानंतरही काशीवरील मराठी प्रभाव चालूच होता. संस्थाने विलीन झाल्यानंतर मात्र तेथील महाराष्ट्रीयांचा आश्रय तुटला आणि ह्या मराठी प्रभावाला उतरती कळा लागली आहे. पंडित मदनमोहन मालवीय यांच्या हिंदु विश्वविद्यालयात महाराष्ट्रीय संस्थानिकांच्या द्रव्यातून उभारलेल्या अनेक इमारती आणि विद्याविभाग मराठी नावांनी आजही उभे आहेत. या विश्वविद्यालयाच्या आवारातच महाराष्ट्रमंडळातर्फे श्रीशिवछत्रपतींचा पुतळा बसविलेला असून, त्यावर तेथील एका आयुर्वेदाभ्यासक महाराष्ट्रीयाने छत्रही उभारले आहे.




शिवाजी महाराजांचा पुतळा,
हिंदु विश्वविद्यालय

विद्येप्रमाणेच काशी हे सिद्धांचे आणि संतांचेही लीलाकेंद्र म्हणून प्रसिद्ध आहे. आद्य शंकराचार्यांनी आपल्या धर्मकार्याची पताका येथेच फडकविली. पुष्टिमार्गाचे प्रवर्तक वल्लभाचार्य येथे हनुमानघाटावर येऊन राहिले होते. महाप्रभु चैतन्यांची स्मृती सांगणारा एक मठ आणि वटवृक्ष काशीत आहे. उत्तरेतील भक्तिसंप्रदायाचे महान नेते श्रीरामानंद

अनुक्रम ३५८२२ वि. ग्रं:प्रवास
क्रमांक ३५८ नों दि. १५।१२।६५


हे काशीतच पंचगंगा घाटावर राहत होते. त्यांचा थोर शिष्य कबीर याने आपला अमर संदेश येथेच घुमविला. संत तुलसीदासांची कर्मभूमी हीच होय. त्यांच्या ‘ रामचरितमानस ’ या लोकप्रिय ग्रंथाचा अखेरचा भाग येथेच रचला गेला. संकटमोचन हनुमान त्यांनी स्थापन केला.

काशीशी संबंध आलेल्या मराठी संतांची नामावळीही असंख्य आहे. ज्ञानदेवांचे वडील विठ्ठलपंत हे संन्यास घेऊन येथेच राहिले होते. पुढे ज्ञानदेव–नामदेव तीर्थयात्रेच्या निमित्ताने काशीस येऊन गेले होते. नाथांचा तर काशीशी विशेषच संबंध आला होता. प्राकृतात ग्रंथ लिहिण्याचा अपराध केल्यामुळे त्यांना काशीच्या पंडितांचे बोलावणे आले आणि नाथ काशीस गेल्यावर त्यांच्या ग्रंथाच्या अंतरंगसामर्थ्यामुळे मुग्ध झालेल्या काशीकरांनी त्यांच्या ग्रंथाची पालखीतून मिरवणूक काढली. त्या वेळी ते तीन वर्षे काशीत राहिले होते. एकनाथी भागवत व रुक्मिणीस्वयंवर या ग्रंथांची रचना काशीतच झालेली. चिदानंद हा त्यांचा शिष्य काशीचाच. त्यांचे नातजावई पूर्णानंद नारायण हेही काशीस राहिले होते. शिवकालात पंढरपूरच्या गोपाळस्वामींनी ज्ञानेश्वरीचे शुद्धीकरण काशीतच केले.


हिंदु विश्वविद्यालयाचे महाद्वार, काशी

काशीक्षेत्रात मठ-मंदिरे व घाट यांशिवाय पाहण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत, परंतु त्यांत बनारस हिंदु विश्वविद्यालय हे पाहिलेच पाहिजे, असे आहे. याची स्थापना पंडित मदनमोहन मावलीय यांनी इ. स. १९१६ मध्ये केली. सध्या या ‘ मालवीयनगर ’ नामक विद्यानगरात चौदा महाविद्यालये असून त्यात पाचशेच्या वर प्राध्यापक

अध्यापन करीत आहेत. आशियातील अनेक देशांतून येणारे हजारो विद्यार्थी या वसतिगृहयुक्त विद्यानगरात राहून शिक्षण घेत असतात. सुमारें दोन हजार बिघे जमिनीत हे विद्यानगर वसलेले आहे. या नगराभोवती पक्की सीमाभिंत बांधलेली असून या अर्धवर्तुळाकार नगराला चार प्रवेशद्वारे आहेत. महाद्वार उंच आणि भव्य आहे. आत नाना विद्यांची महाविद्यालये, वसतिगृहे, अतिथिगृहे, ग्रंथालय, क्रीडांगणे, रुग्णालय, सभागृह, व्यायामशाळा, कार्यालये इत्यादी सुंदर व प्रशस्त इमारती आहेत. सर्व भारतभर हिंडून गोळा केलेल्या द्रव्यावर मालवीयजींनी उभारलेले हे विश्वविद्यालय पाहिले की, त्या राष्ट्रभक्त व विद्याप्रेमी थोर पुरुषाविषयी अपार कृतज्ञता वाटू लागते.



बनारस हिंदू विश्वविद्यालयातील विश्वनाथमंदिर


या विश्वविद्यालयाच्या आवारात असलेले विश्वनाथमंदिर सौंदर्य, स्वच्छता व भव्यता यांचा संगम आहे. हे मंदिर मालवीयजींच्या हयातीत

दा. क्र. मुंबई शाखा

बांधावयास प्रारंभ झाला होता. परंतु ते त्यांच्या मृत्यूनंतर बिर्लाजींनी पुरे केले. १९५८ मध्ये त्यात विश्वनाथाची प्राणप्रतिष्ठा झाली. हे मंदिर दुमजली आहे. तळमजल्यावर शिवलिंग आहे व वरच्या मजल्यावर शिवमूर्ती आहे. विश्वनाथाच्या उजवीकडे लक्ष्मीनारायण व डावीकडे दुर्गा आहे. वरच्या मजल्यावर मागच्या बाजूस भिंतीतील संगमरवरी शिळांवर संपूर्ण गीता कोरलेली आहे. मंदिराच्या पुढच्या आवारात फुलझाडे आहेत व पाणी खेळते आहे.

काशी हे जसे हिंदूंचे पवित्र क्षेत्र आहे, तसेच जैन-बौद्धांचेही आहे. जैनांचा सातवा तीर्थंकर सुपार्श्वनाथ, अकरावा तीर्थंकर श्रेयांसनाथ आणि तेविसावा तीर्थंकर पार्श्वनाथ यांचे जन्मस्थान काशी हेच होय. त्यांची मंदिरे अनुक्रमे भेलूपुरा, सारनाथ ( संग्रहालयासमोर ) आणि भदैनी या भागात आहेत. सारनाथ हे बौद्धधर्मीयांचे एक अत्यंत पवित्र स्थान काशीपासून पाच मैल अंतरावर आहे. येथे सारंगनाथ ( हरिणांचा प्रमुख ) नामक एक बोधिसत्त्व ( बुद्धाचा एक पूर्वावतार ) जन्मला, म्हणून हे स्थान सारंगनाथ–सारनाथ या नावाने प्रसिद्ध झाले, असे म्हणतात. येथे ‘ मृगदाव ’ ( मृगारण्य ) नावाचे वन होते, त्यात हरिणे पुष्कळ होती. बुद्धगयेस ज्ञानप्राप्ती झाल्यानंतर बुद्धाने आपले ज्ञान जगाला देण्याचा शुभारंभ याच ठिकाणी केला. त्यामुळे बौद्ध धर्माची ही उदयभूमीच बनलेली आहे. हर्षाच्या काळापर्यंत हे स्थान गजबजलेले होते. येथे अनेक स्तूप, विहार आणि चैत्यगृहे उभारली गेली होती. बौद्धधर्माचा ऱ्हास झाल्यावर या स्थानास अवकळा आली. या स्थानाचा जीर्णोद्धार चालू शतकात घडून आला आहे. महाबोधी सोसायटीने येथील वास्तू सुरक्षित ठेवण्यासाठी आणि नव्या वास्तूंची उभारणी करून बौद्ध धर्माचे नवे केंद्र स्थापन करण्यासाठी पुष्कळ प्रयत्न केले आहेत पुराणवस्तु संशोधन खात्याचाही या प्रयत्नांत वाटा आहे.

सारनाथ येथे १४३ फूट उंचीचा व ९३ फूट व्यासाचा धम्मेकस्तूप व चौखंडी स्तूप हे दोन स्तूप प्राचीन आहेत. येथे नव्याने बांधलेल्या संग्रहालयात उत्खननात मिळालेल्या मूर्ती व वस्तू व्यवस्थित ठेवलेल्या आहेत. १९३१ मध्ये महाबोधी सोसायटीने बांधलेल्या सुंदर बुद्धमंदिरात जपानी चित्रकारांनी काढलेली बुद्धजीवनातील अनेक प्रसंगांची नयनमनोहर चित्रे आहेत. येथे चिनी बौद्धधर्मीयांनीही एक बुद्धमंदिर बांधले आहे.



सारनाथ येथील स्तूप

असे हे अनेक धर्मपंथांचा इतिहास घडविणारे, अनेक साधकांना साधनेची प्रेरणा देणारे, अनेक विद्वानांना व कर्त्यांना आश्रय देणारे व सामान्य भारतीयांना जीवनसाफल्याचा आनंद प्रदान करणारे महाक्षेत्र काशी आहे. तेथील विश्वनाथाचा महिमा मनोमन आठवितांना आपले हात आपोआप जोडले जातात आणि मनातून प्रार्थना उमळू लागते :

सानन्दमानन्दवने वसन्तं आनन्दकन्दं हतपापवृन्दम् ।
वाराणसीनाथमनाथनाथं श्रीविश्वनाथं शरणं प्रपद्ये ॥

( आनंदवनात आनंदाने राहणाऱ्या, आनंदाचा कंद असलेल्या, पापसमूहाचा नाश करणाऱ्या, अनाथांचा नाथ असलेल्या वाराणसीनाथ विश्वनाथाला मी शरण जातो. )

☆ ☆ ☆

त्या




## १० : श्रीत्र्यंबकेश्वर

भगवान शंकराची बारा ज्योतिर्लिंगे प्रसिद्ध आहेत. त्यांपैकी त्र्यंबकेश्वर हे दहावे ज्योतिर्लिंग आहे. गोदावरीचे ते उगमस्थान असल्यामुळे त्याला विशेष महत्त्व आले आहे. गोदावरी म्हणजे गंगेचा अवतार. पुराणांत याबद्दल मनोरंजक गोष्टी आहेत. पुराणे सांगतात, त्र्यंबकेश्वराच्या बाजूला गौतमऋषींचा आश्रम होता. गौतम महान तपस्वी व कष्टाळू होते. पाण्याच्या अभावामुळे आसपासच्या प्रदेशात दुष्काळ पडे; पण आश्रमाच्या भोवतालच्या भागात भरपूर पाऊस पडे. ऋषी साळी पिकवून लोकांना देत. त्यामुळे दुष्काळी प्रदेशांतील लोक आश्रमात व सभोवतालच्या प्रदेशात येऊन राहात. त्यामुळे तो भाग लोकवस्तीने गजबजलेला असे. एकदा एक गाय ऋषींच्या शेतातल्या साळी खाऊ लागली. त्यांना गाईचा राग आला. एक दर्भ उचलून त्यांनी

गाईच्या अंगावर फेकला. 'हैक, हैक' म्हणून तिला ते हाकलू लागले. दर्भ लागताच गाय शेताच्या बांधावर मरून पडली. ऋषिवर्यांच्या हातून गोहत्येचे पाप घडले. ते निघून जावे, म्हणून त्यांनी घोर तप करून शंकराला प्रसन्न करून घेतले आणि त्यांच्याजवळ गंगेची याचना केली. शंकरांनी गंगेला जटेतून उतरण्याची आज्ञा केली. गंगा का-कू करू लागताच त्यांनी रागाने जटा आपटल्या आणि त्र्यंबकेश्वरी ब्रह्मगिरीवर गंगेचा उगम झाला.

क्षेत्रमाहात्म्यात गोदावरीच्या उत्पत्तीसंबंधी म्हटले आहे :

कृते लक्षद्वयेऽतीते मांधातरि शके सति
कूर्मे चैवावतारे च सिंहस्थे च बृहस्पतौ ॥
माघमासे सिते पक्षे दशम्यां च दिवा गुरौ
रोहिण्यां गौतमप्रीत्याऽवतीर्णा ब्रह्मभूधरे ॥

[ कृतयुगाची दोन लक्ष वर्षे होऊन गेली होती. विष्णूचा कच्छावतार झाला होता. मांधाता शक होता. गुरू सिंह राशीत होता. माघ शुद्ध दशमी तिथीच्या गुरुवारी माध्यान्ही सूर्य आला होता. अशा वेळी ब्रह्मगिरीवर गंगा प्रगट झाली. ]

गौतमांचे पाप तर गेलेच. पण या गौतमी गंगेमुळे आजूबाजूच्या प्रदेशातील दुष्काळ गेला. सुबत्ता वाढली. लोक सुखी झाले. नदीच्या काठाने प्रगतीची वाटचाल खूप झाली. सुसंस्कृतपणा वाढला. हे सर्व देणाऱ्या नदीबद्दल लोकांच्या मनात प्रेमाने स्थान पटकावले. तिचे उगमस्थान यात्रास्थान म्हणून ओळखले जाऊ लागले. हीच गौमती गंगा, गोदावरी नावाने ओळखली जाऊ लागली. गो म्हणजे गाय; तिच्या जीविताचे दान करणारी ती गो-दा. आणि गोदा म्हणजेच गोदावरी. ती गौतमासाठी अवतरली म्हणून गौतमी गंगा.

गोदावरीचा उगम त्र्यंबकेश्वराच्या जवळच्या ब्रह्मगिरी नावाच्या पर्वतावर एका औदुंबर वृक्षाच्या मुळापाशी झालेला आहे. तेथून एका कड्यावरून ती खाली येते. त्या कड्याला 'गंगाद्वार' म्हणतात. गंगाद्वारी गोदावरीचे मंदिर आहे. गोमुखामधून गोदावरीचे पाणी खाली येत असते. गंगाद्वाराकडे जाण्यासाठी चांगल्या पायऱ्यांचा रस्ता आहे. गंगाद्वाराजवळ वराहतीर्थ नावाचे एक कुंड आहे.



ब्रह्मगिरी, त्र्यंबकेश्वर

गंगाद्वाराच्या जवळच ब्रह्मगिरीच्या पोटात एक गुहा आहे. त्या गुहेला 'गोरखगुंफा' म्हणतात. या गुहेत नाथ संप्रदायाचे प्रमुख गोरक्षनाथ आणि गहिनीनाथ काही दिवस राहिले होते. येथेच त्यांनी आपली साधना केली व त्या साधनेमधून मिळालेल्या सामर्थ्याच्या जोरावर त्यांनी नाथपंथाचा प्रसार सर्वत्र केला. आज हिंदुस्थानातील सर्व भाषांत, सर्व प्रदेशांत गोरखनाथ व नाथपंथीयांबद्दल खूप वाङ्मय आणि कथा उपलब्ध आहेत. गोरखनाथांचे शिष्य गहिनीनाथ. तेही येथेच


राहात असत. या गहिनीनाथांनीच ज्ञानेश्वरांचे वडील बंधू निवृत्तिनाथ यांना नाथपंथाची दीक्षा दिली. गुरूबरोबर निवृत्तिनाथही गोरखगुंफेत काही दिवस राहिले होते.

गंगाद्वाराच्या पाठीशी उभा असणारा ब्रह्मगिरी हेच शंकराचे स्वयंभू स्थान असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. ब्रह्मगिरीवर डोंगरी किल्ला होता. यादवांच्याकडून तो मुसलमानांच्याकडे आला. तो बरेच दिवस त्यांच्याकडेच होता. इ. स. १६७० मध्ये शिवाजी महाराजांचे पंतप्रधान मोरोपंत पिंगळे यांनी तो घेतला. महाराजांच्या पश्चात तो पुनः निजामाकडे गेला. इ. स. १७५२ मध्ये पेशव्यांनी तो काबीज केला. पेशवाईत किल्ल्यावर चांगली शिबंदी असे. पेशवाईच्या उतरत्या काळात इंग्रजांनी फितुरीने ब्रह्मगिरी घेतला. दिवसेंदिवस किल्ल्याचे महत्त्वही कमी झाले. आता तर किल्ल्याची संपूर्ण पडझड झाली आहे! काही पडके तट, दरवाजे, पायऱ्या ही या पुरातन किल्ल्याची ओळख करून देतात इतकेच!

ब्रह्मगिरीला प्रदक्षिणा घालण्यात मोठे पुण्य आहे, असे पुराणात लिहिले आहे. नऊ, वीस किंवा एकतीस प्रदक्षिणा घालाव्या, असे त्यात सांगितले आहे. भाविक यात्रेकरू आपल्या शक्तीप्रमाणे या प्रदक्षिणा करतात. प्रदक्षिणेच्या रस्त्यावर रामतीर्थ, प्रयागतीर्थ, नृसिंहतीर्थ अशी अनेक तीर्थे आहेत. पेशवाईतील सुप्रसिद्ध न्यायाधीश रामशास्त्री प्रभुणे हे ब्राह्मण गुन्हेगारांना शिक्षा म्हणून ब्रह्मगिरीच्या प्रदक्षिणेला पाठवीत. प्रदक्षिणेच्या वाटेवर सावलीसाठी पेशव्यांनी श्रद्धापूर्वक झाडे लावून यात्रेकरूंना सावली मिळण्याची सोय केली, असे उल्लेख जुन्या कागदपत्रांत आहेत. ही एक गमतीची नोंद पाहा ना :

...." त्रिंबकी मुकुंद तीर्थापासून नरसिंह तीर्थापर्यंत प्रदक्षिणेच्या वाटेवर झाडे लावावी. हे काम नारो भगवंत, देवळाच्या

कामावर आहेत याकरवी करवावे. दर पंचवीस हातांवर झाडे दुतर्फा लावावी..."



श्रीत्र्यंबकेश्वरमंदिर

" त्रिभुवनपावन गौतमिचे जळ झुळझुळ वाहे शिरी..."

म्हणून

" माझे दैवत ब्रह्मगिरी ! "

असे मध्वमुनींनी आपल्या एका पदात म्हटले आहे.

ब्रह्मगिरीच्या पायथ्याशी समुद्रसपाटीपासून सुमारे तेवीसशे फूट उंचीवर त्र्यंबक गाव वसले आहे. या निसर्गरम्य क्षेत्रात उन्हाळ्यात सुद्धा थंड वाऱ्याच्या येणाऱ्या झुळकी मनाला फार आनंद देतात. गरिबांचे जणू हे महाबळेश्वरच आहे. अशा या त्र्यंबक गावात प्रमुख ठिकाण म्हणजे त्र्यंबकेश्वराचे मंदिर. गाव आणि सध्याचे मंदिर यांची

उभारणी पेशवाईत झालेली आहे. पेशव्यांनी त्र्यंबकेश्वराला अनेक नवस केले आणि ते श्रद्धापूर्वक फेडलेही. नानासाहेब पेशवे यांनी त्र्यंबकेश्वराचे देवालय बांधून घेतले.

देवालयाच्या भोवताली घडीव दगडांची तटबंदी आहे. तटबंदीच्या आत प्रशस्त अंगण आहे. अंगणात सर्वत्र दगडी फरशी आहे. मुख्य देवालय श्रीयंत्राकार असून खूप प्रशस्त आहे. गोपुरासह मंदिराला पाच दालने आहेत. मंदिराचे महाद्वार पूर्वेला आहे. देवालय घडीव दगडांचे बांधलेले आहे. कामातील कसब वाखाणण्यासारखे आहे. कमळे, फुले, खांब यांची रचना अत्यंत सुरेख आहे.

देवालयाच्या गाभाऱ्यात शिवलिंग आहे. त्यावर नेहमी सर्वत्र दिसणारी शाळुंका मात्र नाही. शाळुंकेच्या जागी दगडी उखळासारखा खड्डा आहे. या खड्ड्यात अंगुष्ठप्रमाण तीन लिंगे आहेत. ती ब्रह्मा, विष्णु आणि शंकर यांची आहेत. त्यांतील शंकराच्या लिंगावर एक कपार आहे. त्या कपारीतून सदैव पाणी पाझरत असते आणि ते सारखे शिवलिंगावर पडत असते. रात्रीतून हा खड्डा त्या गंगोदकाने अर्धा भरतो. त्यातून सारखे पाणी स्रवत असते. यातून कधीमधी सिंह-गर्जनेसारखा भयदायक आवाज निघतो, तर कधी कधी त्यातून अग्नीच्या ज्वाळाही दिसतात. असा चमत्कार झाला म्हणजे त्र्यंबकेश्वर रागावले, असे समजून शिवलिंगाला पंचामृताचा अभिषेक करतात. खंडोगणती दूध, भांग त्यात ओततात आणि ते सगळे त्या खड्ड्यात गडप होते. ब्राह्मण लोक संततधार धरून रुद्राभिषेक सुरू करतात. मोठी झालेली कपार पूर्ववत झाली आणि पदार्थ गडप होणे बंद झाले म्हणजे देव शांत झाले, असे समजतात.

दररोज देवाची षोडशोपचार पूजा करतात. पूजेनंतर त्र्यंबकराजाची आरती होते. ऐका ही आरती :

जय जय त्र्यंबकराज गिरिजानाथा गंगाधरा हो।
त्रिशूलपाणी शंभो नीलग्रीवा शशिशेखरा हो।
वृषभारूढ फणिभूषण दशभुज पंचानन शंकरा हो।
विभूति माळा जटा सुंदर गजचर्मांबरधरा हो ॥ १ ॥

पडले गोहत्येचे पातक गौतमऋषीच्या शिरी हो।
त्याने तप मांडिले ध्याना आणुनी तुज अंतरी हो।
प्रसन्न होउनि त्याते स्नाना दिधली गोदावरी हो।
औदुंबरमुळी प्रकटे, पावन त्रैलोक्याते करी हो ॥ २ ॥

धन्य कुशावर्ताचा महिमा वाचे वर्णू किती हो।
आणिकहि बहु तीर्थे गंगाद्वारादिक पर्वती हो।
वंदन मार्जन करता त्यांचे महादोष नासती हो।
तुझिया दर्शनमात्रे प्राणी मुक्तीते पावती हो ॥ ३ ॥

ब्रह्मगिरीची भावे ज्याला प्रदक्षिणा घडे हो।
जै जै काया कष्टे जंव जंव चरणी रुतती खडे हो।
तंव तंव पुण्य विशेष किल्मिष अवघे त्याचे झडे हो।
केवळ तो शिवरूपी, काळ त्याच्या पायां पडे हो ॥ ४ ॥


लावुनिया निज भजनी सकळहि पुरविसी मनकामना हो।
संतति संपति देशी अंती चुकविशी यमयातना हो।
'शिव शिव' नाम जपता वाटे आनंद माझ्या मना हो।
गोसावीनंदन विसरे संसारयातना हो ॥ ५ ॥

दर सोमवारी सायंकाळी देवांची पालखी निघते. ती कुशावर्तावर जाऊन परत येते. देवळाच्या उत्तर दरवाजावर तिन्ही त्रिकाळ सनई-नगाऱ्याची हजेरी होते. या सर्व खर्चासाठी पेशवाईपासून मिळालेली इनाम उत्पन्ने आहेत.

त्र्यंबकेश्वराच्या जामदारखान्यात एक रत्नखचित सोन्याचा मुकुट आहे. नारोशंकर राजेबहाद्दरांनी दक्षिणेच्या स्वारीत तीन वस्तू लुटून आणल्या. एक मोठी अजस्त्र घंटा, बोराएवढाल्या तीन मोत्यांची एक भिकबाळी आणि म्हैसूरच्या राजाकडून एक मुकुट. पेशव्यांच्या परवानगीने राजेबहाद्दरांनी नाशिकला गोदेच्या तीरावर पंचवटीत एक शंकराचे मंदिर बांधले, त्याला 'नारोशंकराचे मंदिर' म्हणतात आणि त्या मंदिराच्या गोपुरावरती प्रचंड घंटा लावली. गोदावरीला फार मोठा पूर आला म्हणजे नारोशंकराच्या घंटेला पाणी लागले, अशी मर्यादा दर्शविण्याचा प्रघात अजून आहे. मोत्यांची भिकबाळी पंढरपुरास श्रीविठ्ठलाला दिली आणि तो मुकुट श्रीत्र्यंबकेश्वराला दिला. दर सोमवारी त्याचे दर्शन जिज्ञासूंना घेता येते. अशा मौल्यवान वस्तू आता क्वचितच पाहावयास मिळतात. देवाला सरदार विंचूरकर यांनी रथ करून दिलेला आहे.

गावापासून जवळच नीलपर्वत आहे तेथे नीलांबिका देवीचे स्थान आहे. त्र्यंबक क्षेत्रापासून पूर्वेकडे दोन कोसांवर अंजनी नावाचा पर्वत आहे. या पर्वतावर अंजनी मातेने तप केले. या पर्वताच्या गुहेत गहिनीनाथ राहात असत. आळंदीहून विठ्ठलपंत, रखमाबाई, निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ताबाई यांना घेऊन त्र्यंबकेश्वरी अनुष्ठान करण्यासाठी आले, त्या वेळी निवृत्ती आठ वर्षांचा, ज्ञानदेव सहा व सोपान चार वर्षांचा होता. एका ब्राह्मणाच्या घरी त्यांनी बिऱ्हाड मांडले. रोज पहाटेस उठून गोदावरीत स्नान करावे व श्रीत्र्यंबकेश्वराचे दर्शन घेऊन ब्रह्मगिरीची प्रदक्षिणा करण्यास तिघां मुलांसह जावे. नवखेपणामुळे चुकतमाकत मध्यान्हापर्यंत घरी यावे व मधुकरी मागून उदरनिर्वाह करावा. दुपारी अध्यात्मपर वाचन करावे. असे एक वर्षभर केले. एके दिवशी पहाट झाली, असे वाटून ते मध्यरात्रीच स्नानादी करून मुलांना घेऊन प्रदक्षिणेच्या

वाटेला लागले. प्रयागतीर्थाच्या पुढे उजव्या बाजूला वळल्यावर दाट अंधारात व्याघ्रगर्जना अगदी जवळ ऐकू आली. निवृत्ती वाट चुकून पूर्वेकडे गेला आणि अंजनीपर्वताच्या गुहेत गहिनीनाथांनी त्याला नाथ संप्रदायाची दीक्षा दिली. ज्ञानोपदेश केला. तसेच गुरुदेवदत्तांना याच ठिकाणी सिद्धी प्राप्त झाली, असेही सांगतात.



कुशावर्त तीर्थ, त्र्यंबकेश्वर

गंगाद्वारी उगम पावलेली गोदावरी पुनः गुप्त झाली. ती पायथ्याशी गावाच्या नैर्ऋत्य कोपऱ्यात प्रवाहरूपाने प्रगट झाली. गौतम मागे येत होताच. पुनः प्रवाह गुप्त होऊ नये म्हणून त्याने बंधनात्मक मंत्र म्हणून त्या ठिकाणी चारी दिशांना चार दर्भ टाकले. म्हणून तेथे पाणी राहिले आणि ते कुशावर्त महातीर्थ झाले.

कुशेनावर्तिना गंगा गौतमेन महात्मना ।
कुशावर्तमिति ख्यातं त्रिषु लोकेषु विश्रुतम् ॥
सर्वत्र सुलभा गोदा त्रिषु स्थानेषु दुर्लभा ।
त्र्यंबके चाब्जके चैव गोदासागरसंगमे ॥
निवसन्ति सुराः सर्वे तीर्थानि सकलानि च ।
त्रिषु स्थानेषु भो राम सिंहस्थे च बृहस्पतौ ॥
तव भाग्येन निकटे वर्तते ब्रह्मभूधरः ।
तत्र गत्वा कुरु श्राद्धं पितॄनुद्दिश्य यत्नतः ॥

कुशावर्त तीर्थ चांगले ऐंशी फूट लांब व सत्तर ते पंचाहत्तर फूट रुंद असे चौकोनी कुंड आहे. चारी बाजूंनी कुंडात उतरण्यास पायऱ्या आहेत. तीन बाजूंनी दगडी ओवऱ्या बांधलेल्या आहेत. सिंहस्थात येथे मोठी यात्रा जमते. हिमालयापासून रामेश्वरापर्यंत दूरवरून यात्रेकरू, संत–महंत येतात. गोसाव्यांचे तांडे हत्ती-उंटांवरून येतात. या गोसाव्यांचे निरनिराळे आखाडे असतात. या आखाड्यांतून धर्मचर्चा चालते. आखाड्यांतील गोसावी आपल्या हक्काबद्दल फार जागृत असतात. प्रसंगी मारामारी करण्यासही त्यांना कमीपणा वाटत नाही. पेशवाईत आलेल्या एका सिंहस्थात गिरी आणि पुरी या गोसाव्यांच्या दोन आखाड्यांत जोराचे भांडण सुरू झाले. भांडणाचा विषय फारच किरकोळ होता. तो असा की, कुशावर्त तीर्थात प्रथम स्नान कोणी करावयाचे ? हंबरीतुंबरीवर आलेल्या आखाड्यांच्या पुढाऱ्यांना भाऊसाहेब पेशवे यांनी आपल्याजवळ बोलाविले आणि दोघांचे हात धरून ते एकदम कुशावर्तात उतरले. झाले. दोघांचे भांडण मिटले. आता गिरी आणि पुरी दोन्ही आखाड्यांतील गोसावी एकदम स्नाने करतात.

तेथूनही पुढे प्रवाह सुरू झाला नाही. कोरडी नदी त्र्यंबकेश्वराच्या मंदिराला डावी घेऊन पुढे गेली. गावाच्या पूर्व दिशेला तिला पर्वतावरून निघालेली दुसरी अहल्या नावाची नदी येऊन मिळते. या अहिल्यागौतमी संगमावर नारायणबली नागबली नावाचा एक विधी करावा, असे सांगितले आहे. कित्येकांच्या अंगात भूतादिकांचा संचार होतो आणि या विधीने त्या संचारापासून शेकडो लोक मुक्त होऊन सुखी होतात, असे सांगतात.

कुशावर्ताच्या पाठीमागे ब्रह्मगिरीच्या पायथ्याशी गंगासागर तलावाजवळ ज्ञानेश्वरांचे वडील बंधू आणि गुरू निवृत्तीनाथ यांची समाधी आहे. ज्ञानेश्वरांनी आळंदीला जिवंत समाधी घेतल्यानंतर

निवृत्तीनाथ उदास झाले.

“ ज्येष्ठाचिये आधी
कनिष्ठाने जाणे
वळचणीचे पाणी
आढ्या गेले ! ”


अशा समजुतीने हवालदिल होऊन त्यांनी आपल्या गुरूच्या तपोभूमीत जिवंत समाधी घेतली. समाधीच्या ठिकाणी विठ्ठलाचे मंदिर आहे. ही सर्व ठिकाणे इतस्ततः पसरलेली आहेत. तेथील पुजारी मंडळी त्यांचे दर्शन घडवितात. या पुजाऱ्यांच्याकडे जुन्या वह्यांची बाडे आहेत. त्यांत आपल्या पूर्वजांच्या नामावळ्या आणि हस्तलेख मिळतात ह्या वह्या म्हणजे इतिहासाचे एक अस्सल साधन आहे.



कुशावर्ततीर्थांवरील खोदकाम, त्र्यंबकेश्वर

त्र्यंबकेश्वराच्या महिमा संत नामदेव आपल्या एका अभंगात गातात :

वाचे म्हणता गंगा गंगा । सकल दोष जाती भंगा ।।
दृष्टी पडता ब्रह्मगिरी । त्यासी नाही यमपुरी ।।
करिता कुशावर्ती स्नाने । त्याचे कैलासी राहणे ।।
नामा म्हणे प्रदक्षिणा । त्याच्या पुण्या नाही गणना ।।




## ११ : श्रीकेदारनाथ

बारा ज्योतिर्लिंगांपैकी रामेश्वर भारताच्या अगदी दक्षिणेला आहे, तर केदारनाथ उत्तरेला हिमालयाच्या कुशीत विसावला आहे. या दोन ज्योतिर्लिंगांच्या कृपादृष्टीच्या कक्षेत सारा भारत सामावलेला आहे. आसेतुहिमाचल भारतभूमीच्या एकात्मतेची ग्वाही देणारी ही दोन ज्योतिर्लिंगे आहेत. रामेश्वराच्या चरणांवर दक्षिण महासागर आपल्या श्रद्धेचे अर्घ्य अर्पण करीत आहे, तर केदारनाथाच्या मस्तकावर हिमगिरीचा रजतकिरीट झळाळत आहे. देवतात्मा हिमालयाच्या हिमधवल शिखरांच्या आणि गंगा-यमुनादी सरितांच्या सान्निध्यात नांदणारा केदारनाथ आज हजारो वर्षे हिंदूंच्या परमश्रद्धेचा विषय बनलेला आहे. हिंदू मने

त्याच्या दर्शनासाठी उत्सुक बनतात, यात्रेतील कष्टांची तमा न बाळगत प्राणावर उदार होऊन दर्शनसुख अनुभवतात आणि त्यातली कित्येक त्याच पवित्र वातावरणात तपाला बसतात.

केदारनाथाचे मंदिर हिमालयाच्या कुशीत ११७३५ फूट उंचीवर आहे. हे स्थान उत्तर प्रदेशातील टेहरी गढवाल जिल्ह्यात मोडते.



देवप्रयाग

केदारनाथाच्या दर्शनास जाण्याच्या मार्गावरचा पहिला टप्पा म्हणजे हरद्वार. हरद्वार दिल्लीपासून मोटार रस्त्याने १६३ मैलांवर आहे. हरद्वारला हरिद्वारही म्हणतात. येथे हरिहरांत वाद नाही, संवाद आहे. हराच्या म्हणजे केदारनाथाच्या आणि हरीच्या म्हणजे बदरीनारायणाच्या दर्शनाला जाताना हिमालय-प्रदेशात प्रवेश करण्याचे हेच 'द्वार' असल्यामुळे या स्थानाला दोन्ही नावे शोभतात. सात पवित्र पुऱ्यांपैकी मायापुरी ती हीच. येथून हृषीकेश पंधरा मैलांवर आहे. ही दोन्ही

स्थाने पवित्र आहेत, रमणीय आहेत. याच ठिकाणी गंगा पर्वतभागातून खाली उतरते. दोन्ही क्षेत्रात पंडितांचा आणि साधुसंतांचा वास आहे.

हृषीकेश समुद्रसपाटीपासून अकराशे चाळीस फूट उंचीवर आहे. यानंतरचा टप्पा म्हणजे देवप्रयाग. गढवाल भागात मंदाकिनीला किंवा अलकनंदेला दुसरी कोणती नदी जेथे मिळते, त्या स्थानाला 'प्रयाग' म्हणतात. या जिल्ह्यात एकूण पाच प्रसिद्ध प्रयाग आहेत : देवप्रयाग, रुद्रप्रयाग, कर्णप्रयाग, नंदप्रयाग आणि विष्णुप्रयाग. येथे अलकनंदा आणि भागीरथी यांचा संगम आहे. या संगमापूर्वी अलकनंदेला पर्वतातील सर्व मोठे प्रवाह मिळालेले आहेत. भागीरथीशी अलकनंदेचा संगम झाल्यानंतर पुढे वाहणारा प्रवाह गंगा या जगद्विख्यात नावाने प्रसिद्ध झालेला आहे. देवप्रयाग समुद्रसपाटीपासून साडेपंधराशे फूट उंचीवर आहे. येथे संगमस्थानी घाट बांधलेला आहे. संगमावरील हिमशीतल पाण्यात बोट घालणेही कठीण असताना भक्तभाविक लोक स्नान केल्यावाचून राहात नाहीत. या संगमस्थानी जलस्पर्श करताना यात्रिकाच्या मनात भागीरथीच्या जन्माची कथा उमलून येते. सगरपुत्रांच्या उद्धारासाठी भगीरथाच्या प्रयत्नांनी प्रकटलेली ही पावन धारा हजारो वर्षे भरतभूमीचे अंतर्बाह्य भरणपोषण करीत आलेली आहे. तिच्या प्रवाहाबरोबरच आपल्या संस्कृतीचा प्रवाहही अखंड वाहत राहिला आहे.



रुद्रप्रयाग

देवप्रयागपासून बसने त्रेचाळीस मैलांवरील रुद्रप्रयागला जाता येते. अलकनंदा आणि मंदाकिनी यांच्या संगमावर वसलेले हे स्थान दोन हजार फूट उंचीवर आहे. येथे रुद्र-

शिवाचे जुने मंदिर आहे. रुद्रप्रयागहून केदारनाथ व बदरीनारायण या स्थानांकडे जाण्याचे वेगवेगळे मार्ग फुटतात. भाविक यात्रेकरू केदारनाथाचे दर्शन घेऊन रुद्रप्रयागला परत येतात आणि येथून बदरीनारायणाच्या दर्शनाला जातात. कारण पापनाशी केदारनाथाचे दर्शन घेतल्यावाचून जो बदरीनारायणाकडे जातो, त्याची यात्रा निष्फल होते, अशी पुराणांची आज्ञा आहे :

अकृत्वा दर्शनं यस्तु केदारस्याघनाशिन : ।
प्रयाति बदरीं तस्य यात्रा भवति निष्फला ॥

कट्टर शैव केवळ केदारनाथाला जातात, कट्टर वैष्णव केवळ बदरीनारायणाला जातात, परंतु बहुसंख्य भाविक हिंदु हा हरिहरांतील भेद दूर सारून दोहोंचे दर्शन सारख्याच निष्ठेने घेतात. त्यांना या हिमधवल वातावरणात हरि-हरांच्या स्नेहमिठीचा सोहळा पहावयास मिळतो.

रुद्रप्रयागपासून केदारनाथाकडे जाताना चोवीस मैल अंतरावर गुप्तकाशी हे स्थान आहे. यातील बावीस मैलांपर्यंत जीप जाते. परंतु सामान्य यात्रिकांना रुद्रप्रयागपासून पदयात्रा सुरू करावी लागते. अधूनमधून चट्ट्या ( विश्रामस्थाने ) असतात. टप्याटप्याने चालत यात्रिक केदारनाथाकडे जात असतात. हा रस्ता मंदाकिनीच्या किनाऱ्याकिनाऱ्याने जातो. ज्यांना चालणे शक्य नसते, ते घोडा, डांडी किंवा कंडी यांच्या सहाय्याने मार्ग आक्रमितात. गुप्तकाशीला पोचताना शेवटच्या दोन मैलांची चढण अत्यंत क्लेशदायी आहे. निसर्गाचे सौंदर्य दृष्टीपुढे नाचत असले, तरी चढण्याच्या क्लेशांमुळे सौंदर्यदर्शनाचे सुख अनुभवणे कठीण होते.

गुप्त काशीला "गुह्यकाशी" असेही म्हणतात. काशी तीन आहेत. पैकी हिमालयात भागीरथीच्या तीरावरील उत्तरकाशी, ही गुप्तकाशी आणि खाली मैदानात गंगातटाकी असलेली प्रसिद्ध वाराणसी.

गुप्तकाशी येथे मणिकर्णिका कुंड आणि विश्वनाथाचे मंदिर आहे. त्याच्याचजवळ अर्धनारीनटेश्वराचेही मंदिर आहे.

गुप्तकाशीच्या समोर नदीच्या दुसऱ्या किनाऱ्यावर उखी मठ आहे. केदारधामला जाण्याच्या मार्गावर गुप्तकाशी पडते आणि येण्याच्या मार्गावर उखीमठ लागतो. उखीमठ हे स्थान सुंदर आहे. या स्थानाचे शुद्ध नाव उषामठ असे आहे. 'उषा'चे 'उखा'–'उखी' असे अपभ्रष्ट रूप होऊन 'उखीमठ' हे नाव बनले आहे. श्रीमद्‌भागवताच्या दशमस्कंधात उषा-अनिरुद्धाची जी हृदयंगम प्रेमकथा आहे, त्या कथेचा या स्थानाशी संबंध आहे. बाणासुर आणि उषा यांचा प्रासाद इथेच होता. उषेने अनिरुद्धाला स्वप्नात पाहिले आणि ती प्रेमविव्हल बनली ती इथेच. चित्रलेखेने देव, दानव, गंधर्वांची चित्रे काढून उषेचा प्रियकर शोधून काढला आणि त्याला द्वारकेहून आणला तो इथेच. इथेच उषेने अनिरुद्धाच्या गुप्तसान्निध्यातील काळ अनुभवला आणि अखेरीस या नात्यावरून बाणासुराचे व श्रीकृष्णाचे युद्ध होऊन बाणासुर पराभूत झाला तो इथेच. उखीमठात येताच ती सर्व अद्‌भुतरम्य कथा आपल्या डोळ्यांसमोर तरळू लागते.

उखीमठात केदारनाथ-मंदिराचे पुजारी रावळ राहतात. मठातील मंदिर केदारनाथमंदिराची प्रतिकृतीच आहे. जिथे रावळ बसतात, तिथेच शिवाची पंचमुखी मूर्ती आहे. जवळ कालीमंदिर आहे. या स्थानाचे विशेष महत्व असे आहे की, जेव्हा केदारधाम बर्फाच्या वृष्टीने व्यापलेले असते, त्या काळात म्हणजे कार्तिक ते चैत्र या सहा महिन्यांत केदारनाथाचे मंदिर बंद असते आणि केदारेश्वराचे प्रतीकस्वरूप एक लहानसे सिंहासन उचलून उखीमठात आणले जाते आणि येथे त्याची पूजा-अर्चा होते. मंदिराचे कार्यालयही त्या काळात येथेच असते. वैशाखात बर्फ वितळू लागल्यावर केदारनाथाचे मंदिर उघडते; यात्रिकांची रीघ सुरू होते

आणि मंदिरातील शिवलिंगावर पूजोपचार सुरू होतात. उखीमठाहून फाटा या ठिकाणी जावयाचे आणि तेथून गौरीकुंड गाठावयाचे. फाट्या-पासून सहा मैलांवर स्वर्णप्रयाग. येथे मंदाकिनीला स्वर्णगंगा येऊन मिळते. स्वर्णगंगा आणि क्षीरगंगा या दोन नद्या वासुकीताल या ठिकाणी उगम पावतात. स्वर्णप्रयागपासून जवळच असलेल्या नारायणकोटी या ठिकाणी अनेक खंडित प्राचीन मूर्ती आहेत. (गुप्तकाशीहून गौरीकुंडाकडे जाताना गौरीकुंडाच्या अलीकडे गणेशाची जन्मभूमी दाखविली जाते. तेथे मस्तकहीन गणेशाचे छोटे मंदिर आहे. पार्वतीने न्हाताना आपल्या मळापासून गणेश बनवून त्याला दारावर राखण बसविले. एवढ्यात शंकर आले. गणेशाने त्यांना प्रवेश नाकारला म्हणून त्यांनी त्रिशूळाने त्याचे मस्तक उडविले. ही कथा येथील मस्तकहीन गणेशमूर्तीच्या स्पष्टीकरणा-साठी वापरली जाते. वास्तविक मुळातच ही मस्तकहीन स्वरूपातील मूर्ती नसावी. कोणी तरी मूर्तिभंजकाने ती खंडित केली आणि लोकश्रद्धेने प्रस्तुत कथा आठवून आपली समजूत करून घेतली, असे दिसते.

गुप्तकाशीहून गौरीकुंड सतरा मैलांवर असून त्याची उंची अडुसष्टशे फूट आहे. येथे एक उष्ण पाण्याचे व एक थंड पाण्याचे अशी दोन कुंडे आहेत. ही पार्वतीच्या–गौरीच्या स्नानाची जागा असल्यामुळे या स्थानास गौरीकुंड असे म्हणतात. येथे गौरीमंदिर आहे.

गौरीकुंडापासून सात मैलांवर मंदाकिनीच्या खोऱ्याचा मुकुटमणी असलेले केदारधाम आहे. गौरीकुंड ते केदारधाम हा मार्ग कष्टप्रद असूनही नितांतरम्य आहे. गौरीकुंडापासून केदारधामाकडे जाताना प्रारंभी वन-राजीची नयनमनोहर शोभा आहे; दृष्टीसमोर हिमाने रुपेरी बनलेली गगनचुंबी शिखरे आहेत; मंदाकिनीला भेटण्यासाठी आतुर झालेले जलप्रवाह पर्वतभागांतून झेपावत आहेत आणि या सर्वस्वाचा विसर

पाडणाऱ्या सौंदर्याच्या दर्शनाने यात्रिकांचे श्रम विरून जात आहेत, असा अनुभव या वाटेवर येतो.


अवघे सात मैलांचे अंतर, परंतु ६,८०० फुटांवरून २२,७७० फुटांवर चढावयाचे असते. केदारपुरीला पोचताच समोर पाहिले की, ' हिमालय ' या नावाची सार्थकता पटते. मागे केदारनाथ शिखर उभे आहे. जवळच स्वर्गगंगा व क्षीरगंगा या दोन सरितांना जन्म देणारा वासुकीताल आहे. शेजारीच ' महापंथ ' नावाचे शिखर आहे. ही पर्वतशिखरे हिमाचा धवल वेश परिधान करून आकाशाला भेटू पाहात आहेत आणि आकाश त्यांना मेघांच्या रूपाने सामोरे आले आहे.

केदारपुरी ही तीनशे-साडेतीनशे घरांची अस्थायी वस्ती आहे. यात्रेच्या काळात म्हणजे वैशाखापासून आश्विनापर्यंतच्या सहा महिन्यांत येथे पंड्यांचा आणि यात्रिकांना आवश्यक त्या वस्तू विकणाऱ्या लोकांचा निवास असतो. बाकी सहा महिने केदारपुरी बर्फाच्या आवरणाखाली शांत पहुडलेली असते.

केदारनाथ देवस्थानची पूजाव्यवस्था पूर्वीपासून लिंगायतपंथी रावळांकडे आहे. १९३९मध्ये डॉ. संपूर्णानंदांच्या प्रयत्नांनी त्या वेळच्या संयुक्त प्रांत सरकारकडून देवस्थानच्या व्यवस्थेसाठी मंदिर कमिटी नेमली गेली. रावळांचे वेतन ठरवून त्यांना या कमिटीच्या अधिकाराखाली आणण्यात आले. तेव्हापासून यात्रिकांसाठी अनेक सोयी होऊ लागल्या. या मंदिर कमिटीच्या कक्षेत केदारनाथ आणि बदरीनाथ या मुख्य देवस्थानांशिवाय या परिसरातील आणखीहि अनेक मंदिरे आहेत.

जेथे पोचण्यासाठी यात्रिक जिवाची तमा न करता अवघड वाट आक्रमून येतात, ते केदारनाथमंदिर छोटेसेच परंतु सुंदर आहे. हे मंदिर उंच चौथऱ्यावर बांधलेले आहे. महाद्वारात जाण्यासाठी पायऱ्या चढून जावे लागते. महाद्वारासमोर नंदीची विशाल मूर्ती आहे. सभामंडपाक्षावर दोन्ही

बाजूंना उतरते असे छप्पर आहे आणि गर्भगृहावर वर उतरते होत गेलेले चौकोनी शिखर आहे. बौद्धस्तूपावर जशी छत्री असते, तशी चौकोनी छत्री शिखरावर आहे आणि छत्रीवर कळस आहे. इकडच्या अनेक मंदिरांची रचना अशीच दिसते. दर्शनासाठी बाहेर बारी लावून उभे राहावे लागते. आपली पाळी आल्याशिवाय यात्रिकाला आत जाता येत नाही. सभामंडपात मध्यभागी आणखी एक नंदी आहे. भिंतीच्या कडेला पाच पांडव आणि द्रौपदी यांच्या मूर्ती आहेत. गर्भगृहाच्या दाराच्या चौकटीवर अनेक लहान लहान मूर्ती कोरलेल्या आहेत. गर्भगृहात तुपाचे अनेक दिवे जळत असतात. त्या दिव्यांच्या प्रकाशात उजळलेले केदारनाथाचे लिंग पाहताना यात्रिकाचे हृदय भक्तिभावाने ओसंडून वाहू लागते.



श्रीकेदारनाथमंदिर

केदारनाथाची नित्योपासना अगदी साधी – गिरिवासी शिवाला साजेशी असते. रुद्राभिषेकाच्या वेळी ब्राह्मण मंत्रघोष करू लागले की

त्या गूढरम्य वातावरणाला आणखीच गूढता लाभते आणि आपले मन नित्याच्या सुखदुःखांच्या चक्रातून बाहेर पडते; आतल्या आत एक वेगळे सुख जाणवू लागते. येथील सायंकाळच्या आरतीच्या वेळी दर्शनार्थींची झुंबड उडते. येथे शिवलिंगाच्या पूजेत पाणी वापरीत नाहीत. शिवलिंगाला तूप चोळण्याची प्रथा आहे. हा तूप चोळण्याचा विधी यात्रिकाला स्वहस्ते करता येतो. पूजाद्रव्यांची मात्र येथे वाण आहे. येथे फुले-फळे सहज मिळत नाहीत. रोजच्या पूजेसाठी बिल्वपत्रे रुद्र-प्रयागहून आणावी लागतात. फळ म्हणून सुका नारळ वापरावा लागतो. जवळच्या महापंथ शिखरावरील ब्रह्मकुंडात भाद्रपद मासात फुलणारी ब्रह्मकमळे शिवाला वाहण्याचे पुण्य मोठे समजले जाते. ही फुले पंडे लोक आणतात. यात्रेकरू त्यांच्याकडून ती भारी किंमत देऊन घेतात आणि शिवलिंगावर भक्तिभावाने वाहतात.

केदारेश्वराच्या मंदिरामागे एका छोट्या चौथऱ्यावर पत्र्याचे छप्पर आहे आणि आत एक शिवलिंग आहे. हे स्थान शंकराचार्यांची समाधी म्हणून दाखविले जाते. ज्याने अवघ्या बत्तीस वर्षांच्या वयात पाखंड-खंडन करून आसेतुहिमाचल आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला आणि वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन घडविले, ते आद्य शंकराचार्य देहत्याग करण्यासाठी अखेरीस हिमालयात शंकराच्या तपोभूमीतच आले आणि हिमराशीत कोठे तरी नाहीसे झाले. त्या महापुरुषाचे हे स्मारक इतक्या उपेक्षित स्थितीत पडून राहावे, याचा विषाद वाटतो.

केदारनाथाच्या मंदिरापासून थोड्या अंतरावर ' महापंथ ' नावाचे शिखर आहे. असे म्हणतात की, पांडवांनी याच मार्गाने स्वर्गारोहण केले. याच भागात ' स्वर्गारोहिणी ' नामक नदीचे उगमस्थान आहे. या स्थानाची उंची १६,००० फूट आहे. या नदीच्या खोऱ्याला ' मृत्यूकी घाटी ' असेच नाव आहे. लोक महापंथ शिखरावर चढून

खाली झेप घेत असत. याला ' भैरवझेप ' ( भैरवझाप ) असे म्हणत असत. सरकारने आता असा देहत्याग करायला बंदी केली असली, तरी काही श्रद्धावंत अजूनही नकळत तिकडे जाऊन भैरवझेप घेतात, असे म्हणतात.

पांडवांचा या भूमीशी घनिष्ठ संबंध आहे. काही लोकांचे असे म्हणणे आहे की, पांडवांची ही मूलभूमी आहे. बहुपतित्वाची चाल या भागातील काही जमातीत अजूनही रूढ आहे. पांडुकेश्वर नामक स्थानी माद्री-बरोबर विहार करताना पंडुराजाला जेथे मृत्यु आला, तो पर्वतभाग आजही दाखविला जातो. काही स्थानांचा भीम आणि अर्जुन यांच्या नावांशी संबंध आहे. येथे ' पांडवनृत्य ' नावाचे लोकनृत्य प्रचलित आहे. या मूलभूमीविषयीच्या आकर्षणामुळेच पांडवांनी स्वर्गारोहणाचे महाप्रस्थान येथून सोडले असावे, असे वाटते.

केदारनाथाच्या उद्भवाची कथाही पांडवांशीच संबंधित आहे. गोत्रहत्येचे पातक धुवून टाकण्यासाठी पांडव वाराणशीला विश्वेश्वराची उपासना करण्यासाठी आले. त्यांचे सत्व पाहण्यासाठी शिव तेथून गुप्त झाला आणि हिमालयात गेला. पांडव ह्याला शोधीत हिमालयात आले. पांडवांना आपण सापडणार, असे वाटताच शिव पुनः गुप्त होऊन ( गुप्तकाशी येथे ) आणखी वर गेला. पांडवही वर चालले. शिवाने बैलाचे रूप घेतले आणि तेथील गायीगुरांच्या कळपात तो चरू लागला. सायंकाळच्या वेळी भीमाने त्याला ओळखले आणि गुरांच्या परतीच्या मार्गावर तो उभा राहिला. आता आपणास भीमाच्या तावडी-तून सुटका नाही, असे दिसताच शिव शिंगे भूमीत खुपसून आत घुसू लागला. भीम शिवाला मिठी मारण्यासाठी धावत आला. तोवर बैलाच्या रूपातील शिव भूमीत नाहीसा झाला होता आणि त्याचा केवळ पार्श्वभाग वर राहिला होता. भीमाचा स्पर्श होताच शिव प्रसन्न झाला आणि त्याने

पांडवांना सांगितले की, माझ्या भूमीवर राहिलेल्या भागाच्या आकारातच मी येथे राहीन आणि याच स्वरूपातील लिंगाची उपासना लोकांनी करावी. येथील प्राकृतिक शिवलिंगाच्या आकाराचे स्पष्टीकरण देणारी ही कथा विचित्र आहे.


असे आहे शिवाचे हे अत्युच्च निवासस्थान केदारधाम. येथे निसर्गसौंदर्य आहे, परंतु येथील सौंदर्य विलासाला प्रेरणा देणारे नाही, तर वैराग्याचे पोषण करणारे आहे. येथे शांतरसाने शृंगाराच्या माथ्यावर पाय ठेवलेला आहे. येथे यात्रिकांच्या डोळ्यांचेच पारणे फिटते असे नव्हे, तर त्यांची मनेही उन्नत होतात. एका पवित्र सुखाच्या सागरात डुंबत राहातात. या भूमीचा कणन् कण आमच्या परंपरेच्या पावित्र्याने ओथंबलेला आहे. येथील सुरसरितांच्या प्रवाहावर वैदिक ऋषिमुनींचे आणि इतिहासकाळातील हजारो साधुसंतांचे मंत्रघोष व नामघोष तरंगत आहेत. इथल्या हिमधवल गगनचुंबी शिखरांवर आमच्या संस्कृतीची धवल कीर्तीपताका अविरत फडकत आहे. म्हणूनच या भूमीचा निरोप घेणे अशक्य बनते. यात्रिक नाखुशीनेच परत फिरतात आणि आचार्यांच्या शब्दात केदारेश्वराला भावभराने वंदन करतात :

महाद्रिपार्श्वे च तटे रमन्तं सम्पूज्यमानं सततं मुनीन्द्रैः ।
सुरासुरैर्यक्षमहोरगाद्यैः केदारमीशं शिवमेकमीडे ॥

( महान हिमालयाच्या तट प्रदेशात रमणाऱ्या, ऋषिमुनींकडून आणि सुर, असुर, यक्ष व महानाग इत्यादींकडून सतत पूजिल्या जाणाऱ्या केदारेश्वराला मी वंदन करतो. )

☆ ☆ ☆

अनुक्रम.................. दि: ..................
क्रमांक ........ नों दि



## १२ : श्रीघृष्णेश्वर

औरंगाबादच्या वायव्येला सुमारे दहा कोसांवर वेरूळ नावाचे एक गाव आहे. त्या वेरूळची जग प्रसिद्ध लेणी पाहण्यासाठी देशी-विदेशी लोकांची सतत गर्दी असते. जवळच देवगिरीचा किल्लाही पाहण्यासारखा आहे. त्याला दौलताबाद असेही नाव आहे. महाराष्ट्राची ही महत्त्वाची ऐतिहासिक स्थळे आहेत.

देवगिरी आणि वेरूळ यांचे ऐतिहासिक महत्त्व सर्वांना माहीत आहे. यादवांची राजधानी आणि भोसल्यांचे मूळ पाटिलकीचे गाव म्हणून त्या ठिकाणी त्यांच्या अनेक स्मृतींचे अवशेष आहेत. तेथील प्रत्येक दगड अद्यापही आल्यागेल्यांना आपल्या आठवणी सांगत आहे.

वेरूळला पौराणिक महत्त्वही आहे. कारण त्या ठिकाणी शंकराच्या बारा ज्योतिलिंगांपैकी घृष्णेश्वर हे बारावे प्रसिद्ध ज्योतिर्लिंग आहे. इलागंगा नावाच्या एका छोटया नदीच्या काठावर ' इलापूर–एलोर–

वेरूळ ' हा गाव असून तेथे श्रीघृष्णेश्वर महादेवाचे मंदिर आहे. दक्षिणाभिमुख असलेल्या ह्या मंदिराचे शिल्पकाम अत्यंत कलाकुसरीचे आहे. या मंदिराभोवती उंच कोट बांधलेला आहे. प्रवेशद्वारावर नगारखान्याची सोय केलेली आहे. देवाचे भांडारगृह, पाण्याची विहीर, नंदीमंडप वगैरे भाग मंदिराच्या प्रांगणात आहेत.

तंजावरी घाटाच्या बांधणीचे हे टुमदार सुंदर मंदिर इ. स. १७३० मध्यें मल्हारराव होळकर यांच्या पत्नी गौतमाबाई यांनी बांधले. द्वादशकोनी बांधणीचे कौशल्यपूर्ण बांधकाम प्रेक्षणीय आहे. मध्यमंडपात कासव असून भिंतींच्या कमानीत गणेशाची मूर्ती आहे. गर्भगृहाच्या चौकटीवर सुंदर कलेचे कोरीव काम आहे. पशुपक्ष्यांच्या, पानाफुलांच्या आणि नानाविध मनुष्यांच्या भावमूर्तींची नक्षी या मंदिरात ठायी ठायी कोरलेली आहे. ती पाहून मन थक्क होते.

गाभाऱ्यात श्रीघृष्णेश्वराचे स्वयंभू ज्योतिर्लिंग असून तेथे अखंड नंदादीप तेवत असतात. पिंडीवर थंड पाण्याची संततधार चालू असते. येथे दररोज रुद्राभिषेक आणि पूजा नित्य नियमाने करतात. भाविक शिवभक्तांची ये-जा येथे नेहमी चालते. सोमवारी आणि महाशिवरात्रीला या ठिकाणाला यात्रेचे स्वरूप येत असते.

घृष्णेश्वराच्या दिव्य ज्योतिर्लिंगाच्या उत्पत्तीविषयी अनेक कथा सांगितल्या जातात. ' घुसुमेशमाहात्म्य ' नावाच्या ग्रंथात दिलेली ही एक कथा पाहा : सुधर्म आणि सुदेहा हे एक ब्राह्मण कुटुंब वेरूळ येथे राहात होते. बरेच दिवस झाले तरी त्यांना पुत्रसंतान झाले नाही. म्हणून सुदेहाच्या संमतीने सुधर्माने घुसुमा नावाच्या स्त्रीशी विवाह केला. पुढे शिवकृपेने घुसुमेला पुत्र झाला. तिच्यावर सुधर्माची फारच प्रीति जडली, पण सुदेहा मात्र मत्सराने जळू लागली. स्त्रीस्वभाव विलक्षण असतो हेच खरे. एके दिवशी सुदेहाने भयंकर कृत्य केले. तिने आपल्या सवतीचा

तो मुलगा ठार मारला आणि आपल्या हाताने अविचाराने तो वंशदीप मालवला. त्या मुलाचे तुकडे करून तिने एका तळ्यांत टाकले. तिचे हे कृत्य चालू होते त्याच वेळी सुधर्मा आणि घुसुमा हे दांपत्य नित्य नियमाप्रमाणे मातीची एकशे एक शिवलिंगे करून त्यांच्या पार्थिव पूजेत मग्न होते. पूजा आटोपल्यावर त्यांनी ती शिवलिंगे 'हरहर' असा जयघोष करून त्याच तळ्यात नेऊन टाकली.

त्या वेळी चमत्कार असा झाला की, त्या तळ्यातून त्यांचा तो मुलगा जिवंत होऊन वर आला. आपल्या मुलाचा तो पुनर्जन्म पाहून त्यांना विलक्षण नवल आणि आनंद वाटला. ते चकित होऊन पाहू लागले, तोच साक्षात श्रीशंकर त्या ठिकाणी प्रगट झाले आणि त्यांनी घुसुमेच्या भक्तीमुळे प्रसन्न होऊन तिला वरदान दिले. तिच्या मागणीप्रमाणे स्वतः श्रीशंकर 'घृष्णेश्वर' ज्योतिर्लिंगाच्या रूपाने त्या ठिकाणी राहू लागले. भक्तांच्या कामना पुरवू लागले.

घृष्णेश्वराच्या उत्पत्तीविषयी पुराणात अशी कथा सांगितली आहे: वाराणशीजवळील आनंदवनात शिवपार्वती सोंगटया खेळत होती. त्यात शंकरांच्याच अंगावर बाजू आली. असे अनेक वेळा झाल्यामुळे शंकर चिडले आणि संसाराचा सारीपाट उधळून ते निघून गेले. गोदावरीच्या परिसरातील काम्यवनात आल्यावर शंकरांच्या मनाला शांती लाभली. रुसून गेलेल्या शंकरांचा शोध करीत करीत पार्वती काम्यवनात आली.

या वेळी पार्वतीने भिल्लिणीचे रूप घेतले आणि आपल्या नृत्यगायनाने शंकरांना भुलविले. नंतर शंकरांनी भान विसरून त्या भिल्लिणीला पत्नी म्हणून स्वीकारण्याचे ठरविले आणि तिचा हात धरला तोच काय चमत्कार! पार्वतीने आपले मूळचे रूप प्रगट केले. ते पाहून शंकर


ओशाळले. नंतर शंकर–पार्वती आनंदाने त्या काम्यवनात वेरूळ येथे राहू लागली.

त्या भूमीत पाण्याची सोय म्हणून शंकरांनीं आपला त्रिशूळ खोवून पाताळगंगेचे पाणी आणले आणि त्या शिवालयतीर्थ स्थानावर ते राहू लागले. एकदा पार्वती त्या शिवालयतीर्थाच्या काठावर बसून वेणीफणी करीत होती. तिने आपल्या भाळावर कुंकुम लावण्यासाठी डाव्या हातात केशर म्हणजे घुसृण घेतले आणि उजव्या अंगुलीने त्याचे घर्षण केले तोच काय चमत्कार! त्या केशरातून तिच्या हातावर लहानसे शिवलिंग निर्माण झाले. त्याच शिवलिंगाची स्थापना "घृष्णेश्वर" या नावाने पार्वतीने त्या स्थळी विधिपूर्वक केली. नंतर त्या स्वयंभू लिंगातच स्वतः श्रीशंकर ज्योतिर्लिंग म्हणून अवतरले आणि त्यांनी ती स्मृती अखंड कायम ठेवली.

त्या घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगावर पुढे भक्तांनी मंदिर बांधले. वारंवार त्या मंदिराचे जीर्णोद्धारही केले आणि त्या पवित्र क्षेत्राचे महत्त्व वाढविले.

पाताळगंगा भोगावतीचे जळ ज्या पावन शिवालय तीर्थात आहे ते शिवालय तीर्थ कुंड घृष्णेश्वर मंदिरापासून थोड्याच अंतरावर आहे. हे तीर्थकुंड चारही बाजूंनी दगडी पायऱ्यांनी बांधलेले आहे. इ. स. १५९९ मध्ये मालोजी राजे भोसले यांनी श्रीघृष्णेश्वराचे मंदिर आणि शिवालय तीर्थ यांचा जीर्णोद्धार केला होता. नंतर देवी अहिल्याबाई होळकर यांनी इ. स. १७६९ मध्ये पुनः त्यांची नीट बांधणी केली. घृष्णेश्वराची उत्सवमूर्ती प्रतिवर्षी यात्रेत महाशिवरात्रीला पालखीत बसवून ह्या पवित्र शिवालयतीर्थात स्नानासाठी आणली जाते. स्नानमहोत्सव फारच थाटाचा असतो. वेरूळ गावात श्रीघृष्णेश्वरमंदिर आणि हे शिवालय तीर्थ ही दोन स्थळे प्रेक्षणीय तशीच दर्शनीय आहेत. ह्या स्थळांमुळेच वेरूळ क्षेत्राचे महत्व वाढले.

पौराणिक काळात कोणी एल नावाचा राजा येथे होऊन गेला. त्याच्या नावावरून या गावाला–एलोर–एलापूर–वेरूळ हे नाव पडले असावे. शिवालयतीर्थात स्नान केल्याने त्या राजाचा एक असाध्य रोग बरा झाल्याचे सांगतात.


शिवालयतीर्थ वेरूळ

इतिहासकाळात या ठिकाणी राष्ट्रकूट घराणे नांदत होते. चालुक्यांची सत्ता झुगारून दन्तिदुर्ग राष्ट्रकूटाने आपल्या साम्राज्याचा पाया येथेच घातला. दन्तिदुर्गाची राणी घृष्णावती ही परम शिवभक्त होती. तिच्यासाठीच दन्तिदुर्गाने घृष्णेश्वराचे भव्य आणि सुंदर मंदिर बांधले. दन्तिदुर्गाची दुसरी राणी माणिकावती हिच्या इच्छेसाठी त्याने वेरूळ जवळच्या डोंगरात अत्यंत सुंदर असे जगप्रसिद्ध कैलास लेणे कोरून त्यात माणिकेश्वर महादेवाची स्थापना केली. हे कैलास लेणे म्हणजे 'आधीकळस मग पाया' ह्या तत्वाच्या शिल्पकलेचा उत्कृष्ठ नमुना आहे. तो पाहून जगातील कलाकारही तेथे नम्र होतात. महानुभावपंथसंस्थापक श्रीचक्रधर वेरूळ येथे आले तेव्हा त्यानी कैलासलेण्यास माणिकेश्वर नावानेच संबोधिले. राष्ट्रकूट राजांनीच देवगिरीचीही बांधणी केली.

राष्ट्रकूटानंतर यादवांनी देवगिरी ही आपली राजधानी केली आणि तेथील वैभव वाढविले. यादवकाळानंतर वेरूळ-देवगिरीची सत्तासंपदा मुसलमानांच्या ताब्यात गेली. पण पुढे लौकरच वेरूळचे पाटील भोसले यांनी कर्तबगारी केली आणि त्यांच्या वंशांतील शिवछत्रपतींनी ह्या देवगिरी-वेरूळच्या महत्त्वाचे पुनरुज्जीवन केले.

वेरूळचा इतिहास अशा प्रकारे अनेक घटनांनी भरलेला आहे. वेरूळ हे क्षेत्र घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगामुळे प्रसिद्ध तर आहेच, पण ते महाराष्ट्राच्या इतिहासाचे एक महत्त्वाचे केंद्रस्थान आहे. वेरूळची लेणी जगातील शिल्पकलेचे महान दिव्य माहेर आहे. वेरूळजवळचा देवगिरीचा किल्ला म्हणजे डोंगरी किल्ल्याचा एक विलक्षण नमुना आहे. येथून जवळच अर्धचंद्राकार डोंगरावर वेरूळची लेणी खोदलेली आहेत. ही लेणी एकूण चौतीस आहेत. त्यातील पहिली बारा बौद्ध, त्यापुढची एकोणीस हिंदू आणि शेवटची जैन. इसवी सनापूर्वी दुसऱ्या शतकापासून ख्रिस्तोत्तर नवव्या शतकापर्यंत ही लेणी खोदली जात होती. बौद्ध लेण्यांपैकी क्रमांक दहाचे लेणे चैत्य आहे आणि बाकीची अकरा लेणी विहार आहेत. त्यांपैकी पहिल्या क्रमांकाचे आणि सातव्या क्रमांकाचे ही लेणी प्राचीन हीनयान पंथाची असल्यामुळे साधी आहेत. बाकीची महायानपंथाची असल्यामुळे शिल्पाकृतींनी नटलेली आहेत. समोर बंदिस्त प्रांगण, मध्ये स्तंभांवर आधारलेला मंडप, बाजूंना भिक्षुनिवासांसाठी खोल्या आणि शेवटी समोरच्या भिंतीत गाभारा आणि त्यांत ध्यानस्थ बुद्धमूर्ती—अशी या लेण्यांची मांडणी आहे. प्रचंड बुद्धमूर्ती आणि प्रचंड द्वारपाल हे येथील वैशिष्ट्य. या बुद्धमूर्तींत विविधता नाही आणि सौंदर्यही कमीच. अजंठ्याला शिल्प आणि चित्र या दोन्ही कलांनी बुद्धाची जी भावसुंदर पूजा मांडली आहे, तिचा वेरूळच्या बौद्ध लेण्यात मागमूसही नाही.

प्रेक्षकाची ही सौंदर्याची भूक हिंदू लेण्यांत पुरेपूर तृप्त होते. ही हिंदू लेणी बहुतेक शैव पंथाची आहेत, परंतु त्यात वैष्णवमूर्तीहि आहेत. या सर्व हिंदु लेण्यांत खांबांवर, छतावर, भिंतींवर, गर्भगृहांच्या दारांवर इतके सुंदर शिल्प आहे की, प्रेक्षकाची मती गुंग होऊन जाते. शिवाच्या असंख्य मूर्ती येथे आहेत. शिवपार्वतीविवाह, शिवपार्वती-

सारीपाट, शिवतांडव, शिवलास्य, अंधकासुरवध, मार्कंडेयवरप्रदान, रावणकृत कैलासोच्चाटन, महायोगी शिव, वीरभद्र, कालभैरव, इत्यादी शिवमूर्ती आणि महिषासुरमर्दिनी, गणेश, सप्तमातृका, लक्ष्मी-नारायण, वराह, कालियामर्दन, गोवर्धनोद्धारण, नरसिंह, अशा दहा--दहा फूट उंचीच्या, भावपूर्ण, रेखीव वाटणाऱ्या व जिवंत वाटणाऱ्या वैष्णवमूर्ती आहेत. कैलास लेणे तर कलेच्या जगांतले महान आश्चर्य आहे. हे लेणे गुंफेच्या स्वरूपाचे नसून, डोंगर खोदून पायथ्यापासून शिखरापर्यंत संपूर्ण मंदिर डोंगरातून बाजूला काढले आहे. बांधीव मंदिराप्रमाणे दिसणारे हे मंदिर अखंड एका शिळेचे आहे. एकशेसात फूट उंचीचा कडा तोडून आणि तीस लक्ष घनफूट खडक खोदून आकारास आणलेल्या या मंदिराची लांबी १६४ फूट, रुंदी १०९ फूट आणि उंची ९६ फूट आहे. त्याच्याभोवती ३० फूट रुंदीचे प्रांगण असून, बाजूंच्या भिंतीत स्वतंत्र गुंफालेणी आहेत. प्रांगण समोरूनही खोदीव भिंतीने बंदिस्त आहेत. मंदिरासमोर दोन्ही बाजूंना दोन प्रचंड हत्ती व ध्वजस्तंभ आहेत. समोरचा नंदीमंडप मुख्य मंदिराला पुलाने जोडलेला आहे. मंदिराचा चौथरा वीस फूट उंचीचा आहे. या कैलास लेण्यात इतक्या असंख्य, बहुविध, भावपूर्ण मूर्ती आहेत की, पाहणाऱ्याला स्वर्ग-दर्शनाचा आनंद व्हावा. जणू साक्षात शिवाचे कैलासच पृथ्वीवर अवतरले आहे.

क्रमांक एकवीस आणि क्रमांक एकोणतीस ही लेणीही शिल्पसौंदर्याने सजलेली आहेत. क्रमांक एकवीसच्या लेण्यामध्ये असलेला शिवपार्वती-विवाहाचा शिल्पांकित प्रसंग कालिदासाच्या कुमारसंभावाचे प्रत्यक्ष दर्शन घडविणारा आहे.

हिंदू लेण्यांतील कलेचे एवढे विराट दर्शन घडल्यावर शेवटच्या जैन

लेण्यांत विशेष रस वाटत नाही. त्यांत कलाकुसर भरपूर आहे, पण कलेचा जिवंतपणा नाही.

वेरूळपासून सहा मैलांवर देवगिरी आहे. देवगिरीच्या किल्ल्यासारखा मजबूत, भव्य आणि सुंदर किल्ला दुसरा नाहीच. या इतिहास प्रसिद्ध किल्ल्यात एकनाथमहाराजांचे गुरू जनार्दनस्वामी यांचे वास्तव्य होते. येथेच संत एकनाथांना गुरुकृपा झाली. किल्ल्यावर अगदी वरच्या टोकाला जनार्दनस्वामींची समाधी आहे.

वेरूळपासून दक्षिणेला सहा मैलावर सिंदुरवाडे नावाचे एक प्रख्यात गणेशक्षेत्र आहे. याच ठिकाणी श्रीगजाननाने सिंदुरासुराला ठार करून जगाला निर्विघ्न केले. सिंदुरवाडे येथेच प्रसिद्ध भक्तकवी श्रीमध्वमुनीश्वर राहात होते. तेथे त्यांचा मठ आहे. नेवासे येथील कवि यदुमाणिक याने सिंदुरवाड्याची महती सांगणारा ग्रंथ लिहिला.

याशिवाय वेरूळच्या परिसरात पद्मालय नावाचे अत्यंत रमणीय असे गणेशस्थान आहे. तेथील मंदिराला खरोखरीच्या सोन्याचे कळस आहेत.

अशा प्रकारे काम्यवनातील वेरूळचा परिसर निसर्गसौंदर्याने मन रमविणारा आहे. तेथे प्रत्यक्ष भगवान शंकरही रमले आणि ज्योतिर्लिंगरूपाने राहून भक्तांच्या सकल कामना पुरवू लागले. वेरूळ म्हणजे मंगल असे शिवस्थान आहे. वेरूळचा घृष्णेश्वर हे महादेवाचे बारावे ज्योतिर्लिंग असून ते त्या सुंदर भूस्थळावर वसलेले आहे. प्रत्येकाने वेरूळचे हे शिवस्थान पाहून जीवनाचे सार्थक केले पाहिजे आणि 'ॐ नमः शिवाय' ह्या मंत्राचा घोष करून विश्वमंगलासाठी त्या घृष्णेश्वराची प्रार्थना केली पाहिजे.

दा. क्र. ९४२६१

हालय, ठाणें. स्थळप्रत.
२२ वि: ...पु.मा....
..... नोंद दि: १८.२.६७